सहामाही " ३ " " ॰८

साल अखेर " ७ " " १॰८

किरकोळ अंकास ........................ ॰४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु १

पुढें दर ओळीस ॰।॰६

दुसरे खेपेस ....... ॰१

Per annum in arrears 7 " 1R. 8 as

Six monthly............ 3 " 8 as

Single copy.............................. 4 as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as

## THE BERARSAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 6 SEPTEMBER 1886 NO 35

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख ६ माहे सप्तेंबर सन १८८६ इ० अंक ३५



Look for our name.
Save your trouble! Save your trouble!
BROWN & MURRAY'S.
PORTABLE SCIENTIFIC COOKING STOVES

Require no oil, Require no spirit.

Useful Requisite for every household and Inestimable boon both to Rich and poor.

1 Charcoal Ball or 3 Charcoal Cakes. Will suffice for the Napolean Patent stove to prepare any 2 lbs. of the followings in 5 minutes *viz*, Tea, Coffee, Milk Sago, Arrowroot, Barley, &c.

2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes-2 Charcoal Cakes. Will take for the Dick's Patent or Pocket Stove to prepare any 1 lb. of the following in 3 minutes--*viz*, Tea ,Coffee, Milk, Sago, Arrowroot, Barley, &c.

1 Pice Charcoal. Ball or 1 lb. coal Will be enough for the Tourist Patent stove to prepare any four of the following, in 30 minutes, *viz*, Rice, Curry, Cultet, Stew, Pudding, &c.

BROWN & MURRAY'S STOVES give rise to no disgusting smell and smoke as they are in general with other valuable Stoves. Their Stoves are perfect, most economy in Cookery, and require no setting of brickwork. They can be placed, in time of Cooking anywhere even on a Table, Sofa, Chair, &c., without the least fear of catching fire; and cooking can also safely be executed on a running car. BROWN & MURRAY'S STOVES are not only valuable helps to the INVALIDS and INFANTS for procuring HOT TEA and WARM MILK, but on the whole they are HAPPY PARTNERS to all sorst of men for the preservation of life.

*Packing as. 4 postage extra.* R. A p.

| | R. | A | p. |
|---|---|---|---|
| With direction each Napolean Patent | 2 | 8 | 0 |
| Pocket Stove | 3 | 8 | 0 |
| *Packing as. 6 Postage extra-* With direction, each, Tourist Patent. large | 6 | 0 | 0 |
| Do. small | 4 | 8 | 0 |

LIBERAL COMMISSION TO WHOLESALE PURCHASERS AND AGENTS.

Wanted Agents at every post town.
Can be had only.
H. NATHANIAL & CO.
*WHOLESALE MERCHANTS AND COMMISSION AGENTS.*
SEALDAH, CALCUTTA E. C.
Ask for "BROWN & MURRAYS" Stoves and take no other.

See that the Stoves you buy bear our brass lable.

*Testimonials from the Reverends and others free on application.*
Best always cheapest.

ASHU'S POWDER.

Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, 8 per phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G.B. SHAW'S SAMARITAN DROPES

Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the stomach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-

Asthma, Shortness of breath, Coughs, Dropsy, Worms, Gravel, Chronic fevers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhæa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-

Burns, Ulcers, Malignant Sores, Ringworms, Itches, Tetters, Chilblains. Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.

*Full directions for use accompany every phial.*

Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packing and postage As. 12. extra.

Wanted Agents, apply to
Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* } A. T. Mookerjee, *Proprietor.*

## तयार आहे
## हिंदुधर्म शास्त्र-भाग १ व २

( दुसरी आवृत्ति
नामदार रा. सा. वि. ना. मंडलीक सी.ए.स. आय्. यांचे.

किंमत ८ रुपये व हांशील आठ आणे पत्रें ( किंमतीसुद्धां ) ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीसाठीं ठेविलीं आहेत. व० स० कर्ते.


वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रप शुद्ध ९ शके १८०८

## वऱ्हाडांतील माहार लोकांचे हक्क.

मा० अं० पुढें चालूं.

हल्लींचे तंटे मुख्यत्वेंकरून माहार लोकांस धान्य मिळणें तें दर एकरास किती मिळावे या विषयाचे फार आहेत. पूर्वींची वहिवाट पाहिली असतां खेडेगांवांत माहार लोकांस भीक म्हणून कांहीं धान्य देत असत. तिफणीस कांहीं पायली ज्वारी कापताना टोपल्या दोन टोपल्या शेताच्या मानानें व शेत जास्त पिकल्यास दोन टोपल्याजास्त असें लोक देत असत ही देणगी ह्मणजे जसें इतर मांग, बैरागी, फकीर वगैरे लोकांस देत ह्या प्रमाणें माहार लोकांसही देत असत. या प्रमाणें ही देणगी मुळीं केवळ खुशीची होती असें वऱ्हाडांतील एकंदर वहिवाटी वरून दिसून येतें व लोक ही या प्रमाणेंच सांगतात. माहार लोकांचा हक्क ह्मणून रयतेनें कधींही दिला नाहीं. हल्लीं माहारांचे मागणें आहे कीं रयतेनें आह्मास हक्क ह्मणून एकरास एक पायली ह्मणजे २ शेर ज्वारी दिली पाहिजे. पूर्वींच्या एकंदर सरक्युलरांत 'माहारांचे नेहमींचे जे हक्क असतील ते' असें शब्द मुद्दाम योजिलें आहेत. याचें कारण हेंच कीं ज्याठिकाणीं ज्याप्रमाणें रिवाज असेल त्याप्रमाणें देववावेत. आतां कोणत्या ठिकाणीं वहीवाट कशी आहे व माहारांचा हक्क म्हणून लोक धान्य देत आले किंवा काय, व देत असल्यास कोणत्या दरानें दिला वगैरे सर्व गोष्टींची पुरी चौकशी होण्यास दिवाणी कोर्टांत दावा होऊन हक्क शाबीत झाल्याशिवाय मुलकी अधिकाऱ्यांस हक्क देवविण्यास मुळींच अधिकार नाहीं. हें तथ्य आहे. असें असून मुलकी आधिकारी पुष्कळ वेळीं या गोष्टी स्वतःच ठरवितात व त्यामुळें दिवाणी कोर्टाचें काम आपणच बळकावीतात. असल्या प्रकारचे हक्क दिवाणी कोर्टांतच ठरवावे असें मेंझीस साहेबांचे मत होतें व तें अगदी बरावर होतें असें आम्हास वाटतें. एकदा हक्क ठरविला नंतर तो मुलकी अधिकाऱ्यांनीं वसूल करवून देवविला तरी हरकत नाहीं पण दिवाणी कोर्टाचें काम मात्र मुलकी अधीकाऱ्यांनीं करूं नये. पुर्वी माहार लोकांचे हक्क कस कसे होते हे वर सांगीतलेल्या टिपणांत दर्शविलें आहे. उमरावती व दर्यापुर तालुक्यांत दर ९ बिघ्यास १२ शेर; कारंजा येथें ९ बिघ्यास २॥ मण वणी व जळगांव येथें रयतेमागें ८ शेर. पश्चिम वऱ्हाडांत बिघ्यास २॥ शेर या प्रमाणें पुर्वींची वहिवाट होती असें रिपोर्टावरून दिसतें. हल्लीं एकंदर अधिकाऱ्यांचें असें मत दिसतें कीं एकरास पायली याप्रमाणें देववावे. ही गोष्ट इतकी महत्वाची आहे कीं या संबंधीं काहीतरी विचार करणें रेसिडेंट साहेबांस जरूर आहे. आजचे तारखेस पाटील लोकांचे अंग माहारांकडे बरेंच आहे कारण त्यांचे घरीं माहार लोक राबतात. परंतु यांत खरें कितपत आहे याचा विचार अधिकाऱ्यांनीं पूर्ण करावा असें आम्ही सुचवितों व या गोष्टीचा निकाल झाल्याशिवाय योग्य न्याय रयतेस किंवा माहारास दोघांसही मिळणार नाहीं.

## राज्य व्यवस्थे प्रकरणी हक्क मिळविण्याविषयीं एतद्देशीय लोकांचे प्रयत्न आणि त्या संबंधीं आपमतलबी आणि परोत्कर्ष साहिष्णु परदेशस्थ लोकांची ओरड.

मा. अं. पुढें चालूं.

पायोनीयर म्हणतात "मुख्य शहरांत पाहिजे तेव्हां लोकांत साहजीक चळवळ सुरूं करून सर्व राष्ट्राचे विचार त्यांना एक करितां येतील. येवढेंच नाहींतर त्यांच्या मनांत आले तर ते लोकांना चेतऊन सोडण्यासही मागें पुढें पाहणार नाहीत" वरील वाक्याचा पहिला भाग अक्षरशः खरा आहे. आमच्या मनांत आले तर मोठ मोठाल्या शहरांतच काय पण खेड्या पाड्यांत देखील लोकांचे विचार एक करूंनें आम्हाला टाकितां येतील. आमच्या लोकांत ऐकी नाहीं जुट नाहीं म्हणून पुष्कळ लोक ओरड करीत असतात परंतु थोड्या दिवसा पूर्वीं पासून या आमच्या स्थितीकडे जर लक्ष दिलें तर यद्यपि धर्म संबंधी प्रश्नांत आमच्यांत असावी तशी एकी नाहीं तथापि इतर गोष्टींत आमच्या लोकांत बरेंच ऐक्य होत चाललें आहे. कारण आतां लोकांचे डोळे उघडून ऐक्याची आम्हाला किती अवश्यकता आहे हे त्यांना थोडबहुत समजुं लागलें आहे. परंतु लोकविचारांचें जे हें ऐक्य जीकडेतिकडे दृष्टोत्पतीस येतें त्याचा उद्देश पायोनीयर साहेबांस मुळींच कळला नाहीं व केवळ चळवळ करण्यांत प्रख्यात झालेल्या ऐरलंड वगैरे इतर देशांच्या अनुभवावरून आमच्या देशांत होणाऱ्या चळ वळी बद्दल ते अनुमान करीत आहेत असें दिसते. परंतु हे अनुमान किती चुकीचें आहे हें कोणीही साधारण बुद्धीचा मनुष्य सांगेल. यद्यपि आमची खात्री झालेली आहे कीं आम्ही जी ओरडा ओरड करितों तीपासुन आमचें कांहीं ही कल्याण होत नाहीं तथापि आमचे हेतु शिद्धीस नेण्या करीतां सरकारच्या विरुद्ध लोकांस उठवावें व देशांत गडबड उडवून द्यावी असा आमच्या पुढाऱ्यांचा मुळींच उद्देश नाहीं. आमच्या लोकांचा असा उद्देश असता तर ह्या प्रमाणें करण्यास आलेल्या अनेक संध्या त्यांनीं कधींही दवाडिल्या नसत्या. सन १८५७ सालच्या भयंकर प्रसंगा पासून तों आज

पर्यंत आमच्या लोकांच्या सामाजीक व राजकीय स्थितींची तुलना करून दोहोंत किती साम्य आहे याचा विचार पायोनीयर साहेब जर लक्ष लावून करतील तर आमच्या म्हणण्याची सत्यता त्यांच्या ध्यानांत आल्या वांचून राहणारनाहीं. वास्तविक पहातां आमच्या पुढारी लोकांचे उद्देश पायोनीयर साहेब म्हणताहेत त्यांच्या अगदीं उलट आहेत हें आम्ही यांचे लेखांत कितीकवेळा म्हणून दाखविलेंच आहे. पायोनीयर साहेबांच्या दिव्यचक्षूंना बाहेरून जी चळवळ व गडबड दिसते आहे तिचा उद्देश देशाच्या सामाजीक स्थितीची सुधारणा विचारऐक्य आणि शांत उपायानें राजकीय प्रकरणीं हक्क वगैरे मिळविणें या शिवाय दुसरा मुळींच नाहीं. मग याउपर पायोनीयर साहेब पाहिजे तशीकां बडबड करितनां. आतां आमच्यांत पायोनीयर साहेब म्हणतात त्या प्रमाणें लोकांचीं मनें बिथरविणारे लोक कधीं कधीं दृष्टिस पडतात खरें. असे लोक बहुधा युनिव्हरसिटींतून किंवा दुसऱ्या उपायांनीं नूतन शिक्षण मिळवून बाहेर आलेले असतात व त्यांचें रक्त ऊन असून विचारही केवळ अपक्क असल्या कारणानें देशांतील आपल्या बांधवांची सांप्रतची शोचनीय स्थिती पाहून व परदेशस्थ लोकांनीं वारंवार केलेलें उपमर्द पाहून त्यांचें माथें फिरून जातें व एखादें वेळेस पायोनियर साहेब म्हणतात त्याप्रमाणें गोष्टी त्यांच्या हातून घडण्याचा संभव असतो हें खरें. तथापि असे लोक आमच्यांतील खऱ्या पक्क बुद्धीच्या व अनुभवाच्या पुढाऱ्यांच्या मानानें पाहिलें असतां फारच थोडे निघतील. तशांत त्यांच्या हातून कांहीं अप्रयोजक गोष्ट झाली कीं त्यांचा बंदोबस्त आमच्याच पुढाऱ्यांकडून तावडतोब केला जातो व त्यांचे कान उघडून देशाचें खरें कल्याण अशा विचारानें कधीं व्हावयाचें नहीं अशी त्यांची खातरी होते.

पुढें चालूं.

---

गेल्या आठवड्यांत बलगेरीया प्रांतासंबंधीं युरोपांतून आलेल्या खबरा फारच विलक्षण आहेत. कांहीं दिवसांपूर्वी बलगेरीयाच्या गादी संबंधीं बखेडा होऊन सरते शेवटीं सर्वानुमतें प्रिन्स आलेग्झांडर यालाच त्या प्रांताचा स्वामी ठरवून राज्य व्यवस्था चालली होती. या ठरावांत आपल्या सरकारचें बरेंच अंग असल्या कारणानें आस्ट्रिया आणि जर्मनी यांशीं सख्य होऊन पुढें मागें प्रसंग आलाच तर राशियाशीं झालेल्या कलागतींत वरील राष्ट्रांचा आपल्याला बराच उपयोग होईल अशी आमच्या सरकारला मोठी आशा होती. परंतु त्या सर्वांचे ऑफिस होऊन आमच्या सरकारावर हा एक आकस्मिक प्रसंगच येऊन पडला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. सदरील तारांवरून असें समजतें कीं गेल्या महिन्याच्या २१ व्या तारखेस बलगेरिया लोकांनीं एकाएकीं दंगा करून प्रिन्स आलेग्झांडर यांस पदच्यूत केलें आणि देशाबाहेर हाकून लाविलें. नंतर या लोकांनीं आपली स्वतंत्र राज्य व्यवस्था स्थापन करून राशियाच्य झारला मदत देण्याविषयीं विनंती पत्र लिहिलें व तें त्यानें मान्यही केले. बिचारा दुर्दैवी आलेग्झांडर हल्लीं राशियन लोकांच्या हातांत कैदी आहे. वरील गोष्टींत हें निर्विवाद आहे कीं बलगेरियन लोकांना आंतून राशियाचें अंग असल्या शिवाय किंवा राशियानें त्यांना चिथवून दिल्या शिवाय ही गोष्ट झाली नाहीं. असें करण्यांत राशियानें बर्लिनच्या तहाच्या अगदीं विरुद्ध वर्तन केलें आहे हें उघड आहे व त्याबद्दल राशियाला कदाचित् या गोष्टीचा जाब इतर राष्ट्रांपुढें द्यावा लागेल. परंतु आह्मी असें ह्मणतों कीं राशियानें एक परी वाईट तें काय केलें. ज्याची स्वतंत्र लोकांना गुलाम करून सोडण्या विषयीं आजपर्यंत ख्याती झाली आहे त्या राशियानें एका राष्ट्राला दुसऱ्याच्या अमलांतून सोडवून स्वतंत्रता तरी दिली. आणि आमचें सरकार पहा स्वतंत्रतें विषयीं ज्याचा केवळ बाणा व ज्याला परतंत्रता कींवा जुलुम म्हणजे शत्रू प्रमाणें वाटतो ते स्वतंत्रते साठीं जीवावर उदार होऊन भांडणाऱ्या गरीब बिचाऱ्या ब्रह्मी लोकांपासून त्यांची स्वतंत्रता हिसकुन घेऊन त्यांच्या पायांत परतंत्रतेची सनातन बिडी घालण्याचा प्रयत्न करीत आहे. मग राशियानें विनाकारण हा तंटा उपस्थीत करून असा कारभार केला याबद्दल त्यास काय हसावें.

वरील राज्यक्रांतीवरून दुसरी ऐक ध्यानांत ठेवण्या जोगी गोष्ट बाहेर पडत आहे. आमच्या इकडील कित्येक इंग्रजी पत्रांना सत्यते विषयीं मोठा अभिमान असतो. त्यांना असें वाटतें कीं आम्ही जे कांहीं म्हणून लिहितों तें नेहमीं सप्रमाण असावयाचें तें निराधार टरावयाचें नाहींच व याच ऐटींत ते एतद्देशीय वर्तमान पत्रावर नेहमीं असत्यतेचा आणि निराधार लेख लिहिल्या बद्दलचा दोषारोप करीत असतात. परंतु वरील गोष्टी वरून त्यांच्या स्वताःच्याच लेखानां नेहमीं किती आधार असतो हें स्पष्ट दिसत आहे व प्रिन्स आलेगझांडर याला गादीवर बसाविले तेव्हां याच पत्रांत लेख आले होते कीं " बलगेरियन लोकांनीं आपण होऊनच मोठ्या खुषीनें व संतोषानें त्याला राजा निवडीला आहे व त्याच्या अमला खालीं ते मोठ्या आनंदानें राहत असोन त्या प्रांतांत हल्लीं जिकडे तिकडे व संतुष्टपणा आणी शांतता चालूं आहे. " हल्लीं घडून आलेल्या गोष्टीवरून वरील लेखांत किती सत्यता होती व त्याला किती मोठा आधार होता हें कोणीही सांगेल. शिवाय चमत्काराची गोष्ट इतकीच कीं या सर्व राज्यक्रांतींत रक्तस्राव मुळींच झाला नाहीं. सर्व गोष्ट पुष्कळ दिवसां पासून घाटत असल्या प्रमाणें चोहों कडून एकदम घडुन आलेली आहे. आणखी आमच्या इंग्रजी पत्रांच्या मतानें मि. कॅराव्हेलॉफ आणि मि. झॅकोफ हे जे आलेगझांडरच्या राज्याचे आश्रय भूत स्तंभ होते त्यांनींच यासर्व राज्यक्रांती करणाऱ्या लोकांचें आधिपत्य स्विकारलें होतें. एवढ्या वरूनच आमच्या वाचकांनीं खरें तत्व कायतें समजून घ्यावें.

---

मे० हेअर साहेब यांचे कोर्टांत ता. २ माहे सेप्टेंबर रोजीं बनसीलाल मुकुंदलाल याजवरील खटल्याचे चौकशीस सुरवात झाली. पहिला खटला- त्यानें पूर्णाबाई ह्मणजे आपल्या नायकोची बहीण व आपली सासू हिराबाई यांनां अन्यायानें कोंडून ठेविलें. दुसरा खटला— पारूबाईचा. पारुबाई ही शिवलाल अगरवाला याची आई. तिच्या जवळून तिचे डागिने बळजबरीनें हिसकाहून घेतले. त्याबद्दल पुरणाबाई व हिराबाई यांस अटकेत ठेविलें अशी बातमी पोलीसला मिळाल्यावरून पोलीस व येथील माजिस्ट्रेट हे त्यांचे घरीं चौकशी करण्या साठीं आले. त्यांनीं चौकशीकेली. व त्यांनीं बायांस सोडविले. चोरीचामाल ही बनसीलालच्या घरांत सांपडला. या खटल्यांत प्रासिक्यूटर सरकारतर्फे मि. फ्रेजर पो० सु० व वकील रा० रा० मोरो विश्वनाथ जोशी बी. ए. एल् एल् बी हायकोर्ट प्लीडर हे आहेत. आरोपी तर्फे वकील मि० ब्रान्सन बारिस्टर. रा० रा० रंगनाथ नरसिंह बी. ए. एल्एल्बी हायकोर्ट प्लीडर. पांडुरंग गोविंद व देवराव विनायक हे आहेत.

प्रॉसिक्यूशन तर्फेचे वकील यानीं आरोपी यानें पूर्णाबाईस अन्यायानें अटकेंत ठेविलें याविषयीं थोडीशी हकीकत सांगून मुकदम्यास सुरवात केली. या मुकदम्यात ता. २ गुरुवार रोजीं फिर्यादीची साक्ष झाली, पूर्णाबाईची ही साक्ष झाली. तींत तिनें मजला ता. २८ आगष्ट पासून ता. ४ सप्टेंबर पर्यंत अन्यायानें अटकेंत ठेविलें असें सांगितलें. नंतर हिराबाईची साक्ष झाली. तिनें आपणासही अटकेंत ठेविल्याचें कळविलें. नंतर मि० घोंडजी पो० इ० अकोला यांची जबानी झाली. तींत त्यानीं असें सांगितलें कीं मला फिर्यादीनें अर्ज दिला. त्यावरून मी येथील माजिस्ट्रेटाबरोबर तेथें ( ह्म. बनसीलालच्या घरीं ) गेलो तेव्हां त्या मुलीच्या चेहऱ्या वरून माझी खात्री झाली कीं खचितच बनसीलालनें तिला अटकेंत ठेविली असावी. हे तेथें गेल्यावर माजि० समक्ष बनसीलालनें तिला माजि० साहेबाच्या सांगण्यावर सोडतों असें ह्मणून सोडून दिलें. पुढें बनसीलालच्या घराचा झाडा मे० पोलिस इ० व कंबरलेन डि० पो० सु० व मि० कृष्णाजी हरी कोलटकर व तिसरा वर्ग माजि. व गावांतील संभावीत पंच यांच्या समक्ष झाडा घेतला. ह्यात मुद्देमाल सर्व निघाला. नंतर रा० कोलटकर कृष्णाजी हरी यांची जबानीं झाली. तींत त्यानीं आपल्या समक्ष सर्व झाडा घेतला. व पूर्णाबाई ही अटकेंत ठेविली असावी असें माझे नजरेस आलें असें सांगितलें. नंतर पूर्णाबाईचा चुलता कंनुलाल याची जबानी झाली. तींत त्यानें असें सांगितलें कीं बनसीलाल तिला तिच्या आईच्या घरून जबरीनें नेत होता. नंतर ता. ३ रोजीं आरोपीच्या वकिलानीं झालेल्या सर्व साक्षीदारांची व फिर्यादीची उलट तपासणी केली. नंतर ता० ४ सेप्टेंबर रोजीं आरोपी याची जबानी झाली. तींत त्यानें असें सांगितलें कीं पुर्णाबाई व हीराबाई यांनां मि मुळींच अटकेत ठेविलें नाहीं. तिच्या आईनें भिवापुरला जातांना तिला माझ्याघरीं ठेविले. व हिराबाइच्या घरचा माल मी मुळींच आणिला नाही. तो तिच्या मुलीनें म्ह. पुर्णाबाईनें माझ्याघरीं आणिला डबा हिराबाईनें माझ्या स्वाधीन केला. चाळीस हजाराचे दागिने बायकोनें व सासूनें गेल्या चारवर्षांत चोरून नेल्याचेही कळविलें. नंतर मि. हेअर यांनीं बनसलिल याजवर ऐवज परत मिळावा या हेतूनें दोन्ही बायांस अन्यायानें अटकेंत ठेविल्याचे च्यार्ज ठेविले. नंतर पारूबाइचा खठला सूरूं होऊन पारूबाई हिनें आपल्या जिनसा दुसऱ्या पुष्कळ जिनसांतून ओळखून काढल्या. नंतर तिच्या मुलाची जबानीझाली. त्यानंतर नारायण बाळकृष्ण याची जबानी झाली त्यांत पारूबाईचा डबा कोठें सांपडला वगैरे हकीकत कळविली नंतर खटला पुन्हां आज तारिखेस सुरूं आहे.

---

The Berar Samachar

MONDAY 6 SEPTEMBER 1886

## FACTS REGARDING 'EXTRAORDINARY POLICE ACTION.'

The article in the 'Vaidarbha' of 21st. August regarding 'Extraordinary Police action' is calculated to create misapprehensions in the public mind. The information on which the article was based, seems, to say the least of it, second hand. In fact what happened was as follows. The Police got information that the house of Bansilal, Sowcar of Akola, contained stolen property belonging to the Cnitnavis family at Nag[illegible]. Their information was received not from 'irresponsible persons' but from various reliable sources. This was before 12th August. On 13th August the Police, accompanied by the Magistrate of Akola (Tehsildar) went to the house of Bansilal, and asked his son to allow a search of the house, as Bansilal himself was away at Nagpoor. It must in fairness, be admitted that the Police had a perfect right to demand a search under section 165 of the Criminal Pr. Code. Bansilal's son refused to allow the search to be made in his father's absence; and the Police locked and sealed with the Tehsildar's seals all such places in the two houses of Bansilal as they suspected of containing stolen property. This was only a precautionary measure, as the search could not be immediately made. Perhaps it would have been foolish to have acted otherwise; for having once made known that they wanted to make a search, it would have been simply defeating the objects of a search to have allowed time to elapse before the *actual* search was begun. Having sealed the locks, it was also necessary to see that the seals were not tampered with; and to effect this a Police guard was kept at the house simply to watch the seals. Free ingress and egress was allowed and the movements of the pardanasheen women were not watched. The son was given six day's time from 13th, to 19th, August to recall his father with the keys; and the search commenced after that.

There is, no doubt, no particular section in the Code empowering the

Police to seal and guard the place which they have to search; but we suppose, under the above circumstances the cause was one dictated by the merest common sense. The public will do well to remember that free ingress and egress was allowed, as this has an important bearing on the charges framed and to be framed against Bansilal.

The facts, as theyare stated above clearly show the hollowness of the verbiage of the article of 21st August. Words become unmeaning when not warranted by facts; and it is clearly one's duty to write after getting at correct facts. Otherwise, the influence of newspaper writing must cease.

Two charges— one of wrongfully confining his mother-in-law and the other of similarly treating his wife's sister of about 14, were framed against Bansilal by Mr. Hare, the trying Magistrate on the 4th September. The next case is with regard to some property said to be taken away by force from the house of one Parubai. The enquiry will be renewed today. We reserve our say until the cases are finished.

## LAND REVENUE SYSTEM OF THE BOMBAY PRESIDENCY.

(Continued from our last isse.)

The fifth and the last point urged by Mr. Peile was the fixity of tenure and the right of the farmer to sell or otherwise encumber his rights at his own free will, which was secured to a ryot under the British rule.

With regard to the first point in Honorable Mr. Peile's speech viz the principle on which the present system of assessment has been based, we believe no exception could be taken to the system based on those principles and Lord Reay was quite justified in speaking that the Government have attained a perfection in the land revenue system of which they may be justly proud. We have not yet come across any sound objections raised against the principle above enunciated. The second point in Mr Peile's speech with regard to the equitable nature of the incidence of land-revenue on the ryots under the present system nothing definite can be said. Under the earliest Hindu Kingdom sixth of the gross produce was considered a fair equivalent for the protection he received as a subject of that king. In other words 16 per cent was exacted from the farmer as land revenue. Under the Mohamedan rulers payments in kind were replaced by morey payments called the Tankha which was superceded under the Mahratta Government by the Kamal. We ought to possess very correct statistics before we can get at any comparative idea of the difference between the assessments under the old governments and the British Government. We don't know from what Mr. Peile quoted his figures and unless the correctness of the records he quotes in support of his assertion that the land-tax now is greater than formerly is beyond question, any comparision made must obviously lose its value. One fact however, stands in favor of the contrary view viz the people formerly never complained of the heaviness of the land-tax. Moreover it is not a worthless argument that the justification of the British rule is not to be based on a comparison with the old degenerate governments.

The popular notion as regards the reclassification being of frequent occurrence, will, we believe, be sufficiently exploded after what Mr. Peile has stated that it is only in case of mistakes being made in class ing a certain land at the original settlement higher or lower than it ought to be that a reclassification is resorted to. The process is as much to the benefit of the Government as to the benefit of the kunbi.

There is no doubt a current belief that Government taxes increased produce consequent on the improvement of fields made by ryots. Mr. Peile says that the old governments taxed improvement and had distinct rates for dry crop rates and garden rates; but the policy of the British Government was a distinct advance upon the policy passed by the old governments. Here again we do not know Mr. Peile's authority for the statement, but we may presume it to be correct. As the Honorable Mr. Telang suggested that it is not enough that the policy *is* liberal, it should appear to be liberal. The people in the villages of the Presidency believe that the Government increases the taxation generally on all the fields, at revision, and presumally on improvements too. People not unnaturally suppose that part of the increment of assessment on garden lands must be on account of the lands being garden lands. As a matter of fact however, as Mr. Peile states, the consideration is entirely excluded in fixing assessments at revision and the rise in the assessment is based on the general rise in trade only. All this, is again embodied in the Land Revenue Code. The Hon. Mr. Telang has shown by typical examples from various districts and villages of the talookas of the Presidency, that there has been abnormal increase in individual holdings and has been consequently been felt as oppressive. The individual landholder knows only the individual assessment and feels its heaviness. It matters to him very little on what principle the Government increses the revenue on the fields in the villages so long as he finds that his own field has been taxed very high-so high that in certain cases as Mr. Telang has shewn, the increase is cent percent.

The third point regarding the share of the survey Department in fixing the rates of assessment, was dilated upon by Mr. Peile at great length. He looked to things theoretically; the law he said was clear; a good many officials looked to the correctness of the assessments and the possibility of mistake was beyond question. Every body however knows the practice, as to how things like these are managed. Whatever assurances are given by Mr. Peile, nobody thinks the letter of the Law is followed in this respect.

The fourth point as regard increase in the amount of assessment at revision settlement has been partly referred to above. The increase in the total of the land under cultivation naturally accounts for a part of the increase in the government rental but this cannot very well apply at the next settlement; because whatever mistakes might have been committed at the original settlement will disappear at the second settlement. The increase after this must therefore consist of increase on account of general progress in the national commerce.

The last point about the ryot enjoying an amount of benefits under British rule can hardly be gainsaid. But with all these benefits the ryot is none the less growing worse and worse, and agrarian distress is not uncommon in the villages of the Bombay Presidency. The causes of the poverty of the ryot lie deeper than most people suppose and can only be treated in a separate article.

As regards Bulgaria recent telegrams show that there is a revulsion of feelings in favor of Prince Alexander. The Russian party brought about the downfall of the Prince. The popular party have on the contrary established a different form of Government and Prince Alexander instead of going into Anotria is returning to his own country. The first telegram stated that both the parties had combined in effecting a change of Government but that report has now been proved to be false. The first telegram on Monday last says that a regency has been formed with Mr. Karaveloff as Premier. The second telegram says that the above gentleman had not joined with M. Zantoff in effecting the revolution. The third telegram gives a brief speech by Prince Alexander to his escort which left him at the frontier. He said he hoped Bulgaria would choose another Prince to govern the country. The 4th. telegram states that the Russian, Austarian and German press agree that the disappearance of Prince Alexander from the scene of Eastern politics makes it necessary that a firm accord should exist between the three empires who are resolved to maintain peace and localise the events on the Daunbe. The 5th. telegram states that Prince Alexander arrived at Lemberg where he received a perfect ovation from the inhabitants as torch light procession took place in his honor and the town was illuminated. The authorities paid his Highness a visit. From Lemberg the Prince is to proceed to Breslaw. The sixth telegram contradicts this last report and says that Prince Alexander has left Lemberg and is returning to Bulgaria by way of Roumania. Such is the state of affairs about Bulgaria till 30th. August last.

We hear from the papers that His Highness the Nizam has sanctioned a honorarium of Rupees 3000 to Colonel Dobbs for the valuable services he rendered as President of the commission which enquired into the status and working of the Hyderabad College about two years ago.

The following extract from a letter written by Mr. Gladstone to his friend Mr. Morley will give an idea of the giant like correspondence he was keeping.

"In one important respect I feel that relief must be sought at once, and must be made permanent. From circumstances it has been my fate to be charged with a personal correspondence in part highly interesting, btu far greater, I am inclined to suppose, than has ever fallen to the lot of any other individual. My private secreta[illegible]s, when I have been in office, [illegible] by hard, labour, carried on what I may call the work of a department. I can neither maintain the establishment nor promise the devotion of time and surrender of personal liberty, which the efficient conduct of intercourse by letter with not less than 20,000 persons in each year would require.

"I am therefore obliged to give, once for all, a general notice to my correspondents of my inability, which I am sure will be readily understood, either to make replies to letters or to return manuscripts or other enclosures which may be addressed to me, and my silence will be kindly interpreted to signify that I have nothing to say in the particular case."


ACKNOWLEDGMENT.

We beg to acknowledge with thanks the receipt of the following.

Report on the public instruction in the H. A. D. for 1885—86.

Report on the administration of the stamp Department in the H. A. D. for 1885—86.


## वऱ्हाड.

मि. वाय्. आर. विकाजी आसिस्टंट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस, सेकंड ग्रेड यांना मि. ई. ए. हॉबसन यांचे जागीं फर्स्ट ग्रेडचे सब. प्रोटेम् आसिस्टंट सुपरिंटेंडेंट पोलिस नेमिले व त्यांचे जागीं मि. एफ्. सी क्रॉफर्ड यांना नेमिलें.

तारीख १ सप्टेंबरच्या रेसिडेन्सी आर्डेर मध्यें रजिस्ट्रेशन डिपार्टमेंट मध्यें खालीं लिहिलेल्या बदल्या केल्या आहेत:-

मि. हणमंतराव कृष्णराव यांची बदली टाकरखेडहून चिखलीला केली व मि. लक्ष्मण शिवराम यांची चिखलींहून टाकरखेडास केली.

दस्तुर यदलजी बहिमनजी असिस्टंट कमिशनर थर्डक्लास यांना तारीख १६ आगष्ट १८८६ पासून किंवा ते घेतील तेव्हां पासून ८ दिवसांची प्रिव्हिलेज लीव्ह मिळली.

वऱ्हाड प्रांतांतील सर्व जेलवरील अधिकाऱ्यांना क्रि. प्रो. कोडच्या ४७२, ७३, व ७४ अन्वये इन्स्पेक्टर जनरल ऑफ जेलसचे सर्व अधिकार दिले.

यंदां दुसरून होणारी हायर लोअर-स्टॅंडर्डची परीक्षा तारीख ११ अक्टोबर रोजीं होणार म्हणून समजतें.

नामदार गव्हरनर जनरल लॉर्ड डफरिन साहेब यांची स्वारी येत्या दिसेंबर महिन्यांत हैद्राबादेस येणार आहे त्यावेळीं त्यांच्या आगमनोत्सव प्रित्यर्थ खर्च करण्या करितां निझाम सरकारांनीं दोन लाख रुपयांची मजूरी दिली असून त्याची सर्व व्यवस्था एका कमेटीकडे दिली आहे.

## वर्तमानसार.

ब्रम्ह देशांतून सुमारें २०० कैदी इकडे निरनिराळ्या तुरुंगांत ठेवण्या करीतां सरकारानें पाठविले आहेत त्यां पैकीं नागपूर जेलांत ठेवण्या करितां १८ कैदी परवा रोजीं आगगाडीनें रवाना झाले. त्यांचे चेहरे वगैरे थेट चिनी लोकां प्रमाणें होते.

लाब्राडोर प्रांतांत भयंकर दुष्काळ पडला आहे. ता. १० जुलै रोजीं अतिशय थंडी पडून सुमारें ३५०० लोक प्राणास मुकले. जिकडे तिकडे बर्फ पडून दळण वळण बंद झालें आहे. आणि सुमारें १५००० लोक अशा ठिकाणी कोंडून पडले आहेत, कीं त्यांनां मृत्यू खेरीज दुसरी गती नाही. आस्वलें जिकडे तिकडे चौताळली आहेत. पूर्वी जेथें समुद्राचे पाणी कधीं थिजले नव्हतें तेथें बर्फ होऊन जाणें येणें बंद झालें आहे. हिंवाळा दोन महिन्यांवर येऊन ठेपल्या मुळें ही थंडी आतां कमी होण्याचा संभव नाहीं; हिवाळ्यांत काय होईल अशी सर्वांस भीति पडली आहे. बिचाऱ्यांवर ईश्वर क्षोभला आहे असे ह्मणावयाचें. वकुल.

कऱ्हाड येथें नागपंचमीचे दिवशीं एका ब्राह्मणाचे घरीं मूल एकटेंच खेळत होतें, इतक्यांत एक भला मोठा भुजंग पिवळा जर्द त्या मुलाचें अंगावर पडला. व अंगावर खेळूं लागला. इतक्यांत मुलाची आई बाहेरून आली तिनें ओरड करतांच नाग नाहींसा झाला. ईश्वर दयेनें मूल सुरक्षित आहे. ईश्वरी लीला विचित्र आहे.

डेकन ॲग्रिकलचरिस्ट रिलीफ आक्टाचे संबंधानें दुरुस्तीचा खरडा हिंदुस्थान सरकारा पुढें विचार करण्या करितां आला असल्याचें कळतें.

मांडले शहर ( ब्रह्मदेश ) इरावती नदीचे कांठीं आहे. ह्या नदीस अती महापूर येऊन शहराचा बराच भाग वाहून गेला व सुमारें ७०० लोक बुडून मेले. फक्त व्यापारी लोकांचे ५०००००० रुपयांचे नुकसान झाल्याचे कळतें.

क्विंटन येथें जार्ज ड्यानिअल नांवाचा एक मनुष्य बरेंच दिवस अजारी असून एके दिवशीं तो खरोखरच मेला. परंतु उत्तरकार्य विधीसाठीं मंडळीची जमवाजमव होण्यांत २० तास मध्यें गेले व तोंपर्यंत रितीप्रमाणें तें प्रेत पेटींत होतें. पुढें पाहतात तों आंत कोणी कण्हत आहे असा आवाज एकूं आला तेव्हां भीतीनें लोक पळूं लागले; परंतु एक जर्मन मनुष्य मात्र तेथें राहिला. व त्यानें पेटी उघडून आतल्या मनुष्याला बाहेर काढलें व खुर्चीवर बसविलें. हल्लीं तो चांगला हुषार असून त्याचें वय ८० वर्षांचें आहे. त्यानें आपल्या उत्तरकार्यासाठीं केलेली सर्व तयारी बघितली !

गेल्या महिन्यांत शिंदे महाराजांवरील आलेलें संकट थोडक्यांत चुकलें. महाराज आपल्या उपवनांतील हौदाच्या बंबाशीं क्रिडा करीत असतां त्यांचा हात चेंगरला. सर गणपतरावांना बातमी लागल्यावर त्यांनीं लागलीच रेसिडेंट साहेबांस कळविलें व ते एक क्षण व्यर्थ न घालवितां डाक्टर घेऊन महाराजांच्या सेवेस हजर होते. महाराजांस आराम लवकरच पडो अशी आमची परमेश्वरा जवळ प्रार्थना आहे.

एका इंग्रजी पत्रावरून समजतें कीं प्रशिअन स्टेट रेल्वेवर गाड्याचें काम स्त्रिया करितात. एका वरच सर्व काम पडूं नये ह्मणून जेथें फार लैनी येतात तेथें बहुत करून गार्डांच्याच बायका किंवा इतर बायका आहेत. गाड्या चालत असल्या ह्मणजे ह्या बायका हाताला व कमरेला ओढण्या बांधून व हातांत निशाण घेऊन फासलायनीवर उभ्या असतात.

कोणी गैबी पत्र पाठविलें आहे. त्यांत तो असे ह्मणतो कीं, पुढें येणारा माघमास जाऊन त्या पुढील माघमासीं वैतरणासमुद्र संगमी मौक्तिक वृष्टि होऊन जगाचा अभ्युदय होईल. भ्रमिष्टच आहे बेटा! पण भ्रमिष्ट कां ह्मणावा! पुराणावर भरंवसा ठेवल्यास नागार्जुन शककर्ता तेथेंच निर्माण होणार आहे. हेंही आतां झूट ह्मटलें पाहिजे. कारण पुराणें आतां दुकानांतील किराण्यास ओझिली झालीं आहेत.

मद्रासमेल पत्रकर्ते लिहितात कीं, गेल्या महिन्यांत कोर्टांत एक ब्यारिस्टर जज्जावरच्या आपल्या टीका पुऱ्या करणार इतक्यांत त्याच्या झग्याच्या लडथड्यातून एकाएकीं धूर निघूं लागला. तेव्हा लगबगीनें आपला झगा ( गाऊन ) एकीकडे काढून टाकून पाहातो तो त्याच्या कोटाच्या शेवटांनीही पेट घेतला. या अपघाताचा शेवट धुरांतच झाला. याचें कारण आगकाड्यांच्या पेटीनें कोटास पेट घेतला होता. बिडी ओढणारांनीं इकडे लक्ष द्यावें. नं० गो०

मुंबईच्या सिंडिकेटास कांहीं वर्तमानपत्र कर्त्यांनीं अशी शिफारस केली आहे कीं, वर्षांतून म्याट्रिक्युलेशन परिक्षा जी एकच वेळ घेतात तशी न घेतां ती दोन वेळां घ्यावी. एक नोवेंबरांत, व दुसरी जून महिन्यांत, अशी व्यवस्था इंग्लंडांत आहे. आक्सफर्ड व लंडन युनिव्हार्सिट्यांच्या परिक्षा वर्षांतून चार वेळां घेतात. अशी व्यवस्था झाल्यानें वाऱ्या घालणाऱ्या उमेदवारांस सोईसकर पडेल खरे; परंतु आधीं त्यांनीं सरकारची तुंबडी भरण्या करितां आपली विशवी मैल केली पाहिजे.

दक्षिणेंतील शेतकरी रिलीफ आक्टाची दुरुस्ती करण्यासाठीं बॉल इंडिया कौन्सिलांत आणण्याची सरथिओडोर होप यांस परवानगी मिळाली. ही दुरुस्ती करण्याचा हेतू इतकाच आहे कीं, सर्व मुंबई इलाख्यास अथवा त्याच्या कांहीं भागास हा आक्ट लागू करण्याचा अधिकार मुंबई सरकारास द्यावा. व रिलीफ आक्टाच्या ३९ व्या कलमा प्रमाणें कन्सिलियटराकडे ज्या फियादी होतात त्यांतील प्रतिवादीस आपल्या समोर हजर करण्याचा अधिकार कौन्सिलियटरास द्यावा. या शिवाय दुसऱ्या ही अल्प स्वल्प दुरुस्त्या व्हावयाच्या आहेत वास्तविक पाहिले असतां ज्या चार जिल्ह्यांत हा आक्ट सुरूं आहे तेथील सावकार आणि शेतकरी यांचे एकसारखेंच नुकसान होत आहे. मागें दुरुस्ती झाली ती शेवटची दुरुस्ती आहे, असें सरकारचें स्पष्ट वचन असून पुन्हा हे दुरुस्तीचें बिल आणणें हा निवळ सरकारचा अतिआग्रह आहे, एवढेंच नव्हे पण लोकमताची हेळसांड करण्या सारखेंच हें कृत्य आहे असें आह्मी समजतों. मर्जी सरकारची, एवढेंच ह्मणावें दुसरें काय?

न्या० प्रि०

पारिसमधील ऐतें जाळण्याच्या भल्या चार केल्या । ह्मणून यांत जे कोणी अंत- सांगितले क.

कार्ली आपणांस जाळावें असें सांगतील त्यांस जाळतात.

येत्या आक्टोबरांत सदर्न मराठा रेल्वेच्या पुण्यापासून साताऱ्यापर्यंतच्या रस्त्यावर गाड्या जाऊं येऊं लागतील.

बोखाऱ्याच्या आमिरानें खोजा साले हा प्रदेश आपल्या राज्याचा भाग आहे असें काबूलच्या आमिरास लिहिलें आहे.

बल्गेरियाच्या पुढील राज्यव्यवस्थे विषयीं रशियनसरकार योजना करणार आहे असें ह्मणतात.

पंचकोटचे राज्याच्या हद्दींत मुधापूर स्टेशनाजवळ सुमारें १३४ यार्डांच्या अंतरावर एक कोळशाची खाण सांपडली आहे असें समजतें.

वेल्स प्रांतांतील कित्येक ठिकाणच्या लोकांनीं आपणांस स्वतंत्र स्वराज्य व्यवस्था पाहण्याची सोय असावी म्हणून जाहिरती प्रसिद्ध केल्या आहेत.

दक्षिण पासिफिक महासागरांतील कर्माडी बेटें इंग्रज सरकारानें आपल्या राज्यास जोडिलीं.

डाका स्टेट रेल्वेचा बाच रस्ता व गोअलंडांचें स्टेशन पर्जन्याच्या अतिवृष्टी मुळें पूर येऊन वाहून गेलें.

रशियन सरकारानें परदेशांतून येणाऱ्या प्रवाशानें दहा शिलिंगा पेक्षां अधिक रुपयाचें नाणें आपल्या राज्यांत आणूं नये असा कायदा केला.

चिकागो येथील ऐरिश न्याशनल लीग लोकांच्या सभेमध्यें मि. रेडमंड यानीं यापुढें ऐर्लंडनें इंग्लंडाबरोबर युद्ध करण्यास तयार झालें पाहिजे असें बोलून दाखविलें.

बाबू प्रतापचंद्रराय यांनीं महाभारताच्या इंग्रजी भाषांतराचे तीन पर्व पूर्ण करून चौथ्यास आरंभ केला आहे.

बाबू गोविनलाल राय यानीं रंगपूर येथील नार्मल स्कूलाकरितां ५,१५० रु किंमतीची एक इमारत दिली व तिची नेहमीं दुरुस्ती करण्याकरितां १००० रु० व्याजानें ठेवले असें समजतें.

प्रिन्स आलेक्झांडर यांस पदच्युत केलें यामुळें रशियन सरकारचें राज्यकारस्थान पूर्णपणें शेवटास गेलें; परंतु इंग्रज सरकारचा हिरमोड झाला असें लंडन टैम्सकर्ते ह्मणतात.

सोफियामधील राजवाड्यास बल्गेरियाच्या लोकांनीं व लष्करानें वेढा घालून प्रिन्स आलेक्झांडर यांस राज्याधिकार सोडण्यास भाग पाडून देशाबाहेर घालवून दिलें. नंतर त्या लोकांनीं रशियाच्या बादशाहाचा आश्रय मागण्याचा निश्चय केला व त्या देशांत त्या बादशाहाच्या असलेल्या वकिलाकडे विनंती करण्यास डेप्युटेशन पाठविलें. तेव्हां त्या वकिलानें बादशाहाच्या आश्रया विषयीं त्या लोकांस आश्वासन दिलें. ही राज्यक्रांति रक्तस्त्रावा विरहीत झाली.

चिकागो येथें मिसेस क्लिमन नांवाची एक स्त्री आहे. तिच्या लहान मुलाच्या डोळ्याची रचना अगदीं मांजराच्या डोळ्याप्रमाणें असून तसेंच त्या मुलास अंधारांत दिसते व त्याचे डोळे अंधारांत चकाकतात असें तेथील नेत्रवैद्याच्या अनुभवास आलें आहे. सु० प०

## जाहिरात.

[सिंदूरगिरी महात्म्य अथवा रामटेक वर्णन.]

" षोडशाध्यायी; सप्तशतश्लोकी. "

वरील नांवाच्या ग्रंथांत श्री शंकरांनीं पार्वतीला रामक्षेत्र उर्फ रामटेक ह्या क्षेत्राचें व तीर्थाचें महात्म्य, त्याच्या स्थापनेचें मूळ कारण, तत्संबंधीं कथा भाग वगैरेंचें वर्णन केलें आहे. अद्यापि हा ग्रंथ कोठेंही प्रसिद्ध झाला नाहीं. ह्यामुळें चांगल्या विद्वान् संस्कृतज्ञांच्या सहाय्यानें आम्ही ह्या ग्रंथाचें प्राकृत भाषांतर करवून तें मूळासह छापविण्यास सुरवात केली आहे. ह्या प्रांतांत व वऱ्हाडांत रामक्षेत्राचें महात्म्य सुप्रसिद्ध आहे व पुष्कळ लोक भक्तिभावानें ह्या ठिकाणीं यात्रेच्या इच्छेनें येतात एतदर्थ आम्ही हा ग्रंथ छापण्याच्या कामाला हात घातला आहे. भाविक लोक आमच्या ह्या प्रयत्नास आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

ह्या ग्रंथाचीं एकंदर अदमासानें ८० पृष्ठें डेमी षोडश पत्री साच्याची होतील. पुस्तक पोथीच्या आकारानें छापलें जाईल. सर्व भाविक लोकांस हा ग्रंथ घेण्यास सुलभ पडावा म्हणून ह्याची किंमत अगाऊ देणारास आठ आणे, खात्री लायक सही देणारास दहा आणे व मागाहून बारा आणे टपाल खर्चासुद्धां पडेल. ५० प्रती घेणारास एक प्रत फुकट मिळेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. प्रथमतः थोड्याच प्रती काढविण्याचा विचार असल्यामुळें ग्राहक लोकांनीं पैसे अगाऊ भरण्याची तसेंच खात्रीलायक सह्या देण्याची त्वरा करावी. अगाऊ पैसे भरण्याची मुदत तारीख ३० सप्तेंबर अखेर पर्यंत ठेवली आहे. पैसे भरणें ते खालीं सही करणाराकडे भरावे त्या बद्दल पावती दिली जाईल कळावें.

त्रिंबक हरी जोशी.

नागपूर तारीख १८-८-८६ } म्यानेजर दंडधारी प्रे. नागपूर सिताबर्डी.

☞ जे पत्रकर्ते कृपाकरून ही जाहिरात आपले पत्रीं निदान तीन वेळ तरी घेतील व पत्र आमचे कडे पाठवितील त्यास ह्या पुस्तकाची एक प्रत नजरकेली जाईल कळावें. ग्रंथ अक्टोंबर अखेर तयार होईल.

## स्त्री पुरुष तुलना

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया? हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें येथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क नि० डे० कमिशनर यांजकडेस, आकोलें येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे. पुस्तक घेणारांस टपाल हशील पडणार नाहीं. पैसे पाठविणारानें वर्ताव्याचा सुद्धां पाठवावें.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० के०

सहामाही " २ " " ८
साल अखेर " ७ " " १८
किरकोळ अंकास........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ॥ १८६
दुसरे खेपेस ...... ॥ १

Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly........... 3 " 8 as
Single copy........................... 4 as

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERARSAMACHAR.


VOL XX AKOLA MONDAY 13 SEPTEMBER 1886 NO XXXVI

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख १३ माहे सप्टेंबर सन १८८६ इ० अंक ३६



Look for our name.
Save your trouble! Save your trouble!
BROWN & MURRAY'S.
PORTABLE SCIENTIFIC COOKING STOVES

Require no oil, Require no spirit.

Useful Requisite for every household and Inestimable boon both to Rich and poor.

1 Charcoal Ball or 3 Charcoal Cakes. Will suffice for the Napoleon Paten stove to prepare any 2 lbs. of the followings in 5 minutes *viz*, Tea, Coffee, Milk Sago, Arrowroot, Barley, &c.

2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes 2 Charcoal Cakes. Will take for the Dick's Patent or Pocket Stove to prepare any 1 lb. of the following in 3 minutes--*viz*, Tea ,Coffee, Milk, Sago, Arrowroot, Barley, &c.

1 Pice Charcoal. Ball or 1 lb. coa Will be enough for the Tourist Patent stove to prepare any four of the following, in 30 minutes, *viz*, Rice, Curry, Cultet, Stew, Pudding, &c.

BROWN & MURRAY'S STOVES give rise to no disgusting smell and smoke as they are in general with other valuable Stoves. Their Stoves are perfect, most economy in Cookery, and require no setting of brickwork. They can be placed, in time of Cooking anywhere even on a Table, Sofa, Chair, &c., without the least fear of catching fire; and cooking can also safely be executed on a running car. BROWN & MURRAY'S STOVES are not only valuable helps to the INVALIDS and INFANTS for procuring HOT TEA and WARM MILK, but on the whole they are HAPPY PARTNERS to all sorst of men for the preservation of life.

| | R. | A | p. |
|---|---|---|---|
| *Packing as. 4 postage extra.* | | | |
| With direction each Napolean | | | |
| Patent........................ | 2 | 8 | 0 |
| Pocket Stove............... | 3 | 8 | 0 |
| *Packing as. 6 Postage extra-* | | | |
| With direction, each, Tourist | | | |
| Patent. large.............. | 6 | 0 | 0 |
| Do. small.................. | 4 | 8 | 0 |

LIBERAL COMMISSION TO WHOLESALE PURCHASERS AND AGENTS.

Wanted Agents at every post town.
Can be had only.
H. NATHANIAL & CO.
*WHOLESALE MERCHANTS AND COMMISSION AGENTS.*
SEALDAH, CALCUTTA E. C.
Ask for "BROWN & MURRAYS" Stoves and take no other.

See that the Stoves you buy bear, our brass lable.

*Testimonials from the Reverends and others free on application.*
Best always cheapest.

---

ASHU'S POWDER.

Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, 8 per phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G. B. SHAW'S SAMARITAN DROPES

Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the stomach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-

Asthma, Shortness of breath, Coughs, Dropsy, Worms, Gravel, Chronic fevers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhæa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-

Burns, Ulcers, Malignant Sores Ringworms, Itches, Tetters, Chilblains. Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.

*Full directions for use accompany every phial.*

Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packing and postage As. 12. extra.

Wanted Agents, apply to
Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* } A. T. Mookerjee' *Proprietor.*


---

## जाहिरात.

सर्व लोकांस असें कळविले जाते कीं सूर्यभान वल्लद गुगाजी बेले राहाणार गांडेगाव खुर्द यानें सिताराम गंगाराम कुळकर्णी राहाणार सावरगांव तालुके जळगांव याजपासून रुपये ९०० नऊशे कर्ज घेऊन त्याजबद्दल दस्तऐवज करून दिला. व रुपयाबद्दल शेत व घर गाहाण दिले. व दस्तऐवज रजिष्टर ही करून दिला. परंतु हा दस्तऐवज आमचे पासून घायाळ जाहाला आहे तर कोणास सापडला असेंल अगर सांपडेल त्याणे आह्मास आणून द्यावा. ह्मणजे आणून देणारास रुपये २५ इनाम दिले जातील कळावे तारीख ८ ९-८६ इसवीं.

हरो सिताराम कुळकरणी तर्फ मुखत्यार
गोपाल नागोराव दस्तुर खुद्द

---

### नोटीस.

रा० धनाजी खेटे राहणार हिवरखेड तालुके अकोट जिल्हा आकोले. यास नोटीस देणार किसन वल्लद सोनाजी लोखंडे राहणार दहीगांव तालुके अकोट नोटीशीनें असें कळवितों कीं, मी ताणे रंगविण्या करीतां हिवरखेडास आलो व माझे रंगविण्याचें काम दोन दिवसांत केलें तुम्ही ह्या दोन दिवसांत मजला आपल्या घरीं बोलाऊन नेऊन मजला मढींत बसऊन कागद आणून कागदामध्यें काय लिहिलें हें मजला ठाऊक नाहीं. व मी त्याजवर सही वगैरे कांहीं केली नाहीं. नंतर माझा बाप सोनाजी लोखंडे रहाणार दहीगांव हें माझे नवरीस आणण्या करितां बरोबर बाळूनथाप व भगु वल्लद भोनाजी राऊत व नामदेव वल्लद विक्रमजी शिंदे यांस घेऊन तुमचेकडे आले. दोन दिवस तुम्ही माझ्या बापास ठेऊन घेतले आणि नवरीस पाठवितो ह्मणून सांगितलें. नंतर तिसरे दिवशीं सांगितले कीं, नवरीस पाठवीत नाहीं. काय पाहिजे तें करा तीजबद्दल फारकती किसन यानें दिली आहे वगैरे. त्यांस मी फारकती दिली नाहीं. मजला ठाऊक नाहीं. तुम्ही थोतांड करून फारकत करून घेतलें म्हणतां ते बरोबर नाहीं. आतां फारकत झाली ह्मणून जे तुम्ही म्हणतां तें फारकत चार पंचा समोर दाखवावें. नाहींतर या खोट्या कुभांडाबद्दल सरकारांत काम चालवून निकाल होईपर्यंत जे नुकसान होईल ते सर्व भरून घेतले जाईल. फारकतीचा कागद नोटीस पावल्या पासून चार दिवसांत दाखवावा. नाहीं तर रीती प्रमाणें तजवीज करावी लागेल. कळावें तारीख ८ माहे सपटंबर सन १८८६ इसवी.

(सही)
किसन वल्लद सोनाजी लोखंडे वस्ती दहीगांव.

---

### नोटीस.

लक्ष्मण वल्लद परशराम व गुनाई मर्द तुकाराम हाली रहाणार खामखेड नजीक वाडेगांव तालुके बाळापूर या उभयतांस नोटीस देणार तुकाराम वल्लद प्रीथमजी पाटील रहाणार आलेगांव तालुके बाळापूर जिल्हा आकोलें. ह्या नोटीसीनें असें कळविण्यांत येतें कीं, तुम्ही आमचे सासरे व गुनाई माझी बायको ही आज आजमासें तीन महिने जाहलें आहेत. आमचे पासून आम्हास न विचारतां तुमचेकडेस निघून आली. व ती बरोबर पायांतील कडी, हातांतील गोठ, व एक पितांबर असें घेऊन गेली. नंतर चार दिवसांनीं तपास करितां असें समजलें कीं, ती तुमचेकडे माहेरी आली; परंतु आज पावेतों परत आली नाहीं व आपण पाठविली नाहीं याज करितां ह्या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं. नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत घरीं माझे जवळ यावें न आलीस तर लग्नाबद्दलच्या खर्चाच्या पैशाविषयीं रीतीप्रमाणें दावा तुम्हा उभयतांवर करून सर्व नुकसान निकाल होईपर्यंत व नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेतले जाईल व सदरील मुदतींत न आल्यास पुन्हा घरी घेतली जाणार नाहीं कळावे तारीख १० माहे सप्टेंबर सन १८८६ इसवी.

सही
तुकाराम वल्लद पितनजी पाटील
आलेगावकर.

---

## स्त्री पुरुष तुलना

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया?

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलठाणें येथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क नि० डे० कमिशनर यांजकडेस-आकोलें यथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे. पुस्तक घेणारांस टपाल हशिल पडणार नाहीं पैसे पाठविणारानें वर्तावळणा सुद्धां पाठवावें.

---

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद शुद्ध १५ शके १८०८

परवां मुंबई कायदे कौन्सिलांत लँडरेव्हेन्यु प्रश्नासंबंधीं वादविवाद झाला त्यावेळीं मुंबईचे लोकप्रिय झालेले गव्हर्नर लॉर्डरी साहेब यांनीं शेतकऱ्यांच्या संबंधानें जें भाषण केलें तें फार महत्वाचें असून त्या वरून नामदार साहेबांच्या मनांत शेतकऱ्यां विषयीं किती कळवळा आहे हें स्पष्ट दिसत आहे. लार्ड साहेब या देशांत आल्या पासून त्यांनीं वेळोवेळीं एतद्देशीय लोकांना इष्ट व हितावह असे जे पुष्कळ ठराव व नेमणुका केल्या आहेत त्यांवरून त्यांच्या मनाचा थोरपणा आणि औदार्य पदोपदीं दिसत आहे व ते लोकांना दिवसेंदिवस अधिकाधिक आवडते होत चालले आहेत. आमच्या देशांतील शेतकीची व शेतकऱ्यांची स्थिती सध्यां कशी झाली आहे हें सर्वतोमुखी प्रसिद्ध आहे; तशांत ह्या खात्यांत जे मोठेमोठे अमलदार येतात ते बहुधा वरवर शेतकीची स्थिति सुधारण्याचा बाणा दाखऊन दिवसेंदिवस उलट शेतकऱ्यांनांच पिळून काढीत असल्या कारणानें शेतकीचा धंदा ह्मटला ह्मणजे सध्यां हलकटाहून हलकट बनून गेला आहे. अशा अवस्थेत नामदार लॉर्डरे सारखे थोर गृहस्थ पुढें होऊन शेतकऱ्यांचा कैवार घेऊं लागले तर त्या गरिबांवर किती उपकार होणार आहेत हें सांगणें नकोच. सदर्हू भाषणाचा मराठी तर्जुमा करून तो जर आमच्या एतद्देशीय शेतकऱ्याना वांचण्यास दिला किंवा त्यांना वांचून दाखविला तर त्यांच्या सध्यांच्या अवस्थेंत लार्डरे साहेबां सारखे कांहीं थोर मनाचे पुरुष अद्यापि त्यांचे पुरस्कर्ते आहेत येवढ्यांतच त्यांना समाधान वाटण्या सारखें आहे ह्मणून त्या भाषणाचें मराठी भाषांतर आह्मी खालीं देतों:—

"मी नेहमीं शेतकरी लोकांत राहिलों आहे ह्मणून त्यांच्या विषयीं माझ्या मनांत अतिशय कळकळ आहे. मला वाईट वाटतें कीं या देशांतील कुणबी वगैरे लोकांशीं

मला मोकळेपणानें बोलतां सवरतां येत नाहीं व तेणें करून त्यांचे ह्मणणें काय आहे हें स्वतः समजून घेतां येत नाहीं. आह्मी खात्री आहे कीं त्यांचे विचार शाहाणपणाचे असतील. मला त्यांच्याशीं जर बोलतां येत असतें तर मी त्यानां त्यांची शेतकी सुधारण्याच्या हेतूनें व मेहेनत आणि काटकसर करून त्यांची स्वतःची स्थिति उच्च दशेला आणण्याच्या उद्देशानें सरकार सध्यां त्यांना शिक्षणाची त्यानां वारंवार जी संधी देत आहे ती न दवडण्या विषयीं चांगलें समजाऊन सांगेन. मी त्यांना आणखीही समजून सांगेन कीं त्यांची सांप्रतची स्थिती सुधारून त्यानां भरभराटीस चढवावें व त्यांच्या सुधारणेच्या आड येणाऱ्या वास्तविक ज्या गोष्टी आहेत त्या दूर कराव्या हा सरकारचा मनापासून हेतु आहे. मला कुणबी वगैरे लोकांशीं स्वतः बोलतां येत नसल्या कारणानें मी एकदां पाहणीच्या व जमाबंदीच्या कामांत वाकबगार अशा एका एतद्देशीय गृहस्थाला शेतकरी लोकांच्या तकरारी तरी काय आहेत ह्मणून विचारिलें. तेव्हां त्यानें शेतांचे सर्व्हेनंबर वगैरे कायम करून टाकावे इत्यादि बऱ्याच सूचना केल्या आहेत. **** शेतकीची स्थिती सुधारण्या साठीं व त्याची नीट व्यवस्था करण्या साठीं जें खातें नेमिलें आहे त्यामध्यें जी व्यंगे अद्याप राहिलीं आहेत तीं पुढें आणून त्यां विषयीं विचार करणें या पासून सरकारला आनंदच होणार आहे व आमची एवढीच इच्छा आहे कीं सरकारा कडून कुणबी लोकांवर अन्यायाचे कर बसण्याचा संभव असतो त्यां पासून त्यांचे नेहमी संरक्षण करीत असावें."

वरील उद्गार खरोखर नामदार साहेबांच्या मनापासून निघाले असतील तर निदान मुंबई इलाख्यांत तरी शेतकीची स्थीती पुढें मागें सुधारेल असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. आमच्या इकडील कामिशनर आणि डेपुटी कमीशनर वरील भाषण वांचून त्याचा चांगला विचार करतील काय?

## राज्य व्यवस्थे प्रकरणी हक्क मिळविण्याविषयीं एतद्देशीय लोकांचे प्रयत्न आणि त्या संबंधीं आपमतलबी आणि परोत्कर्षा सहिष्णु परदेशस्थ लोकांची ओरड.

मा. अं. पुढें चालूं

मागे दिलेल्या कारणामुळें आमच्या चळवळींचें मुख्य तत्व जें शांततेच्या उपायानें राजकीय हक्क मिळविणे व दाद लावून घेणें त्याला सोडून किंवा त्याशीं विरुद्ध असें लेख किंवा भाषणें आतां मुळींच निघत नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां शेकडा एक किंवा दोन अपवादरूपी होणाऱ्या उदाहरणावरून सर्व समाजावर बिनधोक मत ठोकून देणें ह्मणजे आमच्या पायोनियर साहेबांचे हें केवढें धाडस आहे? काय ह्मणे आह्मी लोकांना चिथवूं आणि मग लोक सरकारच्या विरुद्ध उठतील. मला वाटतें ही कल्पना पायोनियर साहेबांच्या डोक्यांत शिरल्या बरोबर त्यांच्या आंगावर कांटा उभा राहिला असेल. तोंडानें याप्रमाणे ह्मणणें फार सोपें आहे परंतु त्याचा परिणाम किती भयंकर आहे हें आह्मी साहेब मजकुरांना सांगावें असें नाहीं. त्यांना स्वतःना अनुभव असेलच. सत्तावन सालची त्रेधा अद्याप ते विसरले नसतीलच. लोकांची मनें एकदां क्षुब्ध झालीं ह्मणजे त्यांना चेतविण्याची गरज मुळींच लागत नाहीं हें आमच्या साहेबांच्या लक्षांत कसें आलें नाहीं. सत्तावन सालीं आमचे पुढारी त्यांना चेतविण्यास गेले होते काय? व त्याच सालीं जर आमच्यात प्रमुख ह्मणविणाऱ्या कांहीं विचारी एतद्देशीय राजांनी तो प्रलय शमविण्या साठीं आपले वजन जर खर्च केले नसतें तर आमच्या पायोनियर साहेबांचे एस्टाब्लिशमेंट आमच्या विरुद्ध अप्रबुद्ध लेख लिहिण्याला वांचलेंच नसतें हें ही त्यांना कसें कळत नाहीं. सारांश लोकांना आमचे पुढारी चेतवून देतील असें जे पायोनियर साहेबांचे ह्मणणें आहे तें अगदीं अविचाराचें आहे. आमचे पुढारी देशाला अहितकारक असें हें कृत्य करण्याचें कधीं मनावर घेणार नाहींत व कदाचित साधारण जनसमाजांनीं त्यांच्या विचारा विरुद्ध असें वेडेपण केलेंच तर आमच्या सरकारला आमच्यांतील पायोनियर साहेबांच्या मतें राजद्रोही ठरलेल्या पुढाऱ्यांचा जितका उपयोग होईल तितका सरकारच्या बायोनेटचा होणार नाहीं हे साहेब मजकुरांनीं चांगलें लक्षांत ठेवावें. आमचे साहेब कदाचित समजत असतील कीं इंग्रज सरकारांनीं हिंदुस्थान देश तरवारीच्या बळावर मिळविलेला आहे व प्रसंग आला असता तरवारीच्या बळावरच तो कायम ठेवितां येईल. अशा प्रकारचा एक वेडगळ व उद्दाम लेख कांहीं दिवसा पूर्वीं लंडन टाईम्स पत्रांतही आला होता. आतां या बढाईंत खरे तत्व कीती आहे हें निःपक्षपात बुद्धीनें लीहिलेला एखदा हींदुस्थानचा ईतीहास वांचला असतां तेव्हांच कळून येईल. परंतु असा ईतीहास अद्याप पर्यंत झाला आहे कींवा नाहीं याची आम्हास शंकाच वाटते. आजपर्यंत जेजे हिंदुस्थानचे ईतीहास लिहिले गेले आहेत त्यांत जो कांहीं बढाई आणी अहंकार दीसून येतो आहे तो विचारूंच नका. आमच्या महाराष्ट्र वगैरे भाषेंत हींदुस्थानचे इतीहास झाले आहेंत परंतु तेही मूळाचेच मासले. आमच्यांत ऐका प्राकृत कवीनें ह्मटलें आहे "जोंवरी देखीला नाहीं पंचानन तोंवरी गोष्टी करीश्वान;" या प्रमाणेच जोपर्यंत तसा प्रसंग आला नाहीं तों पर्यंत फुकटच्या बढाई खोर गप्पा झोकुन द्यावयाला काय हरकतत आहे. आम्ही परमेश्वरा जवळ प्रार्थना करितों कीं तसला अनिष्ट प्रसंग न येवो परंतु जर आलाच तर आमचे बढाई मारणारे शूर पायोनीयर साहेब त्याशीं सामना करण्याला तयार आहेत काय! प्रसंग विशेषी घडणाऱ्या अन्यायाच्या योगानें जरी आमच्या लोकांचीं मने विथरण्याचा संभव आहे तथापि तेवढ्या वरून आम्हाला इंग्रजे सरकार नको असें आजपर्यंत कोणी बोलिलें नाहीं, बोलत नाहीं आणी आमची खात्री आहे कीं पुढें बोलणारही नाहीं. ब्रीतिश सरकारच्या अमला पासून आम्हाला मिळालेल्या असंख्य हितावह गोष्टी आमच्या पूर्ण ध्यानांत आहेत व त्या बद्दल आम्ही आपली कृतज्ञता कधीं कमी होऊं देणार नाहीं. आमची कुरकुर फक्त जे हक्क मिळण्याच्या योग्यतेला आम्ही आलों आहों ते आह्माला द्यावे येवढीच आहे मग या तक्रारीला आणि या गाऱ्हाण्याला आमचे द्वेषी राजद्रोहा सारखी पाहिजे ती का भयंकर नांवें देत ना? आम्हाला तिकडे लक्षच देणें नाहीं. यद्यपि इंग्रज सरकारच्या सांप्रतच्या राज्य व्यवस्थेंत शेंकडों व्यंगें आहेत तथापि आमच्या देशाच्या सुधारणेला व कल्याणाला त्याची अवश्यकता अझून आहेच; व त्यासाठीं आह्मी आपल्या कडून ते शाबुत व सुरक्षीत ठेवण्यासाठीं आह्माला योग्य दिसतील तें प्रयत्न करूंच. परंतु येवढ्या वरून आह्मी डोळे मिटून होतील ते अन्याय व जुलूम ईश्वरदत्त ह्मणून सोसणार नाहीं. आमच्या गाऱ्हाण्यांना अखेर पर्यंत दाद मिळाली नाहीं तरी हरकत नाहीं, परंतु जो पर्यंत या राज्यव्यवस्थेंतील कांहीं भ्रांतिमूलक व लज्जास्पद दोष दूर झाले नाहींत तोंपर्यंत त्यांचें निरसन होण्याकारितां आह्मी सर्व राष्ट्राचे विचार एक करून दयाळू महाराज्ञी जवळ दाद मागण्याचें व न्यायाला आमचे पायोनियर साहेब "चळवळ" ह्मणतात तें करण्याचें सोडणार नाहीं. काय चमत्कार आहे पहा कीं, आमच्या या देशांत परदेशांतून येऊन केवळ अधिकाराच्या बळावर पायोनियर साहेबांचे देशबंधु हवा तसा जुलूम करितात व मानवी जातीला लाज आणणाऱ्या अशा भयंकर गोष्टी करून आपण स्वतः साळसूदपणें सावासारखे सुटून गरीब बिचाऱ्या प्रजेस आपल्या कर्मांचें उलट प्रायश्चित्त भोगण्यास लावितात. वास्तविक पहातां या प्रकारच्या दररोज घडून येणाऱ्या गोष्टी कसाही शांत स्वभावाचा मनुष्य असला तरी त्याचें पित्त खवळण्या जोग्या आहेत. असें असतां आह्मी त्या सर्व मुकाट्यानें सहनकरून घेऊन कालावर दृष्टि देऊन राहतों तरी पायोनियर साहेबासारख्यांची बडबड नेहमीं सुरू असतेच मग जर युरोपांतील इतर राष्ट्रांप्रमाणेंच किंवा पायोनियर साहेबांच्या देशांशीं लढण्या करितां कंबर बांधून तयार असलेल्या आयर्लंडाप्रमाणें नेहेमीं हातघाईवरच येत असतों तर मग आमची काय दशा होती कोणजाणें. असो आतां पायोनियर साहेबांना आमचें सांगणें ह्मणून येवढेंच आहे कीं त्यांनीं असले अविचारमूलक लेख लिहिण्यापूर्वीं चांगला विचार करावा. केवळ आपल्याच ऐटींत किंवा लेखणीच्या जोरावर दुसऱ्यांच्या मनास लागणारे असे दोषारोप त्यांवर करूं नयेत हें त्यांना भूषणास्पद असून यांत त्यांचे कल्याण ही आहे.

# The Berar Samachar

**MONDAY 13 SEPTEMBER 1886**

In Bansila's case two wituesses were examined by the prosccution on Monday last, and cross examined by Mr. Branson and Mr. Deorao Vinayaka. As there cropped up curiously enough a charge for murdes against Bansilal and Ramji Bhagwat, a gumashta of Bansilall's step-mother both the accused were sent to Nagpur on Tuesday and the cases before Mr. Hare adjourned *sine die.*

we learn the accused have been released on Bail st Nagpur so for as the charge for murder concerned.

The correspondent under the "*none de plums* of a 'son of Mars has sent a letter to our contemporary of the Nagpoor News in reply to certain statements which appeared in that paper some days ago from the pen of its famous correspondent Judex. The writer is of course a European and the strain in which he has written the letter is characteristic of his race. He has taken Judex severely to task for taking so much interest in a case which, according to him ought to have died a natural death at once. He has also inflicted a few of the lashes of his offended dignity upon those of the native papers who had given publicity to the matter in their columns. These papers, says the redoubtable son of Mars "rush into print with a lengthy article or short parigraph, according to their abilities to correct a thrilling story about *something* that originated out of *nothing*." Indeed, Master Mars; the matter was really of very little consequence to your people who have the heaven born privilege to perpetrate such heinous crimes with impunity or to those of the natives who are inured to the every day occurrences in the Tea and Indigo planatations of Asam where European culprits are shame fully left unpunished even after the perpetration of inhuman and atrocious crimes of rape and murder; but to the natives of the other parts of India and especially to those of Berar where the case was the first of its kind nothing was more *exciting* or *thrilling*. We should fain like to ask Mr. son of Mars whether, either in the interests of the rulers or the ruled it would be desirable that cases like these should be hid away from public ken; and whether, on the contrary it is not highly expedient that the perpetrators of such crimes (we beg our friend's pardon for using the word crime, for in his opinion it was no crime at all)should be so intimidated as to be thereby induced to obtain from such high-handedness and oppressive in future. Our friend the son of Mars apparantly thinks these are virtues, and quite whines over the prospect of his poor friends wickedly intimidated from practising them by some of us wretched Indians. It is really too good of our friend.

Our friend also tries to envelop the whole matter concerning his friend the Sergant in mystery and professes that the ins and outs of the case are known only to himself. Let us, however, assure him that the case is no more a secret and

there is no mystery about it now. Let him therefore not flatter himself that his friend's innocence is fully established because he could manage to escape scot free from the grasp of justice. There are times when Justice is, for some reasons or others, induced to withdraw her nice hand from the exercise of her duty. In spite, however, of such occasional casualties Truth shall always prevail and offenders in cases like the present or the sad Jorehat coolie rape case, shall always be looked up on as monsters in human form.

---

We quote the following extract from Lord Reay, the Governor of Bombay's speech which exhibits his genuine love for kunbis and their welfare. It is a too warm defence of the policy of Survey Department, occasioned probably by the hue and cry raised against it by the outside public. It is a blessing to have Lord Reay as Governor.

"I have always lived among farmers and the result is that I have the strongest sympathy with them. My great is that I cannot freely converse with the kunbis and hear from their own lips what I know would be very shewred remarks. If I could talk to them I should strongly urge them to make use of the increased opportunities for their education which Government is creating for them to improve their tillage and their own condition by assiduous thrift. I should also tell them that the Government are directly interested in promoting their prosperity and are willing to remove any real obstacle to their improvement. As I could not communicate ...ih the kunbis, I asked an ...an gentleman who thoroughly understands the working of the Survey and Settlement Department what grievances could be adduced. He wished to have numbers consolidated so that the o...or should not be obliged to keep up the boundary marks which come in the way of cultivation, and he wished to allow the ryot to take earth to the village to build his own cottage, when by such removal the agricultural value is not afiected, and he thought there would be no necessity to reconsider groups. The two former points are not materials, the latter is for the same reason that profits of agriculture in the same group may during the term of a settlement become dissimilar and in such a case it would distinctly be injurious for the ryots to remain linked under dissimilar conditions. I do not wish hon'ble members to consider my remarks as a vindication of the work done by a department which is animated by the strongest sense of what is due to the ryot, which besides has excluded from its operations anything which could be called haphazard or arbitrary. Perhaps that is the very reason why those who do not care for accuracy and precision dislike it so much, but it would be the height of ingratitude if Government did not recognise the valuable assistance which it has received from this department for the very purpose of improving the condition of the ryot, and where the ryot has suffered or will suffer eventually, it will be due to interference with the arrangements of a department which has not only his present but his future welfare at heart. To this conclusion I have come not lightly; as I said before I have a weakness for the prejudices of kunbis, I quite understand that the appearance of the classes on their fields causes them anxity, I hope the kunbis will take my advice as friendly, all the more because some lands of my own are being reclassified at this moment elsewhere on prime pleas which I do not think would commend themselves to the Survey and Settlement Department of the Bombay Presidency; to whom I would willingly appeal if allowed to do so. In watching carefully the methods, the spirit of various departments of the Administration, the last department which I would select for hostile criticism from the kunbi point of view would be this one. I have not dealt with ancient history, I dare say errors were committed in the past as errors are committed in the present, which future administrations will rectify. Nothing will gratify the department or Government more than to have defects pointed out which may still exist in the machinery. We have only one desire that it should more and more be the protector of the kunbi against unequal and unjust taxation.

---

TIME ALLOWED THREE HOURS.

PLEADER'S EXAMINATION 1886.

Civial Procedure Code, Limitation Act, and the Provincial Small Cause Court Act!

---

I(a) Under what conditions can a Civil Court authorise the sale of immoveable property in land situated in H. A. D.

(b) What is the authority given to the Deputy Commissioner, the Judicial Commissioner, and the Resident to revise the decree of their Subordinate Court.

(c) Describe fully the persons who may be permitted to appear as recognised agents in the Civil Courts H. A. D.

11 (a) Under what circumstances shall a foreign judgment operate as a bar to a suit in H. A. D.

(b) Explain fully the term decree as used in the Civil Procedure Code.

111 Describe fully the cases in which a suit shonld be instituted in the Court within whose jurisdiction the subject matter is situated, and state where the other suits should be instituted.

1V (a) Explain fully the law as regards the joinder of parties. Under what circumstances can several causes of action be joined?

(b) Mesne profits for 1293 and 1294 Fasli are due to A by B. In 1295 Fasli year A sues B for the mesne profits of the first year only. How can he recover the mesne profits for the second year. Give your reasons for the answer.

V State fully the particulars to be given in the plaint and in the application for the execution of a decree. What memoranda and documents should be presented with the plaint and with such application.

V1 State some of the principal orders which are not applicable under the Civil Procedure Code

V11 Describe fully the procedure which should be adopted when either party to a suit is a minor. In what case can the costs of obtaining an order be thrown on the Pleader of a minor?

V111 (a) Describe a pauper. Under what circumstauces can the application of a pauper to sue in forma pauperis be rejected?

(b) Under what circumstances is the Civil Court bound to order the abatement of a suit and what is the effect of such abatement?

1X (a) State fully the procedure to be adopted when a person applies to be declared an insolvent.

(b) Under what circumstances can a person be declared a bankrupt, but not an insolvent in H. A. D.

(c) What are the distinguishing features of the procedure laid down for declaring bankrupts and insolvents in the H. A. D.

X (a) State the principal modifications with which Act XV of 1877 has been extended to the H. A. D. Explain the terms:- Trustee, Single Bond, and contruning Breach of contract, as used for the Indian Limitation Act.

(b) Describe the term Easement. State fully the circumstances ander which the right to an Easement can be acqnired and the case in which the reversioner of the servient tenemement is affected thereby.

X1 (a) State fully the circumstances under which a foreign Rule if Limitation can be set up as a defence to a suit instituted in the H. A. D. and a suit against a trustee or his assigns can be comefarred by Limitation.

(b) What is the effect of legal disability in a suit to enforce a rght of pre-emption, and on what grounds.

(c) State fully the circumstances under which the period of Limitation is affected by, fraud payment of interest and part payment of the principal debt.

X11 a What Courts have concurrent jurisdiction with the Courts of Small Causes in the Mofussil?

b How far is the decree of the Court of Small Causes final? State fully the procedure, the circumstances, the period of Limitation and the reasons for setting aside, allowing retrial reviewing or revising such a decree.

c What Court is the High Court under Act X1 of 1865 as extended to the H. A. D, and who can decide references made by the Judges of the Courts of Small Causes in this Province and under what authority?

---

THREE HOURS ALLOWED.

PLEADER'S EXAMINATION H.A.D 1886

HINDU AND MAHOMMEDAN LAWS.

---

1 (a) What is the nature of the customary law which is held binding among the Hindus in H. A. D.

(b) State some of the important sources of the Hindu law,

11 (a) How far does the Hindu law allow second marriages of women and their divorce?

(b) What are the rules of exogamy and endogamy limiting the selection of persons to be married to each other?

111(a) What persons are competent to give among a child in adoption?

(b) What persons are qualified to be taken in adoption?

---

## वऱ्हाड.

हवामान— अलीकडे बरेच दिवसांत पाऊस पडला नाहीं, दिवसा सोसाट्याचा वारा वाहतो, ढग येऊन जातात, अमांष, पोटदुखी, पडसे वगैरे तुरळक रोग सुरू आहेत.

नागपुर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांनीं रा. मनी भागवत यास १००० रु० ची जामीन घेऊन व रा० बनसीलाल यांस ८००० रु०ची जामीन घेऊन खुले केले आहे. मे० हेअरसाहेबांनींही रा. बनसीलालास ५००० रु०चा जामीन घेऊन खुले केलें. नागपूर कडील खटल्याचा अजून निकाल झाला नाहीं.

येथील स्टेशनावरील मेल एजंट ( पोस्टमास्तर ) रा. रामप्रसाद यांच्यावर तारीख १० शुक्रवारी रात्रीं मोठा दुर्धर प्रसंग आला होता परंतु तो ईशकृपेनें टळला. तो प्रकार असा:—

स्टेशना जवळील नुकत्याच आलेल्या 'रेस्टकांप' मधील 'सारजंट' मदीरापान कीं काय करून कोणजाणें, त्या रात्रीं अकरा वाजता मेल एजंट ह्यांच्या घराजवळ जे दुसरे गृहस्थ कुटुंबासकट राहातात, त्यांचे दार लोटावयास लागले, तेव्हां मेल एजंटानीं त्यांस 'हा आपला कांप नाहीं पलीकडे आहे इ०' समजून सांगितले. त्यावरून साहेबांस राग येऊन एकदम त्यांच्या घरांत शिरले व हातात नागवी तलवार होती तिनें त्यांचा पुतण्या जवळच निजला होता त्याजवर वार केला; परंतु तो सुदैवानें चुकला व मेल एजंट साहेब ही संधी पाहून त्या काळाच्या हातून सुटून गेले व कांपच्या पहारेकऱ्यांस वर्दी दिली. पहारेकरी लोकांनीं येऊन मोठ्या प्रयासानें त्यांच्या हातातील तलवार हिसकाऊन घेतली व त्यास अटकेंत ठेविलें.

हल्लीं साहेब त्यांच्या अटकेंत आहेत, पुढें न्याय देवता काय न्याय देतें तें पहावें.

रा. रा. भास्कर महेश्वर लेले ए० अ० क० यवतमाल हे अतिशय आजारी असल्यामुळें येथे येऊन राहिले आहेत ईश्वर त्यास लवकर बरें करो.

यंदाच्या म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षे करितां अकोल्याहून अदमासें १२ व उमरावतीहून ११ असे २३ विद्यार्थी मुंबईस जाणार आहेत असें कळतें.

---

## वर्तमानसार.

धुलिपसिंगास एडन येथें अडकवून ठेविलें हें हिंदुस्थान सरकारानें फार वाईट केलें, असें पुष्कळांचें ह्मणणें असून त्याबद्दल पंजाबांत मोठी चळवळ सुरू झाली आहे. या संबंधानें पंजाबांत एक बिनपगाचा जाहिरनामा असा प्रसिद्ध झाला आहे कीं, सर्वांनीं आपसांतील वाकडीं एकीकडे ठेऊन या फिरंगी जुलमी लोकांस घालवून देण्याकरितां सर्वांनीं एकत्र व्हावें; हिंदुस्थानांत येण्याकरितां रशियाची फार मोठी फौज हिरात येथें येऊन दाखल झाली आहे; महाराज धुलिपसिंग हें रशियाकडे मिळाले असून या फौजे बरोबर फौजेचे मुख्य म्हणून आहेत; काबूलचा अमीर जरी इंग्रजांस अनुकूल आहे तरी त्याची प्रजा इंग्रजांचा तिरस्कार करणारी आहे. या जाहिरनाम्याच्या शेंवटीं असें लिहिले आहे कीं हिंदुस्थानच्या हद्दीवर इंग्रज व रशियन यांची लढाई सुरू होणार असल्यामुळें महाराज व रशियन यांस मिळणाऱ्याचा फायदा होणार आहे. यावर लाहोरचा पत्रकर्ता ह्मणतो कीं, हा कागद जरी खोटा व बनावट असला तरी त्या पंजाबी शूर लोकांचीं मनें यावरून दिसून येतात.

काबुलेच अमीर रशियन सरकाराशीं लढण्याची तयारी करीत आहे.

मि. क्रोल यांस नार्थ मलबारचे सेशन जज्जनेमिलें असें मद्रासचे सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

कोहिनूर पेक्षा चौपट मोटा असा व्हिक्टोरिया नांवाचा एक हिरा केपमध्यें सांपडला. तो महाराणी साहेबांच्या राज्यास ५० वर्षे पुरी झाल्याबद्दल जो समारंभ होणार आहे त्या समयीं त्यांस नजर करण्यास्तव हल्लीं लंडन येथील प्रदर्शनांत ठेविला आहे.

सन १८८० पासून ८३ आखेर पर्यंत, चार वर्षांत सिमल्यास सरकारी कामगारांना जाण्यायेण्याचा खर्च २९,२७,००० रु झाला असें म्हणतात.

जंगलखात्याची व्यवस्था रेव्हेन्यू खात्याकडे देण्याचा सरकारचा विचार आहे अशी वदंता आहे.

तुर्की सरकारानें सर्व मुसलमान धर्माच्या लोकांनीं लष्करांत नौकरी केलीच पाहिजे असा ठराव करून ९२,००० नवीन लष्कर पाठविण्याचा विचार केला असें ह्मणतात.

फ्रांस देशाच्या सरहद्दीवर जर्मन सरकारानें खबुतरांच्या साह्यानें बातमी आणण्या नेण्याची व्यवस्था केली आहे असें ह्मणतात.

बंगाल इलाख्यांत नदिया जिल्ह्यांत मि. बा. डा. पाल चौधरी यांनीं यंत्रानें पितळेची भांडीं करण्याचा एक कारखाना स्थापित केला हा फार उत्तम प्रकारें चालला आहे असें म्हणतात.

सर. जमशेट जीजीभाई यांस इराणचा शाहा हे सोन्यानें पदक देणार आहे, तें त्यांस धारण करूं द्यावें असे राणी सरकारानें हिंदुस्थान सरकारास लिहिलें आहे.

थीबा राजे साहेबांनीं रत्नागिरी शोभिवंत नाहीं व तेथें विंचूं व सर्प हे पुष्कळ आहेत यास्तव आपणास दुसरें ठिकाणीं नेऊन ठेवावें व आपणांस ब्रह्मदेशाच्या गादीवर पुनः बसवावें कारण मांडलें येथून निघतांना आपणास व्हाइसरॉय साहेबांस भेटण्यास्तव हिंदुस्थानांत जावयाचें असून पुनः तीन महिन्यांनीं परत येण्यास मिळेल असें सांगितलें होते अशा अशयाचे एक विनंती पत्र व्हाइसरॉय साहेबांस पाठविलें आहे असें सांगतात.

दोन तोळे राकेल आणि दोन तोळे थंडपाणी एकत्र करून तें तीन चार दिवस द्यावें. ह्मणजे हीवज्वर जातो. गरीब लोकांस हे औषध फारच उपयोगाचें आहे. पांच सात मनुष्यांस वरप्रमाणें औषध देऊन आमचे एका मित्रानें अनुभव घतला आहे.

मि. साम्युअल स्मिथ यांनीं ब्रह्मदेशाशीं लढाई चालवूं नये व तेथील लढाइचा सर्व खर्च हिंदुस्थानावर घालूं नये अशी जी सूचना केली होती ती बहुमतांनीं हौस आफ कामन्समध्यें नामंजूर झाली.

प्रिन्स आलेक्झांडर हे टिर्नोव्हा येथें जाऊन पोहोंचलें.

विलायतेंत जान बेनर नांवाच्या मजुराचा एक कुत्रा आहे त्यास दारू पिण्याची चटक लागली आहे तो कुत्रा एरव्हीं अगदीं गरिबा प्रमाणें असतो, परंतु एक वेळ त्यानें मद्यपान केलें म्हणजे मग तो काय करील व काय नाहीं याचा कांहींच भरंवसा रहात नाहीं असें म्हणतात.

जबलपूर येथील पोलादाचा व लोखंडाचा कारखाना फार उत्तम प्रकारें चालला आहे असें ह्मणतात.

अर्धागिनी किंमतीचे खिशांत घालतां येईल असे एक शिवण्याचे यंत्र निघालें आहे.

ऐरलंडचे तर्फे मि. ओ. ब्रियन, मि. रेडमंड व मि डीली असें तिघे वकील मुक्काम क्वीन्सटौन येथें आगबोटींत बसून न्यूयार्कास गेले. या वेळच्या भाषणांचें तात्पर्य तूर्त संकट आहे; परंतु त्याची पर्वा न करितां सोसावयाची आहे, आपलें कार्य न्यायाचें व सत्याचें व त्यास सर्वजगाचें समत्त मिळालें आहे तस्मात् ते लवकरच सिद्धीस जाईल. ऐरलंडास स्वातंत्र्य मिळेल व जमीनदार लोकांचें समूळ उत्पाटन होईल अमेरिका व आपलें ऐरिश बांधव आपल्यास सर्व प्रकारें मदत करतील. इंग्लंडांत ऐरिश लोकाची संख्या सारी पन्नास लक्ष आहे; परंतु अमेरिका, कानडा व इतर ठिकाणीं मिळून तीन साडेतीन कोटी ऐरिश लोक आहेत आणि त्या सर्वांचें ऐरलंडाच्या स्वातंत्र्याकडे लक्ष लागून राहिलें आहे. शिवाय अमेरिकेचें सहाय्य आहे असें ते बोलले. तेव्हां इंग्लंडानें केवळ थोड्या जमीनदारांच्या स्वार्थाकरितां इतक्या लोकांस दुखवावे हें चांगलें नाहीं. ऐरिश लोक धडधडीत ह्मणतात कीं ग्ल्याडस्टन साहेबांच्या ह्मणण्यास ते आमच्या विशेष हिताचे नसतां आह्मीं मान्य केलें याजवरून आह्मी समजण्यास व शांत प्रकारें मित्रत्व राखण्यास कबूल आहों असें दाखविलें. परंतु सक्तीनें व जुलमानें आह्मी कधींच आकळलें जाणार नाहीं. हें इंग्लंडानें पक्कें समजून रहावें, स्वातंत्र्य, न्याय व सत्य याज करितां ते तनमन धनादि सर्वस्व वेचावयास तयार झाले आहेत. तीन साडेतीन कोटी लोक असे निकरावर आल्यावर उभयतां इंग्लंड व ऐरलंड यांचे बरें होणें कठीण आहे. गरीब व अनाथ शेतकरी लोकांची दुर्दशा पाहून त्यांचें पार्लमेंडळ देखील ऐरलंडास स्वातंत्र्यच मिळालें पाहिजे असें बोलावयास व त्या उद्योगास मदत करावयास लागले आहेत, इंग्लंड दांडगाई करून आपल्या हातानें आपल्या पायावर दगड पाडून घेणार असें दिसतें. सु० प०

धारवाड येथून हैसूर ( मद्रास ) पर्यंत निराळी एक रेलवे लाईन बांधण्याचें ठरलें असून तें काम सदर्न मराठा रेलवे कंपनीनें आपणाकडेस घेतलें आहे. धारवाडा पासून राणीबिनूरपर्यंतच्या लायनीची सुरूवात लौकरच होईल असें एका विलायती पत्रावरून कळतें.

हिंदुस्थानचे मांजीस्टेट सेक्रेटरी लार्ड किंबरली यांनीं केलेल्या भाषणामध्यें हिंदुस्थानांतील लोकांशीं इंग्लिश लोकांचें कोणत्या प्रकारचें वर्तन असले पाहिजे अशा विषयीं चार शब्द सांगितले ते फारच थोरपणाचें असल्यामुळें ते आह्मी आपल्या वाचकांकरितां येथें सादर करितों; "हिंदुस्थानांत जाणाऱ्या इंग्लिश लोकांनीं त्या देशांतील लोकांशीं अगदीं नेहमीं उत्तम प्रकारचें वर्तन ठेविलें पाहिजे. कारण त्या देशाचा राज्यकारभार करण्याकरितां जे इंग्लिश लोकांची नेमनूक होते त्यांचें तेथील लोकांशीं वर्तन आपल्या राष्ट्राच्या सत्तेस श्रेयस्कर किंवा हानिकारक होणार आहे. तेथील लोकांशीं जर त्यांचें वर्तन प्रीतीचें, दयेचें व न्यायाचें असेल तर त्या पासून त्या असंख्य लोकांच्या मनांत आपल्या विषयीं प्रीतीभाव उत्पन्न होऊन राष्ट्रास विलक्षण प्रकारची बळकटी येणार आहे. बरें तेंच यांचें वर्तन ह्याच्या विरुद्ध प्रकारचें असल्यास त्याच असंख्य लोकांच्या मनांत आपल्या विषयीं द्वेषभाव उत्पन्न होऊन आपल्या राष्ट्रास मोठाच अपघात होण्याचा संभव आहे. आमची राज्य सरणी, आमचे कायदेकानू हीं कोणत्या प्रकारची असोत, सर्व इंग्लिश कामदार जर तेथील रयतेशीं योग्य प्रकारचें वर्तन ठेवितील तर एवढ्याच गोष्टीनें इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन देशामधील हल्लींचें नातें कायम राहून स्नेहभावामध्यें कधींच खंड पडणार नाहीं. प्रत्येक इंग्लिश कामदारानें हिंदु प्रजेस योग्य प्रकारें वागविण्याचा क्रम ठेविल्यास तो तितक्या अंशीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेच्या स्थिरतेस व उदयास कारणीभूत होणार आहे." ने० ओ०

नव्या ब्रह्मदेशांत पब्लिक वर्क्स खात्यांतून दहालाख रुपयांनीं नवीं कामें करण्याची हिंदुस्थान सरकारानें मंजुरी दिली आहे.

चीनच्या हद्दींत ख्रिस्ती लोकांवर हल्ले करण्याचें काम पुन्हा सुरूं झालें आहे, व त्यांचीं कित्येक खेडीं विध्वंस करून टाकिलीं.

अफगाण सरहद्दीच्या संबधानें नऊ हजार चौरसमैल जमीनीचा वांधा पडला होता. त्यापैकीं सात हजार चौरसमैल जमीन रशियास मिळून दोन हजार चौरसमैल जमीन काबूलच्या अमीरास मिळाली.

√ धुलिपसिंगास एडन येथें अडकवून ठेविलें हें हिंदुस्थानसरकारानें फार वाईट केलें, असें पुष्कळांचें ह्मणणें असून त्याबद्दल पंजाबांत मोठी चळवळ सुरूं झाली आहे. या संबंधानें पंजाबांत एक बिन सहीचा जाहीरनामा असा प्रसिद्ध झाला आहे कीं, सर्वांनीं आपसांतील वांकडीं एकीकडे ठेऊन या फिरंगी जुलमी लोकांस घालवून देण्याकरितां सर्वांनीं एकत्र व्हावें; हिंदुस्थानांत येण्याकरितां रशियाची फार मोठी फौज हिरात येथें येऊन दाखल झाली आहे; महाराज धुलिपसिंग हे रशियाकडे मिळाले असून या फौजेबरोबर फौजेचे मुख्य ह्मणून आहेत; काबूलचा अमीर जरी इंग्रजांस अनुकूळ आहे तरी त्याची प्रजा इंग्रजांचा तिरस्कार करणारी आहे. या जाहिरनाम्याच्या शेवटीं असें लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानच्या हद्दीवर इंग्रज व रशियन यांची लढाई सुरूं होणार असल्यामुळें महाराज व रशियन यांस मिळणाऱ्यांचा फायदा होणार आहे. यावर लाहोरचा पत्रकर्ता म्हणतो कीं, हा कागद जरी खोटा व बनावट असला तरी त्या पंजाबी शूर लोकांची मनें यावरून दिसून येतात.

कलकत्याहून जी नवीफौज ब्रह्मदेशांत जाणार आहे त्या करितां कलकत्यास साहा आगबोटी नवीन भाड्यानें घेण्यांत आल्या आहेत.

एर्लंडांत तूर्त सक्तीचे उपाय सुरू करूं नये असे जें मि. पार्नेलचें ह्मणणें तें ता. २७ रोजीं पार्लमेन्टांत बहुमतानें नामंजूर झालें. ओ०

## नोटीस.

सुर्यभान वल्लद गुणाजी बेले रहाणार गाडेगांव खुर्द तालुके जळगांव यांस नोटीस देणार हरी सिताराम कुळकर्णी रहाणार सावरगांव तालुके जळगांव. या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं, तुम्ही आमच्या पासून कर्जाऊ रुपये ९०० घेऊन त्याजबद्दल आमचेकडे तुमचें शेत. व घर गहाण ठेऊन रुपये घेतले आणि याजबद्दल दस्ताऐवज रजिष्टर ही करून देऊन तो दस्ताऐवज दिला. आतां आपल्या वडील रुपयांची मुदत झाली आझांत रुपये ठेवण्याची सोय नाहीं याजकरितां ह्या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं, नोटीस पावल्या पसून आठ दिवसांनीं रुपये मुद्दल व व्याज सुद्धां आणून द्याल तर न दिल्यास रीतीप्रमाणें काम चालवून ह्या नोटीसीचे खर्चा सुद्धां अखेर निकाल होईपर्यंत जे नुकसान होईल ते सर्व भरून घेतलें जाईल कळावें.

आतां सदरहु दस्ताऐवज रजिष्टर झालेला आमचे घरांतील कांहीं कागदपत्र घायाळ झालें त्याजमध्यें हा दस्ताऐवज ही घायाळ जाला आहे. तर रजिष्टर कचेरींतून दस्त ऐवजाची नक्कल घेऊन आपणावर काम चालविलें जाईल. व याजबद्दलचाही खर्च आपणास द्यावा लागेल. कळावें तारीख ८ माहे सपटंबर सन १८८६ इसवी.

( सही ) हरी सिताराम तर्फे
मुखत्यार गोपाल नागोराव दस्तुर
खुद.


## तयार आहे
## हिंदुधर्म शास्त्र-भाग १ व २

( दुसरी आवृत्ति )

नामदार रा. सा. वि. ना. मंडलीक सी. एस. आय. यांचे.

किंमत ८ रुपये व हांशील आठ आणे पत्रें ( किंमतीसुद्धां ) ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरील पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीसाठीं ठेविलीं आहेत. व० स० कर्ते.


☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० के०

सहामाही ... ३ ... " ... ८
साल अखेर " ७ " " १८८
किरकोळ अंकास.................. ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस .........८१

Per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly........... 3 " 8 as
Single copy.............................. 4 as

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERARSAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 20 SEPTEMBER 1886 NO 37

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख २० माहे सप्टेंबर सन १८८६ इ० अंक ३७

Look for our name.
Save your trouble! Save your trouble!
BROWN & MURRAY'S.
PORTABLE SCIENTIFIC COOKING STOVES
Require no oil, Require no spirit.
Useful Requisite for every household and Inestimable boon both to Rich and poor.

1 Charcoal Ball or 3 Charcoal Cakes. Will suffice for the Napolean Patent stove to prepare any 2 lbs. of the followings in 5 minutes *viz*, Tea, Coffee, Milk Sago, Arrowroot, Barley, &c.

2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes-2 Charcoal Cakes. Will take for the Dick's Patent or Pocket Stove to prepare any 1 lb. of the following in 3 minutes--*viz*, Tea ,Coffee, Milk, Sago, Arrowroot, Barley, &c.

1 Pice Charcoal. Ball or 1 lb. coal Will be enough for the Tourist Patent stove to prepare any four of the following, in 30 minutes, *viz*, Rice, Curry, Cultet, Stew, Pudding, &c.

BROWN & MURRAY'S STOVES give rise to no disgusting smell and smoke as they are in general with other valuable Stoves. Their Stoves are perfect, most economy in Cookery, and require no setting of brickwork. They can be placed, in time of Cooking anywhere even on a Table, Sofa, Chair, &c., without the least fear of catching fire; and cooking can also safely be executed on a running car. BROWN & MURRAY'S STOVES are not only valuable helps to the INVALIDS and INFANTS for procuring HOT TEA and WARM MILK, but on the whole they are HAPPY PARTNERS to all sorst of men for the preservation of life.

*Packing as. 4 postage extra.* R. A p.
With direction each Napolean

| | R. | A | p. |
|---|---|---|---|
| Patent...................... | 2 | 8 | 0 |
| Pocket Stove............... | 3 | 8 | 0 |

*Packing as. 6 Postage extra-*
With direction, each, Tourist

| | | | |
|---|---|---|---|
| Patent. large............... | 6 | 0 | 0 |
| Do. small.................. | 4 | 8 | 0 |

LIBERAL COMMISSION TO WHOLESALE PURCHASERS AND AGENTS.
Wanted Agents at every post town.
Can be had only.
H. NATHANIAL & CO.
*WHOLESALE MERCHANTS AND COMMISSION AGENTS.*
SEALDAH, CALCUTTA E. C.
Ask for "BROWN & MURRAYS" Stoves and take no other.
See that the Stoves you buy bear our brass lable.
*Testimonials from the Reverends and others free on application.*
Best always cheapest.

ASHU'S POWDER.
Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, 8 per phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G. B. SHAW'S SAMARITAN DROPES
Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the stomach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-
Asthma, Shortness of breath, Coughs, Dropsy, Worms, Gravel, Chronic fevers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhæa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-
Burns, Ulcers, Malignant Sores, Ringworms, Itches, Tetters, Chilblains, Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.
*Full directions for use accompany every phial.*
Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packing and postage As. 12. extra.
Wanted Agents, apply to
Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* — A. T. Mookerjee' *Proprietor.*

## जाहिरात.

सर्व लोकांस असें कळविलें जातें कीं सूर्यभान वल्लद गुणाजी बेले राहाणार गाडेगांव खुर्द यानें सिताराम गंगाराम कुळकर्णी राहाणार सावरगांव ताळुके जळगांव याजपासून रुपये ९०० नऊशे कर्ज घेऊन त्याजबद्दल दस्तऐवज करून दिला. व रुपयाबद्दल शेत व घर गाहाण दिले. व दस्तऐवज रजिष्टर ही करून दिला. परंतु हा दस्तऐवज आमचे पासून घायाळ जाहाला आहे तर कोणास सांपडला असेंल अगर सांपडेल त्यानें आह्मास आणून द्यावा. ह्मणजे आणून देणारास रुपये २५ इनाम दिले जातील कळावें तारीख ८-९-८६ इसवी.

हरी सिताराम फुळकरणी तर्फ मुखत्यार
गोपाल नागोराव दस्तुर खुद्द

## नोटीस.

उकर्डा मयत वारस पुत्र रायभान वल्लद उकर्डा रहाणार खोबरखेडे तालुके अकोले यांस नोटीस देणार रावजी वल्लद विक्रमजी राहणार घुसरवाडी तालुके आकोलें. या नोटीशीनें असें कळवितों कीं, आम्ही मयत उकरडा याजपासून कर्जाऊ रुपये १२४ एकशे चोवीस दर शेकडा २ दोन रुपये व्याजा प्रमाणें काढिले होते व सदरहु रुपये १२४ आम्ही मयत उकर्डा याजपाशी व्याज व मुद्दल सुद्धां मिळून एकंदर १४२ एकशे बेचाळीस दिले यास साक्षीदार भीवसन वल्लद भगवान पाटील कारभारी रहाणार लाखंडे खुर्द व शामजी वल्लद गंगाजी कोळी रहाणार महातोडी व रुपये दिल्या बद्दल आह्मी पावती व कर्जरोखा मागितला परंतु मयत यानें असें सांगितलें कीं, कांहीं कागद नाहींसे जहाले. त्यांत हा कर्जरोखा नाहींसा झाला. नंतर रुपये पावल्या बद्दल पावती देतो म्हणून मयत म्हणत होता परंतु एकदम मांदगी येऊन उकर्डा हा मरण पावला नंतर वारस रायभान यांस ही आह्मी पावती मागितली. आज देऊं उद्या देऊं असे आजपावेतों सांगत आला; व दस्तऐवज नाहींसा झाला म्हणून मयत यानें व वारस यानें सांगितले होते. परंतु तपासा अंतीं समजते कीं, दस्तऐवज आहे आणि आह्मास रुपये पावल्याबद्दल पावती देतो म्हणून मयत व वारस हे बहुत दिवस सांगित होते याजबदल साक्षीदार आहेत. ते इसम सूर्यभान कुणबी राहाणर लाखंडे खुर्द व परशराम उदेभान कोळी राहणार लाखोंनडे या उभयतां समक्ष आज पावेतों सांगून वारस रायभान हा अतां असे सांगतो कीं. रुपये पावले नाहीं अम्हीं कर्ज रोख्यावरून फिर्याद करूं वगैरे त्यांस असे कळवीतो कीं रुपये तर आम्हीं व्याज व मुद्दल सुद्धां दिले आहेत. आम्हास कांही देणें नाही. याजकरीतां नोटीस पावल्या पासून चार दिवसांत कर्ज रोखा पाठवून द्यावा न द्याल तर रीतीप्रमाणें काम चालऊन ह्या नोटीसांचे खर्चासुद्धां अखेर निकाल होई पर्यंत सर्व नुकसान भरून घेतले जाईल कळावें. तारीख १३ माहे सपटेंबर सन १८८६ इसवी.

( सही ) रावजी वल्लद विक्रमजी
निशानी खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मित्ती भाद्रपद वद्य ७ शके १८०८

## महत्वाकांक्षा.

मनोविकार शून्य आत्म्याचा जर विचार केला तर तो मूळचा अचल, अजागल, अनिश्चयी आणि कार्य विन्मुख असा आहे. मनोविकारांचा उपयोग पाहिला तर त्याला उत्तेजन देऊन काम करण्यास लावणें, बुद्धीला जागृत करणें, निश्चयाला बळ देणें, आणि इच्छित कार्य करण्यास मनुष्यामध्यें खरी कळकळ आणि सामर्थ्य उत्पन्न करणें, हा होय. ज्या अर्थी मनोविकारांचें काम साधारण हेंच दिसतें त्या अर्थी महत्वाकांक्षेचेंही हेच असावेंसें वाटतें. तीही मनुष्याला मानप्रद आणि कीर्तिकर अशीं कर्मे करण्यास लाविते. परंतु खोल विचाराअंती असेही दिसून येईल कीं ही महत्वाकांक्षा मनुष्यांमध्यें ठेवण्यांत ईश्वराचे दुसरेही कांहीं हेतु असावेत.

हें जग सुरळीत चालावें ह्मणून नवीन युक्त्या निघून जुन्या युक्त्यांची सुधारणा झाली पाहिजे; पुस्तकें लिहिलीं जाऊन पुढील पिढ्यांस तीं मिळालीं पाहिजेत; राष्ट्रें जिंकलीं जाऊन त्यांत सुधारणा झाली पाहिजे. आतां काम करण्यास उत्तेजन देणारें असें सर्व साधारण तत्व मनुष्यमात्राचे ठिकाणीं जर ठेविलें नसतें तर अशीं किंवा अशाच प्रकारचीं दुसरीं सत्कर्मे करण्याचें जे खरे हेतु ते जाणून तीं कर्मे करणारे महात्मे थोडेच असल्यामुळें, जगांत सुधारणा फारच थोडी झाली असती. असें तत्व ह्मटलें तर महत्वाकांक्षा अगर कीर्तीच्या प्राप्तीची इच्छा, हे होय. ही बुद्धीमान् लोकांस आळशी न ठेवितां आपलें बुद्धिसामर्थ्य जगाच्या उपयोगा करितां खर्च करण्यास लाविते आणि हीच पुष्कळ दुर्जनास नकळत आणि इच्छेविरुद्ध स्तुत्यर्ह आणि मानद अशीं कर्मे करण्याच्या भरीस पाडिते. महान् बुद्धिमान् लोकांनांच कायतें महत्वाकांक्षेमुळें उत्तेजन मिळतें; क्षुद्र आणि अकुंचित मनाच्या लोकांनां तर किंचितूही उत्साह प्राप्त होत नाहीं. एकतर आपल्या बुद्धि सामर्थ्याचा कोतेपणा माहीत झाल्यामुळें कीर्तिच्या प्राप्तीविषयीं ते निराश होत असतील किंवा स्वार्थाशीं ज्या कार्यांचा निकट संबंध नाहीं तीं कार्यें समजण्याची पुरती विचार शक्तिच कदाचित् त्यांच्यांत नसेल अथवा जगाला जो खरोखर निरुपयोगी आणि स्वतःला त्रास रूपच झाला असतां असा मनोविकारच ईश्वरानें त्याच्या आत्म्यांत ठेविला नसावा.

ही कीर्तीच्या प्राप्तीची इच्छा मनुष्यांत जर फार उत्कट नसती तर कीर्ति प्राप्त करून घेतांनां येणारीं संकटें आणि ती प्राप्त झाल्यावर तिच्या हानीची ( गमावण्याची ) भीति हींच मनुष्याचें धैर्य खचविण्यास पुरेसीं झालीं असतीं. जगाला आश्चर्य भरित करून टाकणारीं कर्मे करण्याचें ज्यांमध्यें सामर्थ्य आहे असे मानव जातीला भूषण भूत पुरुष किती थोडे सांपडतात बरें. ईश्वरानें समदृष्टीनें सर्व गुण आपणांस सारख्या प्रमाणानें वांटून दिले आहेत. एकांत एक गुण जर पूर्ण तर दुसरा त्यांत बहुत करून कमी असतो, आणि एकांतच सर्व लोकोत्तर गुणांची परिपूर्णता न दाखवितां प्रत्येकाच्या आंगीं चांगलें गुण अंशतः ठेवण्याकडे त्याचें लक्ष विशेष आहे असें दिसतें.

ईश्वरदत्त अशा उत्तम गुणांनीं संपन्न आणि स्वपराक्रमानें योग्यतेस चढलेले अशा मनुष्यांत ज्यांचे गुण इतर लोकांच्या अज्ञानानें, दुराग्रहानें आणि मत्सरानें लोपले गेले नाहींत असें किती थोडे सांपडतील. कांहीं जणांनां उत्तम आणि नीच

कर्से कोणतीं हेंच कळत नाहीं; कांहीं सत कृत्यांवर असत् हेतूंचा आरोप आणितात; आणि कांहीं तर बुद्धिपुरःसर त्यांचा भलताच अर्थ करण्याचें धाडस करितात. परंतु वरील गोष्टीस विशेष पुष्टि आणण्या करितां हेंही सांगणें अवश्य वाटतें कीं कीर्ति मिळविण्या विषयीं जे फार उत्कंठित असतात त्यासंबंधें त्यांचेच प्रयत्न बहुत करून निष्फळ होतात. केटो विषयीं सालस्ट असें ह्मणतो कीं त्यानें कीर्तीची जितकी जितकी कमी इच्छा करावी तितकी तितकी ती त्याला ज्यास्तीच मिळावी.

पुढें चालेल.

---

ता. १८ सपटंबरच्या वैदर्भांत "वऱ्हाड" या सदराखालीं पेठेंतील एका शाळा गृहाच्या संबंधानें जो मजकूर लिहिला आहे त्यावरून कांहीं गैर समज होण्याचा संभव आहे तो न व्हावा एतदर्थ त्या संबंधानें चार ओळी लिहिणें जरूर आहे असें वाटल्यावरून त्या आह्मी आपल्या वाचकांकरितां सादर करितों.

वैदर्भ कर्ते लिहितातः- "ज्याच्या चुकीनें सरकारचें ह्मणजे लोकांचें-हें नुकसान झालें आहे त्याजकडून तें भरून घ्यावें असें लोकांनीं ह्मटल्यास कांहीं गैरशिस्त होईल कीं काय?"

वैदर्भाच्या लिहिण्या वरून सरकारचें किंवा लोकांचें नुकसान कशा रीतीनें झालें याचा चांगलासा बोध होत नाहीं; परंतु त्याचा लिहिण्याचा असा मतलब दिसतो कीं सरकारांनीं ही इमारत निमे किंमतीस म्युनिसिपालिटीला विकली तेव्हां निमे किंमतीचें सरकारचें ह्मणजे लोकांचें नुकसान झालें.

आतां वैदर्भ कर्त्यांनीं थोडासा विचार केला असतां किंवा चांगली माहिती मिळविली असती तर कोणाचें कांहीं नुकसान झालें नाहीं असें त्यास समजून आलें असतें आणि लोकांच्या नुकसानी बद्दल जें त्यांस इतकें वाईट वाटलें तें वाटलें नसतें. टाउनहाला जवळची नवी इमारत इंग्लिश मराठी शाळेस फार लहान व गैर सोयीची होऊं लागल्या मुळें तिचा उपयोग नवीन होणाऱ्या मराठी शाळेकडे करावा असें सरकारानें ठरविलें ही गोष्ट खरी आहे, पण असें करण्यांत सरकारांनीं आपलें किंवा लोकांचें कांहीं नुकसान केलें नाहीं. सरकार व म्युनिसिपल कमिटी यांच्या मध्यें आद्य शिक्षणाच्या संबंधानें जो ठराव झाला आहे त्याप्रमाणें कनिष्ट प्रतीच्या शाळा करितां जो एकंदर खर्च लागावयाचा त्यापैकीं निमे सरकारांनी सेस फंडांतून द्यावा व निमे म्युनिसिपल कमिटीनें द्यावा अशी वहिवाट चालू आहे. नव्या शाळेकरितां नव्या इमारतीची जरूर आहे ती जर अगदीं नवी बांधली असती तर निमे खर्च सरकारानें दिला असतां व निमे म्युनिसिपालिटीनें दिला असता. त्याचप्रमाणें या इमारतीच्या संबंधानें झालें. आतां सरकारानें ही इमारत कमिटीला विकली असें ह्मणणें ह्मणजे सरकारानें आपल्या शाळा निमे खर्च घेऊन कमिटीस दिल्या, आपले मास्तर निमे पगारावर म्युनिसिपालिटीच्या स्वाधीन केले. मुलींच्या शाळेची इमारत कमिटीस फुकट दिली व कादरभाईचें तीन मजली घर निमे भाड्यानें कमिटीस दिलें असें ह्मणण्यासारखें आहे. आतां या सर्व गोष्टींत सरकारचा ह्मणजे लोकांचा खर्च व नुकसान एकेंप्रकारें होत आहे हें खरें परंतु सरकार अविचारी व उघळे यास आमचा व वैदर्भाचा कांहींच उपाय नाहीं!!!

---

## वऱ्हाडांतील शाळाखात्याचा वार्षिक रिपोर्ट सन १८८५--८६.

---

सदरील रिपोर्ट आमच्याकडे येऊन आज बरेंच दिवस झाले, परंतु अनेक कारणांमुळें त्यांचें अवलोकन झालें नाहीं. या बद्दल आम्ही उच्च अधिकाऱ्यांकडून आम्हांकडे तो आला त्यांची क्षमा मागतों—

एकंदरींत पहातां गतसाल शिक्षण क्रमाला बरेंच अनिष्ट गेलें. सन १८८४--८५ साल शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांना जितकें फायद्याचें झालें होतें तितकेंच हें साल वाईट गेलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सिंहस्थ सालची तुंबून राहिलेलीं लग्नें सर्व या सालीं झालीं. त्या प्रमाणेंच महामारी अकाली पर्जन्य वृष्टी वगैरे बरेंच अडथळे मध्यें येऊन आमच्या शाळाखात्यांतील अधिकाऱ्यांचें प्रयत्न जसे सफल व्हावे तसे झाले नाहींत. व त्यामुळेंच या सालीं नवीन शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या जशी व्हावी तशी झाली नाहीं. तथापि आमचे विद्वान डायरेक्टर आफ पब्लीक इन्स्ट्रक्शन मि. जठार यांनीं अशा अडचणींना न जुमानतां आपल्या नेहमींच्या परीश्रमानें व अलौकिक चातुर्यानें व सामर्थ्यानें आणि हाताखालच्या इतर अधिकाऱ्यांच्या मदतीनें आपली बाजू कायम राखून गेल्या रिपोर्टावरून झालेली आपली कीर्ति व लोकांच्या मनांतील पूज्यबुद्धि कायम राखिली हें पाहून आम्हांस फार आनंद वाटतो. आणि वास्तविकच मि. जठार सारख्यांच्या देखरेखी खालीं आमचें वऱ्हाडांतील शाळाखातें दिवसेंदिवस अशा रितीनें सुधारत चाललें आहे हें पाहून कोणास बरें आनंद होणार नाहीं? आरंभीं वऱ्हाडांतील शाळाखातें जेव्हां माजी लोकप्रिय डायरेक्टर राव बहादूर नारायणभाई दांडेकर यांच्या स्वाधीन केलें त्यावेळीं द्वेषी परदेशस्थांनीं बराच काकरव केला एवढी महत्वाची आणि जोखमाची जागा नेटिवांस देणें म्हणजे त्या खात्याचा उघड तोटा करणें आहे असेंही कित्येकांनीं बोलवून दाखविलें. परंतु राव बहादुर दांडेकर यांना जो जय मिळाला आणि शहाणपणा उदार दृष्टी या विषयीं त्यांची जी ख्याती झाली तिच्या योगानें सरकारचें, मन चांगलें होऊन त्यांच्या मागेंही त्या जागेवर नेटीव्हच नेमण्या विषयीं त्याला उत्तेजन आलें मि. जठार वऱ्हाडांतील दुसरे नेटिव्ह डायरेक्टर आहेत व त्यांच्या कारकीर्दीचा हा दुसराच रिपोर्ट आहे. गुदस्त सालचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला त्या वेळेसच यांची चोहोंकडे ख्याति होऊन वरिष्ट अधिकाऱ्यांची यांच्या सामर्थ्याविषयीं खात्री झाली आहे. आमच्या देशांतील सर्व शाळाखात्यांत मोठमोठ्या अधिकारांवर विद्वान एतद्देशीय गृहस्थ नेमल्यामुळें या खात्याची दिवसेंदिवस अधिकाधिक सुधारणा होत चालली आहे व त्यावरून नेटिव्ह लोक मोठाल्या हुद्यांचीं कामें युरोपियन लोकां प्रमाणें बजावण्यांत कमी नाहींत अशी अलीकडे आमच्या सरकारची खात्री होत चालली आहे. व त्यामुळेंच मुंबई इलाख्यांतील मध्यभागाच्या एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या जागेवर रावसाहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन आणि दक्षिण भागांतील त्याच जागेवर रा. महादेव विष्णु काणे यांसारख्या अनुभविक विद्वान गृहस्थांच्या नेमणुका ते करीत आहेत. ही गोष्ट एतद्देशीय लोकांना फारच अभीनंदनीय आहे. तथापि आमची सरकारला एवढीचें विनंती आहे कीं शाळाखात्यासारख्या महत्वाच्या आणि कठीण खात्यांत एतद्देशिय लोक मोठमोठालीं हुद्यांचीं कामें करण्यास समर्थ आहेत अशी जर आमच्या सरकारची खात्री झाली आहे तर हाच नियम इतर खात्यांतील मोठ्या हुद्यांच्या जागांच्या संबंधानें लागूं करण्याविषयीं त्यांनीं प्रचिती पहावी. यांवरून आमचे सरकार इतर खात्यांतील मोठालीं कामें आमच्या लोकांना मुळींच देत नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं. हायकोर्टांचे ज्यज्ज, असिस्टंट कलेक्टर कमिशनर, कायदे कौन्सीलर इत्यादि मोठाल्या जागा आमच्या लोकांतील प्रमुख विद्वान गृहस्थांस कोठें कोठें मिळतात. परंतु त्या नेमणुकांत आमच्या सरकारची जी संशय वृत्ति किंवा बेभरंवसा केव्हां केव्हां दिसून येतो तो येऊं नये. असो. हें बरेंच विषयांतर झालें. आतां प्रस्तुताकडे वळूं.

पुढें चालेल.

---

# The Berar Samachar

MONDAY 20 SEPTEMBER 1886

---

### REPORT ON THE ADMINISTRATION OF THE REGISTRATION AND STAMP DEPARTMENTS H. A. D. 1885—86.

The registration Department shows a steady growth in the number of documents registered; the total being 26,632 against 25049 of last year. There is, as one would naturally expect, an increase in the number of compulsorily and optionally registrable documents regarding immoveable property. The results from a financial point of view are also satisfactory, each Sub Registrar's office having paid for itself with a net surplus of 23,049 Rs. as against 21,389 Rs. for 1884—85. The registration Department was intended to secure to the people the benefits of getting their transaction evidenced in as cheap a manner and with as little trouble as possible. The second object seems to be tolerably secured by the number of registration offices spread over the six districts; but it would appear that the cost of getting documents registered could be made cheaper by 23049 Rs. The Inspector General speaks of having already made some proposals for altering the scale of ad-valorem fees as appears from para 30 of the Report.

The scale of fees has since the Report, been revised, but the fees have not been lowered considerably, as will appear from the comparative table below:—

| Document affecting property of the value or in which the consideration is. | old fees, | revised fees. |
|---|---|---|
| 100 | 0-8-0 | 0-8-0 |
| 200 | 1 | 1 |
| 300 | 1-8 | 1-8 |
| 400 | 2 | 2 |
| 500 | 3 | 2-8 |
| 600 | 3 | 2-12 |
| 700 | 4 | 3 |
| 800 | 4 | 3-4 |
| 1000 | 4 | 3-12 |
| 1100 | ,, | 4 |
| 1200 | ,, | 4-4 |
| 1300 | 5 | 4-8 |
| 1400 | ,, | 4-12 |
| 1500 | ,, | 5 |
| 1600 | ,, | 5-4 |
| 1700 | ,, | 5-8 |
| 1800 | 6 | 5-12 |
| 1900 | ,, | 6 |
| 2000 | ,, | 6-4 |
| 4000 | 10 | 10 |
| 5000 | 12 | 11-4 |

It will be seen that the previous rates were arbitrarily fixed; but on the whole the revision rates are not satisfactorily lessened. There are more documents of the value of 1000 Rs. and less, than the other documents of above 1000; in the case of the former, the fees should have therefore been reduced further than they have been. There is moreover no change in the old and new copying fees; for every 300 words the old copying fee was as. 7—6 + 4as. — 11 as 6 pies; and it is the same now; this could easily be reduced to 6 as for the 300 words and the 4 as could be dispensed with altogether, considering the copying fees for 1885—86 have come up to the not inconsiderable figure of 23,856 Rs. It is to be hoped that some attention would be paid to further reduction in the scale.

The two other alterations noticed are beneficial to the people.

The remarks made by the Inspector General regarding the inspection of the offices of registering offices are very important. It is no doubt incumbent on the District Registrars to inspect the subordinate offices; personal interest in the work of supervision will undoubtedly preserve efficiency in work and secure the public from the many little things that among those that present documents for registration at the subordinate offices. In connection with this may be mentioned the 'promptness in despatch of work spoken of in the Report. We learn that some registrars enter documents as registered on the day of presentation, although as a matter of fact they are registered the next or the third day. All this would be detected more easily by the District Registrar than the Inspector General; and if the District Registrars fail to detect these or similar other little dodges, they fail in a very important part of their duty. The Resident has very Justly called the attention of the District Registrars to their duty in inspecting the subordinate offices.

We have no definite information as to the way in which the Inspector General inspects the offices on tour. But we are told it is the clerk

who goes with him who inspects the registration offices. If this be true, it seems there is serious misapprehension of the proper functions of the officer in very high quarters. We shall soon write separately on the subject.

The Stamp Report shows an increase in the Court fee and general stamp receipts.

Col. Bell seems to think that the people evade the Stamp Law by passing receipts without stamps and that this requires closer scrutiny on the part of the district officers. In other words as people advance in knowledge they become clever at deceipts. This is perhaps a rebuff to the opinion of Sir H. Maine that the morality of the world is progressive. We do not know why Mr. Jones thought of making the sale of one anna stamp a criterion of the administration of the *criminal law* by the District officers.

The remarks with regard to the administration of the Stamp and the Registration Departments show very minute attention to both these Departments.

---

We give below an extract from a letter written by Dr. K. R. Kirtikar to the 'Times of India' on Wednesday 8th September. He has exposed the hollow claims of some of the leaders of social reform and has told the public what staff they are made of. There are many intelligent and educated men who would join with the writes in mocking thesame remarks, in fact the remarks made by him are no means new. They are made daily and we hear them from the mouths of people who have any idea of social reform. The first thing in a reformer is martyrdom Mr. Vishnu Shastri Pandit is pointed out not so much for his zeal for reform but for his bravery in marrying a widow when it came to the point. He did not shirk the responsibility when an occasion came to test his ideas of reform. It is said that an example is a globe of precepts. We believe Dr. Kirtikar has pit the nail on the right head. We are of course obliged to the gentlemen named by him in so far that they are actuated by the best of motives and they are doing good service to the community in various ways.

"I am decidedly against a general or wholesale legislation and against reformers forcing down the throats of ignorant masses their own crude, insincere notions of reform. Those of our educated men who pass under the name of reformers have been not only guilty of inaction but bad action, and I am prepared to prove it. But I don't wish to mix up matters. Reformers want the masses to be forced to do what they with their superior intellect, position and energy have themselves failed to do. They have preached but not practised even when possible. And why? I challenge a reply. Well may I ask Mr. Gopalrao Hari Deshmukh, Mr. Shantaram Narayan and Mr. Waman Abaji Modak, who sign the letter under consideration, whether patent eather boots and trousers are the whole and sole reform? I ask them, with all honesty, to publicly declare f they wish to lead the people in the right direction, whether they have not married their daughters and even their sons at an early age within the last few years? Is it that the light of reform dawned on them on Sunday last only, and is it that their actions are not likely to mislead people and end in their being distrusted by honest workers and practical reformers? Have they tried to prevent early marriages in their own houses, and if they have failed, will they tell us why they have failed? These may be considered personal questions, but I have no desire to bring them forward for any other than that of finding out a remedy for the removal of our social evils, which are painfully many. All I say is if they want reform, let them begin with themselves. People will then, and then alone, honour them, follow them, and if they fail thereafter, sympathize with them. Some of those who sign the letter have not only got their sons and daughters married early, but have done so with grand *tamasha*, bringing into requisition three and four sets of tom-toms, magnificent bridal processions with numerous bands, hundreds of guests, Hindoo and European. Now, Sir, if these helpless reformers had been forced to perform these marriages early on account of uncontrolable domestic and social pressure which they could not overcome, and to remove which they ask for legislation, I should have felt disposed to pity them; but when I know that they could have dispensed with the *tamasha*, I condemn them as insincere. Can the orthodox be ever conquered by such measures? Never. The reformer's action must be bold, sincere, honest. In matters of reform some of the gentlemen who write to you have signally failed; others have admitted failings; some are yet to be tried. The masses can never be led by the two former. They want to be led themselves; let the untried take the lead and profit by their predecessor's failure."

---

Honorable Mr. Telang is explaining certain misapprehensions caused by his views of social reform has concisely restated his opinion as to legislative interference in social matters and as to furthering the cause of reform in early marriage. We give the opinion below as we consider it worth producing.

"I hold that though under certain possible conditions, legislative interference in social matters may be justifiable, the burden of showing such justification always lies heavily on those who call for it in each individual case. In the case of the practice of infant marriage, or, as I prefer to call it, of early marriage, I think such justification has not yet been shown. I consider that the capacity of our community to make the necessary improvements has not yet been fairly tested; I consider it to be at least "not proven" that legislative interference will enable reform in this matter to be achieved more speedily than if the energy of the community itself is relied upon; I consider it to be almost certain that any legislative enactment of the nature suggested will lead to demoralizing practices, and will be rendered futile; and I consider it to be quite certain that in so far as such an enactment is enforced, it will entail almost intolerable annoyance and oppression. With this statement of my opinion, I must content myself for the present, as to state it more fully would require more time than I can spare, and probably more space than you can spare.

In regard to permissive legislation, about which Mr. Malabari also speaks in his letter, his statement is entirely accurate. If any one desires legislation expressly declaring, for instance, that the marriage of a girl, after she has reached puberty, shall be held to be legal in all courts of justice, I am prepared to support such legislation though I think it can only be required if it is required at all, *ex majori cantela*. By such legislation there is no limitation of anyone's liberty, and no coercion of any character whatever. It is in principle similar to the law embodied in the Widow Marriage Act, which I entirely approve, but the practical operation of which itself affords some evidence in support of the view I have ventured to indicate in the early portion of this letter."

---

ACKNOWLEDGMENT

We beg to acknowledge with thanks the receipt of the following.

Report of the Sanitary Commissioner H. A. D. for the year 1885.

---

PLEADER'S EXAMINATION
H. A. D. 1886.
HINDU AND MAHOMMEDAN LAWS.

(Continued from our last issue.)

IV (a) What is the period of minority under the Hindu law? Is this period affected in case a guardian to person and property of minor in Hyderabad A. D. is appointed under Act 40 of 1858? Give your reasons for the answer.

(b) What is the effect of the change of eligiom on the right to the custody of a Hindu minor.

V (a) Describe fully the powers of a father in alienating property as the head of a joint Hindu family either by viva voce or by testamentary disposition.

(b) What persons are entitled to receive and what persons are liable to pay maintenance under the Hindu Law?

VI (a) What property is liable to division on partition under the Hindu Law and what persons are entitled to a share in it.

(b) What are the principles of succession in case of Hindu females? Describe all the women entitled to inherit under the Hindu law,

VII (a) What is the principal source of the divergence between the Sunni and the Shiah Schools of Mahommedan Law?

(b) State the basis on which *Mahommedan* Law is founded.

VIII (a) What share of inheritance is allowed to uterine relations under the Mahommedan Law. Describe all persons who are entitled to inherit as such relations.

(b) A woman dies leaving a husband, two daughters and a mother. Specify the shares in to which the estate of the deceased would be devided according to the Sunni and the Shiah Schools.

IX (a) Describe the women whom a man is prohibited to marry.

(b) What is the authority of a guardian to give his minor ward in marriage under the Mahommedan Law? To what extent is such marriage binding on the minor?

X (a) Describe fully all the checks which are placed by the Mahommedan Law on the authority of a husband to divorce his wife.

(b) Under what circumstances can a wife obtain a release from marriage tie under the said Law.

XI (a) Who are the persons entitled to maintenance under the Mahommedan Law?

(b) Who are the persons entitled to claim a right of pre-emption and under what circumstances?

XII (a) Under what circumstances can a person revoke or retract a gift under the Mahommedan Law?

(b) What are the essential conditions of wakfs or religions endowments under the Mahommedan Law.

---

## जाहिरात.

विनय पूर्वक कळविण्यांत येत आहे कीं आकोलें येथें नारायण लक्ष्मण आणि कंपनी या नांवचे नवीन दुकान शहरांत वाशीम सडकेवर टौनपोलिस नजिक स्थापन झालें आहे. येथे कापड, स्टेशनरी वगैरे माल गिऱ्हाइकांचे पसंतीप्रमाणें एकच दरानें विकत मिळेल. या दुकानची प्रसिद्धि होण्यास व आश्रय मिळण्यास नम्रतेची विनंती आहे.

तारीख १८।९।८६
मुक्काम आकोलें.

लक्ष्मण भास्कर
वकील
सेक्रेटरी.

---

## वऱ्हाड.

हवामान—उष्णता अतिशय होऊं लागली आहे. पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत. लोकांचे डोळे त्याचेकडे अगदीं लागून राहिले आहेत. पर्जन्याची फार जरूरी आहे. गांवांत खोकला, पडसे व. गैरेचा अजार आहे.

पुढील महिन्यांत कर्नल ग्रांट साहेब रजेवरून परत येणार. त्यांची नेमणूक एथें डे. क. चे जागीं होऊन क. रेनिक साहेब यांना खामगांवीं स्मालकाज कोर्टाचे जडज्य नेमणार अशीं वदंता आहे.

रा. बनसीलाल मुकुंदलाल याला चिटणीतांचें घरीं झालेल्या चोरींतील माल विकत घेतल्याचे गुन्ह्यांतून नागपूरचे डि. मा. यांनीं सोडून दिले.

हायर व लोअर स्टांडर्ड परिक्षेची तारीख ११ आक्टोबर होती ती १८ आक्टोबर केली.

दस्तुर मानकशा रतंजी ए. अ. क. इलिचपूर हे रजेवर असल्यामुळें त्यांचे जागीं मि. हैदरअल्ली अख्याची यांची नेमणूक झाली.

डॉक्टर जी. नंदी ऑनररि आसिस्टंट कामिशनर यांस तारीख १६ सप्टेंबर पासून १ महिन्याची हक्काची रजा मिळाली.

सयदअल्ली मुद्दीन हुसेन यांनीं राजिनामा दिल्यामुळें कुमार हार्भामजी रावजी यांस अख्याची नेमिलें.

रा. रा. आत्माराम भिकाजी ए. अ. क. यांस बुलढाणा जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट राजिस्टर नेमिले.

रा. रा. कृष्णाजी अनंत ऑफिशिएटिंग तहशीलदार चांदूर यांस सेकंडक्लास माजिस्ट्रेटचा अधिकार दिला.

मे. मिरजा सफदर अल्लीबेग मुर्तिजापुरचे तहाशीलदार यांस तारीख १ सप्टेंबर पासून १ महिन्याच्या हक्काची रजा मिळाली; व त्यांचे जागीं रा. रा. पुरुषोत्तम पांडुरंग तेथीलच नायब तहशिलदार यांस नेमिले.

---

## वर्तमानसार.

ज्या दाव्यांत सरकार जिंकेल त्यांत पुरी फी व हरेल त्यांत अर्धी फी सरकारी वकिलास द्यावी अशाविषयीं मद्रासइलाख्यांत विचार चाललेला आहे.

हैद्राबाद येथें विटा व कौलें करण्याचा एक नवीन कारखाना निघाला आहे. हीं कौलें मंगलोरच्या कौलांप्रमाणें असून त्याप्रमाणेंच किंबहुना त्यापेक्षांही स्वस्त दरानें मिळतात.

फायनान्स कमिटीनें नागपूर प्रांतांतील राज्यव्यवस्थेच्या खर्चांत सालीना ७०,००० रुपये कमी करतां येतील असें स्थानिक सरकारच्या अनुमतानें ठरविलें आहे.

मुनसफीच्या जागा देण्यापूर्वी अमुक मुदतीपर्यंत वकिली केली पाहिजे, किंवा कोर्टांत क्लार्क आफ दी कोर्टाचें काम केलें पाहिजे, अशा प्रकारचा ठराव करण्याचें हायकोर्टांत घाटत आहे असें समजतें. मद्रास इलाख्यांत अशा प्रकारची रीत सुरू आहे असें आमचे ऐकिवांत आहे. ही पद्धत अमलांत आली असतां ऐकंदरीनें फायदा होईल. कामाची माहिती नसल्यामुळें एकदम येऊन न्यायासनावर बसल्यामुळें जी अडचण पडते ती दूर होईल असें आह्मांस वाटतें.

एका इटालियनानें प्रकाशणारी छापण्याची शाई तयार केली आहे हिच्या योगानें छापलेलीं वर्तमानपत्रें वगैरे निबिड अंधकारांत खुलाशा वाचावीं!

स्त्री डाक्तरिणी असण्याच्या अवश्यकते संबंधानें एक कारण सांप्रत बाहेर आलें आहे. वयनीवल येथील स्त्रियांचा दवाखाना कोणी डाक्तरीण मिळेना सबब बंद करावा लागला. क०

मिठासारख्या गोर गरीबांस अति आवश्यक जिनसावर जबर कर लादून आमच्या राजांनीं तें गोर गरीबांस अतिदुर्मिळ केलें.

जंगल, अपकारी, आणि निःशस्त्र कायद्यानें प्रजा दुमती तीमती होऊन तिचे हाल वाढत चालले आहेत. तीस सर्पण मुबलक मिळेनासें झालें, शेतीस लागणारा आवश्यक राब मिळेनासा झाला. अशी प्रजेची किती दैना वाढली आहे, तरी त्या दैनेकडे योग्य तितकें लक्ष आमचे राजे देत नाहींत. चारण्याची सोय पूर्वी प्रमाणें मोफत नसल्यामुळें पूर्वी प्रमाणें पुष्कळ जनावरें बाळगतां येईनाशीं होऊन जनावरें फार महाग झालीं आहेत. वाढलेल्या जंगलांत हिंसक जनावरांची संख्या वाढल्यामुळें शेतकऱ्यांचीं गुरेंढोरें आणि माणसें हिंसक पशूंच्या भक्षस्थानीं पडत आहेत.

शु० सू०

डि. ओगन नांवाच्या फ्रेंच मनुष्यानें एक कागदाची होडी करून सुमारें६००० मैल जलमार्गानें पर्यटण केलें असें म्हणतात.

ज्या प्रमाणें लोखंडाचें पोलाद होतें त्याच प्रमाणें उपयोगी पडणारें कांचेपासून पोलाद करण्याची युक्ति फ्रेडरिक राबर्ट सीमेन्स या नांवाच्या ड्रेसडन येथील एका कारखानदारानें काढली आहे असें म्हणतात.

पार्लमेंटाच्या पुढील सेशनांत हिंदुस्थानच्या राजव्यवस्थेची चौकशी करण्यास्तव निवडक सभासदांची एक कमिटी नेमिली जाईल असें हिंदुस्थानच्या अंडर सेक्रटरींनीं सांगितलें.

रशियन सरकारानें बाटूम येथें मेठनाक्या ते फा व ६००० शिपायी पाठविलें.

प्रिन्स बिस्मार्क यांनीं प्रिन्स आलेक्झांडर यांस राज्यपद सोडून देण्याविषयीं उपदेश केला.

रशियन सरकार व दुसऱ्या युरोपांतील प्रमुख राष्ट्रांशीं बल्गेरियाच्या पुढील व्यवस्थेविषयीं बोलणें करण्यास्तव सोफिया येथून पांच गृहस्थांचें कमिशन नेमलें जाणार आहे.

दोन फुट उंचीचा एक तुर्क मनुष्य हल्लीं प्यारिसमध्यें आला आहे त्याचें वय ६२ वर्षांचें आहे.

कालिकटच्या सेशन जज्जाच्या बंगल्या शेजारीं कांहीं मजूर काम करीत होते त्यांस जज्ज साहेबांनीं मारलें ह्मणून मजुरांनीं माजिस्त्रेटाकडे फिर्याद केली आहे असें समजतें.

इराणच्या शाहानें आपल्या राज्यांतून न रशियाच्या हद्दींत धान्य व फळें जाऊं देण्याचें बंद केलें.

लाहोर येथें आग काड्याच्या पेट्या करण्याचा एक कारखाना काढण्यास्तव एक मंडळी स्थापीत झाली आहे तिचें भांडवल ९०,००० रु. आहे.

दोन फ्रेंच गृहस्थ विमानांत बसून इंग्लंडांत गेले.

प्रेतें जाळणें सदोष आहे असें रोम येथील पोपानीं ठरविलें.

एक जुनें पुस्तक सांपडलें त्यावरून इकडील १ रुपयाची २ सि. ३ पेन्स किंमत होते असे असें समजतें.

अमेरिकेंत अक्रम जवळ एक शेतकरी शेतांत काम करीत असतां त्यांस एक गुहा आढळली. तेव्हां तो आंत जाऊन पाहूं लागला तों बारा मनुष्यें जमिनीवर पसरलेली व एक भिंतीस टेकून उभा राहून बोलत आहे अशा प्रकारचें शरीराचें सांगाडे त्यास आढळले.

ब्रम्हदेशांत चिंदविन नदीच्या पूर्व दिशेस बऱ्याच मोठ्या भागांत सोनें सांपडतें.

काबुलचे अमीर काफरस्थान आपल्या ताब्यांत येण्यास्तव लढाई करण्याची तयारी करीत आहेत असें म्हणतात.

हत्यारांच्या प्रतिबंधांचा कायदा ब्रम्हदेशांत सक्तीनें चालू केल्याशिवाय तो देश पूर्णपणें ताब्यांत येणार नाहीं असें तिकडील सरकारी अमलदार ह्मणतात.

इजिप्तच्या दक्षिण भागांत १२०७ वर्षांपूर्वींचे एक शहर सांपडलें आहे. सु०प०

गवनरजनरल यांचें रहाण्याचें मुख्य ठिकाण पुणें करावें आणि मुंबई इलाख्याची राज्य व्यवस्था प्रत्यक्ष त्यांच्या हातीं ठेवून मुंबईचे मुंबईसरकार कलकत्यास बदलून कलकत्याचे लेफ्टनेंटसरकार अगदीं कमी करावे अशीही एक सूचना झाली आहे. या सूचनेचा विचार करण्याचें धाडस काटकसर कमेटीच्या आंगीं असल्यास ती अमलांत आल्यानें दुहेरी फायदा होणार आहे पुण्याची हवा कलकत्याच्या हवेपेक्षां फार थंड असल्यामुळें गवरनरजनरलांस कलकत्याच्या हवेंत राहण्याचा जो कंटाळा येतो तो येणार नाहीं, व त्यांस पाळीपाळीनें मुंबई, पुणें, माथेरान व महाबळेश्वर या ठिकाणीं हवा खाण्यास सांपडून कलकत्याच्या लेफ्टनेंट सरकारच्या खर्चाची रक्कम सेविंग करण्यास सांपडेल, मात्र कमेटीच्या आंगीं तसें धाडस असलें पाहिजे.

धरमपूरच्या राजाच्या हद्दींतील दारूच्या कारखान्यावर ड्युटी घेऊनये असें सरकारनें ठरविलें आहे.

कंदहारपर्यंत रेलवे करण्यास अमिरानें मंजुरी दिल्याची गोष्ट सरकार नाकबूल करितें.

गव्हरनरजनरल हे आपल्या प्रवासाच्या वेळीं कराचीस न जातां भावलपुराहून एकदम लाहोरास जातील.

हल्लीं चांदीचा भाव जो अतिशयीत उतरला आहे त्याच्या कारणाचा शोध करून रपोट करण्याकरितां बिलायतसरकार एक कमीशन नेमणार आहे.

तरुण शिंदेमहाराजांस राज्याभिषेक झाल्याच्या आनंदाबद्दल देशांतील आयात निर्गत जकात बंद करण्याचा ठराव बंद करण्यांत आला.

सरहद्दीवरील रेलवे कंदाहारपर्यंत वाढविण्यास काबूलच्या अमीरानें मंजुरी दिली असें सांगतात.

ज्यांस सालीना १९,००० रुपयांपेक्षां जास्त पगार इजिप्त सरकाराकडून मिळत आहे असें इजिप्तच्या राज्यांत एकंदर २८ युरोपियन कामदार असून त्यांपैकीं हल्लीं १२ कामदार कामावर हजर नसून रजेवर आहेत. त्यांपैकीं ९ आपलें ऐकणारे जज्य असून तेही सर्व रजेवर आहेत. फौज, पोलिस, पब्लिकवर्क्स, रेलवे कस्टम, या सर्व खात्यांत मुख्यकामदार युरोपियन असून तेही सर्व गैरहजरच आहेत. याबद्दल लिहिताना इजिप्तदेशांतला एक पत्रकर्ता म्हणतो कीं, असे रजेवर राहून पगार खाणारे कामदार नेमण्याची रीत अगदीं बंद करणें अवश्य आहे.

पंजाबच्या चिफ कोर्टांत चौथा जज्ज नेमावा व नेटीव नेमिल्याम तिसरा हिसा पगार कमी करावा असा विलायतचा हुकूम झाला.

लार्ड हार्टिंगटन, ड्युक आफ माचेस्टर, लार्ड गोसफर्थ, वगैरे कित्येक बडे लोक येत्या हिवाळ्यात हिंदुस्थानांत येणार आहेत कारण काय?

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचा विचार करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत येणार आहे. ठा० अ०

साऱ्या जगाशीं आज इंग्लंड टक्कर मारण्यास तयार आहे. ह्याचें कारण पाहूं गेलें तर वास्तविकपणें हा हिंदुस्थान देश त्याच्या ताब्यांत आहे ह्यावांचून दुसरें कांहीं नाहीं. हिंदुस्थानचें सार्वभौमत्व मिळाल्यामुळें इंग्लंडला पैशाची, मनुष्याची, आणि दुसरी कोणतीही उणीव पडत नाहीं. इजिप्तमध्यें सैन्य पाठविण्याची वेळ आली; पाठवा हिंदुस्थानांतून! अमुक खर्च झाला बसवा हिंदुस्थानांवर! ब्रह्मदेश घ्या हिंदुस्थानच्या काळ्या फौजेकडून! ह्मणजे सारांश काय कीं, प्रत्येक ठिकाणीं हिंदुस्थानास तोंडीं लावावयास सांपडत आहे. असें तोंडीं लावतां लावतां या देशाची राखरांगोळी करून टाकिली. तरीही इंग्लंडास अद्याप याची कीव येत नाहीं. इतके दिवस इंग्लंडनें हिंदुस्थानच्या जिवावर हवें तितकें केलें. पण इतउत्तर अशा मरंवशानें केल्यास फसगत होईल. इतकेंच नाहीं तर तद्विरुद्ध परिणाम होऊं पाहील. ह्या देशाचा होता नव्हता तितका पैसा नेला. जो उत्पन्न होत आहे. तो खर्चासही पुरत नाहीं. कोट्यावधीचें कर्ज झालें आहे. व दरसाल लाखों रुपये व्याज द्यावें लागत आहे. अशा स्थितींत करावर कर बसवून रयतेस पिळण्याचा क्रम सुरूच आहे. तेव्हां आणखी हवा तितका पैसा काढूं अशा ऐटीवर एखादें प्रकरण उपस्थित केल्यास इंग्लंडनें आपली पिशवी खुशी केल्यावाचून गत्यंतर नाहीं. सैन्याविषयीं पाहिलें तर अंतस्थ प्रकार असाच असावा. इजिप्त, ॲबिसिनिया, सैप्रस, इराण, चीन अफगाण आणि ब्रह्मदेश ह्या ह्या ठिकाणीं हिंदुस्थानांतली काळी फौज जाऊन त्यांणीं इंग्लंडास यशस्वी केलें आहे. व आतांही ब्रह्मदेशांत इंग्लंडचाच झेंडा फडकावित आहे. आतां आह्मांला इतकेंच सुचवावयाचें आहे कीं, ह्यापुढें जगाच्या हालचालींत पडतांना हिंदुस्थानचा पैसा आणि मानवी प्राण ह्यांचा सत्यानाश करूं नये. इंग्लिश लोकहो! आहे त्यांत संतुष्ट असा. जास्त जास्त मिळविण्याची हाव धरूं नका. तुह्मी पृथ्वीपति झाला तरीही तुमची आशा तृप्त व्हावयाची नाहीं. ही गोष्ट मनांत वागवून शांततेनें, न्यायानें, आणि तरवारीचा जोर आहे इतका कायम राखून राज्य चालवाल तरच बहुत शतकें हें ऐश्वर्य चाखाल!!

आज पर्यंत हिंदुस्थानाबाहेर ज्या ज्या लढाया झाल्या त्यांत हिंदुस्थानचा अर्थाअर्थीं संबंध नसतांही अन्यायानें व सत्तेच्या जोरावर तो सारा खर्च हिंदुस्थानापासून चोपून घेतला. हीच वहिवाट ग्राह्य, आणि सबळ धरून पुढें चालवावी ह्यांतच त्यांना मोठें भूषण व न्याय वाटत असावें. मागें अन्याय झाला ह्मणजे तोच पुढें चालवावा हें न्यायी इंग्लंडास शोभत नाहीं. ब्रह्मदेशांत जें उत्पन्न होईल त्यांपैकीं कांहीं तरी अंश हिंदुस्थानांतून होणाऱ्या खर्चाला भर घालण्यास मिळेल काय? बरें ब्रह्मदेश खालसा केला व तेथें कायमचें इंग्लिश राज्य झालें ह्मणून हिंदुस्थान देशांतील प्रजेला कोणता फायदा झाला? जो कांहीं फायदा झाला तो सारा इंग्लंडला. असें असतां ह्या खर्चाचे बाबदींत इंग्लंड अगदीं कोरें कोरें राहिलें, हें वाजवी झालें नाहीं. असली टिका करणारीं उत्तरें देण्यापेक्षां पार्लमेंट असा एकसा ठराव करील कीं, ग्रेट ब्रिटन खेरीज अथवा इंग्लंड आणि स्कॉटलंड ह्या खेरीज इतर त्रस्वास्थ्याचे अथवा लढाईचे संबंधानें जो खर्च करावा लागेल तो सारा हिंदुस्थानांवर कायमचा बसविला आहे. ह्मणजे सत्रावेळ अशी पीरपीर तरी रहावयाची नाहीं. सुधारलेल्या इंग्लिश राज्यांत अन्यायाला सुद्धां वहिवाट लागूं लागली! नशीब ह्या हतभागी हिंदुस्थानचें, दुसरें काय!

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

सहामाही ,, ३ ,, ,, ८९
साल अखेर ,, ७ ,, ,,१८९
किरकोळ अंकास.................... ४

Per annum in arrears 7 ,, 1R. 8 as
Six monthly............ 3 ,, 8 as
Single copy.............................. 4 as

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०१८६
दुसरे खेपेस ........०१

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERARSAMACHAR.


VOLXX AKOLA MONDAY 27 SEPTEMBER 1886 NO 38

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख २७ माहे सप्टेंबर सन १८८६ इ० अंक ३८



Look for our name.
Save your trouble! Save your trouble!
BROWN & MURRAY'S.
PORTABLE SCIENTIFIC COOKING STOVES

Require no oil, Require no spirit.

Useful Requisite for every household and Inestimable boon both to Rich and poor.

1 Charcoal Ball or 3 Charcoal Cakes. Will suffice for the Napolean Patent stove to prepare any 2 lbs. of the followings in 5 minutes *viz*, Tea, Coffee, Milk Sago, Arrowroot, Barley, &c.

2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes. 2 Charcoal Cakes. Will take for the Dick's Patent or Pocket Stove to prepare any 1 lb. of the following in 3 minutes--*viz*, Tea ,Coffee, Milk, Sago, Arrowroot, Barley, &c.

1 Pice Charcoal. Ball or 1 lb. coal Will be enough for the Tourist Patent stove to prepare any four of the following, in 30 minutes, *viz*, Rice, Curry, Cultet, Stew, Pudding, &c.

BROWN & MURRAY'S STOVES give rise to no disgusting smell and smoke as they are in general with other valuable Stoves. Their Stoves are perfect, most economy in Cookery, and require no setting of brickwork. They can be placed, in time of Cooking anywhere even on a Table, Sofa, Chair, &c., without the least fear of catching fire; and cooking can also safely be executed on a running car. BROWN & MURRAY'S STOVES are not only valuable helps to the INVALIDS and INFANTS for procuring HOT TEA and WARM MILK, but on the whole they are HAPPY PARTNERS to all sorts of men for the preservation of life.

| *Packing as. 4 postage extra.* | R. A p. |
|---|---|
| With direction each Napolean | |
| Patent.......................... | 2 8 0 |
| Pocket Stove............... | 3 8 0 |
| *Packing as. 6 Postage extra-* | |
| With direction, each, Tourist | |
| Patent. large............ | 6 0 0 |
| Do. small.................. | 4 8 0 |

LIBERAL COMMISSION TO WHOLESALE PURCHASERS AND AGENTS.

Wanted Agents at every post town. Can be had only.

H. NATHANIAL & CO.
*WHOLESALE MERCHANTS AND COMMISSION AGENTS.*
SEALDAH, CALCUTTA E. C.

Ask for "BROWN & MURRAYS" Stoves and take no other.

See that the Stoves you buy bear, our brass lable.

*Testimonials from the Reverends and others free on application.*

Best always cheapest.

ASHU'S POWDER.

Perfectly cures the habit of drinking spirits and wines, opium-smoking, indigestion, dyspepsia, &c, by use as per instructions on label. Rs. 3 As, 8 per phial. A. T. Mookerjee, Barnagore, *via* Calcutta. Wanted Agents.

THE GREAT ORIENTAL MEDICAMENTUM.
DR. G. B. SHAW'S SAMARITAN DROPES

Rouses and developes the nervous energies, strengthens and regulates the stomach, bladder, kidneys, lungs and liver, and is highly recommended and prized as a sovereign remedy for the following maladies:-

Asthma, Shortness of breath, Coughs, Dropsy, Worms, Gravel, Chronic fevers, Liver complaint, Palpitation of the heart, Giddiness, Nervousness, Headache, Internal Sores, Phosphatic deposits and mucus in the urine, Gonorrhœa, Gleet, Fluor albus, Ulceration of the bowels, Chronic inflammation of the bladder, Catarrh.

By external application Dr. G. B. Shaw's Samaritan Drops is invaluable for:-

Burns, Ulcers, Malignant Sores, Ringworms, Itches, Tetters, Chilblains. Paralysis, Leprosy, Rheumatism, Gout Syphilitic Sores, and skin diseases of the worst description.

*Full directions for use accompany every phial.*

Sold at Re. 1, Rs. 2, Rs. 3-8, Rs. 5-4 and Rs. 10 per phial, packing and postage As. 12. extra.

Wanted Agents, apply to
Barnagore Suburb of Calcutta *East Indies.* — A. T. Mookerjee' *Proprietor.*

## जाहिरात.

विनयपूर्वक कळविण्यांत येत आहे कीं आकोलें येथें नारायण लक्ष्मण आणि कंपनी या नांवचें नवीन दुकान शहरांत वाशीम सडकेवर पोलिस ठाणे नजिक स्थापन झालें आहे. येथें कापड, स्टेशनरी वगैरे माल गिऱ्हाईकांचे पसंतीप्रमाणें एकच दरानें विकत मिळेल. या दुकानची प्रसिद्धि होण्यास व आश्रय मिळण्यास नम्रतेची विनंती आहे.

ता१८सपटंबर१८८६इ०

लक्ष्मण भास्कर
वकील
सेक्रेटरी.

NOTICE

The under signed begs to inform the residents of this station and the Mofussil. that a new shop, the proprietors of which are Narayen Luxman and Co; for the sale of cloths, stationery and oilman stores at fixed and moderate prices, has been opened in the town of Akola near the Police Station house on the road to Bassim, and solicits their kind patronage.

And inspection of the articles will convince the purchaser of their good quality and cheap prices over those obtained from other local shops.

Luxaman Bhasker.
Akola 24-8-86 Secretary


## पत्रव्यवहार,

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते

वि० वि० आपला माझा प्रथमचाच परिचय असल्याकारणानें आपणाकडे खालील चार ओळी पाठविल्या आहेत त्यांस येत्या अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

कारंजा हा गांव बराच वस्तीचा आहे. मोगलाई अमलांत फार प्रसिद्ध होता. आतांहि सुधारणुकेच्या कामांत साधारणपणें पाऊल पुढें आहे. येथील पिकें सर्व साधारण बरीं आहेत. मात्र सर्वांचे डोळे मेघराजाकडेस लागले आहेत. एक दोन पाऊस पाहिजे आहेत. धान्य वगैरेला सध्यां भाव बराच आहे. येथून आळशी पुष्कळ मुंबईस चालली आहे. आणखी या गांवाचें आतां दैन्य नाहींसें होत चाललें आहे झटलें तरी चालेल. कारण हा गांव खामगांव, उमरावती वगैरे ठिकाणच्या व्यापाऱ्यांच्या कामांत अगदी खालोखाल झटलें असतां काहीं बाध येणार नाहीं. इतकेच कीं हा गांव पडला एका कोपऱ्यांत शिवाय येथें आगगाडी नाहीं, ती पडली येथून दहा कोसांवर. व तारायंत्रही नाहीं अशा पुष्कळ अडचणी असल्या कारणानें या गांवाची भरभराट होऊ शकत नाहीं. तरी येथें दोन प्रेस कापसांचे अलिकडे पक्की गठडी बांधण्याचे आले आहेत. एक मुळजी जेठाचा याचे काम फार जारीनें वाशीमची सडक आणि मुर्तिजापुरची सडक यांच्या दरम्यान जागा घेऊन सुरू केलें आहे. हे काम फारच झपाट्यानें चालूं आहे हंगामाच्या वेळी गठडी निघो ह्मणजे झालें. दुसरा मोफार्शिपल याचेही काम बरेंच चाललें असून ज्यास्त ह्मणण्या सारखें नाहीं. यांनीं जागा आठवडे बाजाराजवळ अगदीं लगत घेतली आहे. मात्र आतां इतकींच अडचण राहिली आहे कीं तकाची जागा कोठें मुकरर होते हें पाहावें दोघाच्या दरम्यान झाल्यास फार उत्तम पडेल. मे. डेपुटी क० साहेब बाहादुराची स्वारी दवऱ्यावर येईल तेव्हां सर्वानुमतें ठरावितील. शिवाय प्रेसाच्या आसपास गवळीं लोकांची वस्ती बरीच आहे. इकडेस ही डे० क० साहेब बहादूर लक्ष देतील व कांहीं तरी व्यवस्था वगैरे करतील अशी उमेद आहे. यांचीही स्वारी इकडेस लवकरच येणार असें ऐकतों. मागच्या रविवारीं ह्मणजे ता० १३ सपटंबर सन १८८६ इ० रोजीं रा० रा० तात्या साहेब व वि. ना. दांडेकर मुर्तिजापूर येथील कोर्टाचे जज्ज हे ही येथें पत्नीसह आले होते. येण्याचा कांहीं हेतू समजला नाहीं. शाळा, दवाखाना, प्रेसाची जागा वगैरे पाहून सोमवारीं सुमारें दोन वाजण्याच्या सुमारास परत मुर्तिजापूर येथें गेले.

जशी येथें दोन प्रेसची योजना झाली तशीं मूर्तिजापूर येथलि कोर्ट जे बडनेर येथें जाणार ह्मणून वदंता वरचेवर उठत आहे ती ईश्वर करो आणि आमचें वरिष्ट अमलदार याचें मनांत कारंजास नेण्याचे येवो ह्मणजे झालें. या करितां साहेब बहादूरांची स्वारी येणार आहे तेव्हां सर्वांनीं आपलें उद्गार त्यांच्या पुढें ठेवावेत ह्मणजे खरें स्वरूप काय आहे तें दिसून येईल. प्रयत्नांतीं परमेश्वर अशी जी ह्मण आहे तीजप्रमाणें तर करून पहावें होणें जाणें परमेश्वराधीन! मग आपला कांहीं उपाय नाहीं. शिवाय येथलि लोकांचा अर्जही त्यांच्या जवळच आहे. येथें कोर्ट वगैरे नसल्यामुळे फार खराबी आहे. बळी तो कान पिळी या प्रमाणें चाललें आहे. निदान कोर्ट सहा महिनें येथें व सहा महिने मुर्तिजापूर येथें असें जरी झालें तरी पुरें. केव्हां येथील नगरवाशीं लोकांचें नशीब उदयास येतें तें पहावें. वाचकांस तेंच तें वांचून कंटाळा येईल सबब थोडक्यांत पुरे करतो पुढें सवडीनुसार सविस्तर लिहिण्यांत येईल कळावें.

कारंजा ता० २२-९-८६ इ

आपला एक
("क्ष")

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते.

आम्हांस लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं आमचे येथील लोकप्रिय स्पेशीयल म्याजिस्त्रेट् नरोदिन साहेब हे फार दिवसापासून महान रोगानें अतिशय आजारी होते. या रोगा करितां पुष्कळ खटपट केली. दूरदूरचे वैद्य बोलाविलें कोणाच्यानें ते न आवरल्यामुळे शेवटीं त्यांचा त्याच रोगांत अंत झाला. ते असताना त्यांनीं कोणाला तकलीफ त्रास वगैरे नदेतां नगरवाशी जनांची प्रीति संपादली. हिंदु व मुसलमान याना सारखे रितीनें वर्तविलें. दानधर्मही पुष्कळ त्यांनीं आपलें समोर केला व मागूनही पुष्कळ केला. थोड्या काळांत त्यानीं आपलें काम फार चांगलें रितीनें केलें. त्याचे जागेवर येणाऱ्यासही अशीच चांगली बुध्दी ईश्वर देवो या जागेविषयीं पुष्कळानींअर्ज केलें आहेत. कोणाचें नशीब उदयास येतें तें पाहावें वास्तविक पाहतां "घुडे" यांचा हक्क खरोखर प्रथम आहे. मग बाकींच्या लोकांचा. कारण हे गृहस्थ श्रीमंत असून फार हुषार ही आहेत. व मुळचे या गांवचें रहिवाशी आहेत कमेटीचे जेव्हां हे चेअरमन होतें तेव्हां तेव्हां कमेटीचे कामकार

उत्तमरितीनें केलें याचा दाखला मी. डेपुटी कामिशनर यांचिकडे जीं कागद पत्रें गेलीं आहेत त्यावरून सहजच साहेबबहादुराच्या लक्षांत येईल. शिवाय जो लोकल कमेटीचा रिपोर्ट छापून यावेळीं प्रसिद्ध झाला आहे त्यावरूनही सहजच साहेब बाहादुरांच्या लक्षांत येईल. नास्ती एकंदर मि. नतगेदीन यांची माहिती मिळून अवकाशानुसार कळविण्यांत येईल. अझून पुरी माहिती मिळाली नाहीं. पुढें त्यांचें दुःखकारक वर्तमान ऐकून नास्तीलिहिण्यास हात पुढें चालत नाहीं सबब इतकेंच लिहून पुढें लेख पुरा करीतों. ता. २२ माहे सप्तेंबर सन १८८६ ईसवी.

आपला एक फिरस्ता

"क्ष"

---

चिखली ता० १४-९-८६

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते

आकोला यांस.

सा० नमस्कार वि० वि० लक्ष्मण शिवराव सब रजिस्ट्रार यांची बदली येथून टाकरखेड येथें झाली त्यामुळें येथील प्रतिष्ठीत मंडळी यांणीं इंग्लिश मराठी शाळेंत समारंभ केला. गांवांतील शेटसावकार, सरकारी मंडळी, देशमुख देशपांडे वगैरे बरेंच लोक जमले होते मे. अण्णा साहेब हेडमास्तर आणि आप्पा साहेब डाक्टर यांणीं मे. बापुसाहेब सब रजिस्टर यांचे स्तुतिपर एक तासपर्यंत बोलून यांचे वियोगामुळें होणारें दुःख प्रदर्शीत केलें तरी याना येथील हवा मनवत नसल्यामुळे व चांगल्या ठिकाणीं यांची बदली झाल्यामुळें सर्वांनीं आनंद प्रदर्शित केला. रा० रा० लक्ष्मणराव यांचा स्वभाव उदार, दयाळू या संबंधानें तसेंच हे एक वर्षांतच या गांवीं इतके लोक प्रिय झालें होते कीं त्या संबंधानें यांची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच आहे. या प्रमाणें समारंभ होऊन चहापाणी, अत्तर गुलाब पानसुपारी, हारतुरे वगैरे होऊन सभा विसर्जन झाली.

आपला

एक क्ष.

---

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ३० शके १८०८

---

# वऱ्हाडांतील शाळाखात्याचा वार्षिक रिपोर्ट सन १८८५--८६.

( मा. अं. व. पुढें चालूं. )

या सालीं पटावर एकंदर सर्व शाळा ९९१ होत्या व त्यांत एकंदर ४१,०१८ विद्यार्थी शिकत होते. मागील सालच्या आंकड्यांशीं हे आंकडे ताडून पहातां विद्यार्थ्यांची संख्या जरी १३०९ नें वाढली आहे तरी शाळांची संख्या काय ती एकानेंच वाढली आहे. यंदाचें साल एवढें मागसण्याचें कारण मि. जठार यांनीं आपल्या रिपोर्टाच्या आरंभीं दिलेंच आहे व तें रास्तही आहे. या ९९१ शाळांपैकीं २ हायस्कुलें, १ ट्रेनिंगकॉलेज, २४ मध्यम शिक्षण शाळा, ८९४ आदि शिक्षण शाळा व ३० खासगी शाळा आहेत. ८९४ आदि शिक्षणाच्या शाळां पैकीं ५४५ केवळ सरकारी आणि मुनसीपालीटीच्या शाळा मुलांकरीतां आहेत व ३१ मुलीं करीतां आहेत आणि बाकी राहिलेल्या ३१८ खासगी देखरेखी खालीं परंतु सरकारांतून मदत मिळणाऱ्या अशा आहेत. केवळ खासगी खर्चावर चालणाऱ्या शाळा कायद्या सर्वे ३० च आहेत. गेल्या सालीं सरकारीव मुनसीपाल शाळा एकंदर ५२९ असून त्यांत ३२६१८ विद्यार्थी शिकत होते व हल्लीं त्यांची संख्या ६०३ होऊन त्यात ३४८५८ विद्यार्थी शिकत आहेत यावरून सरकारी किंवा मुनसिपाल शाळांची वृद्धी झाली नाहीं असें म्हणतां येत नाहीं. एकंदर शाळांच्या व विद्यार्थ्यांच्या संखेत वाईट वाटणारी क्षुल्लक जी तफावत पडली ती केवळ खासगी शाळांची संख्या पुष्कळ कमी झाल्या कारणानें पडली. आमच्या मतें ही गोष्ट अभीनंदनीयच आहे आमच्या या प्रांतात अशा प्रकारच्या तात्या पंतोजीच्या ज्या शाळा असतात त्यांत बहुधा अव्यवस्था असून शिक्षण दानाचे निश्चित नियम नसतात व त्यामुळें मुलांचे दिवस व आईबापाचा पैसा फुकट जाण्याचा मात्र संभव असतो— तथापि इतर ईलाख्यां प्रमाणें चांगल्या शिस्तवार व नियमीत रीतीनें शिक्षण देऊन दिवसें दिवस अशा शाळामध्यें जास्ती सुधारणा नहोणें याचें आम्हांस वाईट वाटतें. दुसऱ्या इलाख्यांत स्वतःच्या जोखमीवर विद्वान लोकांनीं मोठ मोठाल्या शाळा स्थापनकेल्या आहेत व त्यांची दिवसें दिवस वृद्धि आणि उत्कर्ष होत आहे. असें असून या गोष्टींत आमच्याच प्रांताचे पाऊल इतकें मागें कां असावें हें समजत नाहीं. आतां ही गोष्ट खरी आहे कीं आमचा प्रांत फार लहान असून त्याची लोकसंख्याही फारथोडी आहे. तथापिही प्रांताचा विस्तार आणि लोकसंख्येचें मान साजतील असे प्रयत्न आमच्यांतील पुढारी ह्मणविणाऱ्या कांहीं लोकांना इलिचपूर, यवतमाल, बुलढाणा वगैरे जिल्ह्यांत केलें असतां चालण्याजोगें आहेत. आह्मी अशी आशा करितों कीं सरकारी नोकरीसाठीं गयावया करणारे असे आमचे पुष्कळ होतकरू व विद्वान लोक या गोष्टींचा चांगला विचार करितील.

सरकारी व मुनसिपाल शाळांची सुधारणा प्रतिवर्षी अधिकाधिक होऊन त्यांचे वार्षिक निकाल चांगले होत आहेत ही गोष्ट माठी आनंदाची आहे. यावरून लोकांना विद्येची अभिरुचि दिवसेंदिवस अधिक लागत चालली आहे हें स्पष्ट दिसून येतें. आमच्या हैस्कुलांचें पाऊल हळूं हळूं सुधारणेच्या कामांत पुढें पुढें पडत चाललें आहे हें पाहून कोणास ही आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. गतसालीं तर आमच्या दोन्ही हैस्कुलांनीं आपापलीं कामें फारच उत्तम रीतीनें बजाविलीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. गुदस्त सालीं एकंदर २१ उमेदवार मुंबईच्या मॅट्रीक्युलेशनला गेले होते त्यांतून १४ पास झाले. एवढी संख्या वऱ्हाडांतून अद्याप मुळींच पास झाली नव्हती. त्यांतून उमरावती हैस्कुलानें तर बहारच करून दिली. या हैस्कुलांतून एकंदर ११ उमेदवार गेले होते त्यांपैकीं ९ पास झाले. आम्ही आणखी असेंही ऐकिलें आहे कीं उमरावतीच्या ११ पैकीं एक चांगला उमेदवार अजारी पडल्यामुळें त्याला शेवटल्या परीक्षेला बसतां आले नाहीं. नाहीं तर तोही पास झाला असतां खरोखर ही गोष्ट त्या हैस्कुलचे अक्टींग हेडमास्तर मि. तळवळकर यांना फारच भूषणास्पद आहे व ती बद्दल त्यांची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. अकोलें हैस्कूलमध्येंही मि. महाजनी यांनीं आपली बाजू आपल्या नेहमींच्या परीश्रमानें व चातुर्यानें राखिली आहे. २-३ वर्षांपूर्वी या हैस्कुलची स्थिति काय झाली होती हे आमच्या वाचकास स्मरत असेलच. परंतु महाजनी हे तेथें गेल्या पासून त्यांनीं याला बरेंच नांवरूपास आणिलें आहे. हायस्कुलांमधील इतर क्लासाच्या वार्षिक परीक्षेंत अकोला हायस्कुलांत गेल्या वर्षां पेक्षां सुधारणा झाली आहे परंतु उमरावती हायस्कुलांत गुदस्त सालापेक्षां यंदा कमी संख्या कां पास झाली हें कळत नाहीं. मिडूलक्लास स्कुलांतही यंदा विशेष सुधारणा दिसून आली आहे. त्यांत सातव्या ईयत्तेंत म्हणजे मिडूलक्लास स्कुलांत सर्वांत मोठ्या ईयत्तेंत शेकडा ६० मुलें यंदा अधिक पास झालीं आहेत, यांवरून त्या शाळांतही हेडमास्तर आपलीं कामें चांगलीं बजावितात हें उघड आहे. या इयत्तेपैकीं सर्व जिल्ह्यांत अकोला जिल्ह्याचा पाय सर्वांत पुढें आहे.

यंदाच्या सालीं स्त्री शिक्षणामध्यें मात्र खरोखर आनंद होण्याजोगी सुधारणा झाली आहे. गतसालीं मुलींच्या शाळा एकंदर २४ होत्या त्या यंदा ३१ झाल्या आहेत व त्यांत विद्यार्थिनींची संख्या ही बरीच वाढली आहे. यावरून वऱ्हाडांतील लोकांना स्त्रीशिक्षणाची योग्यता कळून येऊं लागली आहे असें म्हटल्या वांचून रहावत नाहीं. इलिचपूर व वणी जिल्ह्यांत स्त्री शिक्षणाला जसें रूप यावें तसें यंदा जरी आलें नाहीं तथापि इतर जिल्ह्यांत बरीच सुधारणा झालेली दिसत आहे व लोकही ह्या महत्वाच्या विषयाकडे लक्ष देऊन त्याला होईल तितकें उत्तेजन देत आहेत. आमच्या मतें सदरील शाळांत जोपर्यंत स्त्री शिक्षक मिळतील तोंपर्यंत ठेवावेत हें चांगलें आहे. तसें केल्यानें मुलींचीं आईबापें आपापल्या मुलीं हल्लीं पेक्षां अधीक खुशीनें पाठवूं लागतील. आजपर्यंत स्त्री शिक्षक काय ते दोनच होते. यंदाच्या सालीं मात्र उमरावतीच्या शाळेंत पुण्याची ट्रेनिंग कालेजांत पास झालेली एक बाई आणिली आहे. थोड्या दिवसांपूर्वी उमरावती येथें मि. सांडर्स साहेब आमचे कामिशनर यांनीं लेडी डफरीन फंडासंबंधीं बरेंच आडंबर माजवून एक बडी सभा भरविली होती व त्या फंडासंबंधीं पेसा वसूल करण्याकरितां जागोजाग कमिट्या नेमिल्या होत्या. परंतु त्यांचे पुढें काय झालें हें कांहीं समजत नाहीं. यवतमाळ जिल्ह्यांत मि. केशव नयकृष्ण यांनीं बरीच धामधूम करून कांहीं पैसा गोळा केल्याबद्दल पुष्कळ बळें आमच्या ऐकण्यांत आहे. बाकीच्या कमिट्या जागच्या जागीच विराल्या किंवा काय! हें कांहीं समजत नाहीं. आम्हाला वाटतें कीं त्या फंडाचा पैसा बराच उत्पन्न झाला व याचा व्यय याच प्रांतांतील स्त्री शिक्षणाकडे केला तर आमच्या वऱ्हाडांतील मुलींचा चांगलाच फायदा होईल. यांत संशय नाहीं. ( पुढें चालूं. )

---

# धंदे व कला शिकविण्यासंबंधीं मुंबई सरकारचा ठराव.

नुकताच मुंबई सरकारानें व्यवहारोपयोगी धंदे व कला वगैरे यांचें शिक्षण मुंबई ईलाख्यांत देण्याचे संबंधानें एक ठराव प्रसिद्ध केला आहे. पुर्वी कामा ईस्पितळ रोगी लोकांकरीता प्रथम खुलें केलें त्यावेळेस गवरनर साहेब यांचे बोलण्यावरून असें वाटलें होतें कीं या संबंधानें कांहीं विलक्षण ठराव बाहेर पडून लोकांची नजर एकदम दिपून जाईल व मुंबई सरकार प्रजेचे मायबाप होऊन स्वतंत्र धंदे एकंदर ईलाख्यांत पसरतील येवढा मोठा आव प्रथम घालून हल्लीं पाहिले तो डोंगर पोखरून उंदीर काढल्यासारखें भासत आहे. झालें त्यांत बरेंच झालें परंतु ज्या प्रकारचा ठराव बाहेर पडेल असें वाटत होतें तसा प्रकार नाहीं. टाइम्स आफ ईंडीयाचें म्हणणें आहे कीं मुंबई इलाख्यांत फिनान्स कमेटीचे मेंबर आल्यामुळें मूळच्या ठरावास धक्का पोहोंचला कारण आज फीनानस कमेटीचा झोंक खर्च कमीकरण्याकडे व धंद्याच्या शाळा काढणें वगैरे म्हटले म्हणजे ती पडली खर्चाची बाब तेव्हा अर्थातच मुंबई सरकारानें पुर्वीच विचार पाहून आपले पाय आवरून घेतले असावेत असा तर्क आहे, व आम्हास ही असेंच वाटतें.

मुंबई सरकारचे ठरावांत हिंदुस्थानांतील व विलायतेतलि लोकांचे स्थितीचीतुलना केली आहे. विलायतेत म्हठलें म्हणजे जिकडे तिकडे मोठे मोठे कारखाने व बडीबडी यंत्रे हरएक प्रकारची चोहोंकडे जाळ्या सारखीं पसरलीं आहेत. त्यामुळें धंद्याचे शिक्षणासाठीं शाळा वगैरे करणें ह्मणजे हजर असलेल्या गोष्टींची चांगली जमवा जमव करणें होय. हिंदुस्थानांतली गोष्ट याहून फार निराळी आहे. या देशांत यांत्रिक विद्येचा पाया आज नवा उभारण्या सारखे आहे. मुंबई सारख्या राजधानीच्या शहरा खेरीज इतर ठिकाणीं कारखानें किंवा यंत्रें वगैरे पहाण्यास देखील मिळत नाहींत मग त्यांची शास्त्रोक्त माहिती कोठून मिळणार? या देशांत कलाकौशल्याचे संबंधाने जरी उणीव नाहीं, ह्मणजे मोठमो-

ठे निष्णात लोक निरनिराळ्या धंद्यात आहेत तरी विलायतेंत सर्वत्र यांत्रिक शक्तीचा उपयोग होऊन जसा कांहीं विलक्षण फायदा होतो तसा येथें बिलकूल नाहीं. हातानें काम करणार कितीही सुरेख रीतीनें करो, यंत्राचे कामाशीं बरोबरी कशी होईल. यामुळें आज हिंदुस्थानांत चांगले धंदे व त्यातील वाकबगार लोक निराधार होऊन नाहींसे होत चालले आहेत. दुसरी उणीव या ठिकाणी भांडवलाची आहे. पूर्वी कलाकौशल्याचे कामास राजाश्रयामुळें बरेंच उत्तेजन असें ह्मणजे त्यामुळें कलाकौशल्य हिंदुस्थानांत राहात गेलें परंतु त्याचा जेवढां व्हावा तितका विस्तार झाला नाहीं. अशा प्रकारचा ठळक भेद या देशांत व विलायतेंत आहे. अर्थात असा भेद असल्यामुळें या देशांत धंद्याचे संबंधानें वगैरे जी सुधारणा होणार आहे तीही फार सावकाश होईल.

(पुढें चालूं.)

# The Berar Samachar

**MONDAY 27 SEPTEMBER 1886**

It is obviously useless to carry on any further controversy regarding the Police action at Akola. The 'Vaidarbha' had evidently nothing better to answer to our 'Facts' than putting to its readers some further trash. What is the explalnation of those high-flown words used at the beginning of the article headed 'Extraordinary Police action' We leave it to readers to Judge if the truth of the original article is established by the article on 'Common Sense.'

The Madhav Bang Meeting—Enough has already been written about the regularities and irregularities of the Madhav Bang meeting of orthodox Hindoos at Bombay. The meeting as is now well-known was convened to memorialize Government with regard to the dislike of the orthodox community regarding legislative interference in social matters like infant marriage &c. Beyond a handful so called Hindu reformers there is a vast force unseen and unfelt in the shape of the masses of Indian society. The masses in India are yet unconscious of their powers and are very backward in making representations of their opinions. That these men should have assembled in the meeting to express their opinions is one clear sign fo the times that the orthodox party is organizing and will not yield tamely to the pressure of the Reformers.

Everybody knows that Infant marriages have evils attendant upon them but the evils of the system have been so terribly magnified of late that the acceptance of the amendment proposed by Mr. Telang that infant marriage is recognized to be an evil by the Hindu community seemed very dangerous. The admission would perhaps have given to Government a stand point for interference in the matter. The reformers were aggrieved to find their amendment not accepted; but may we not ask with Dr Kirtikar what substantial thing they have done in the matter of Reform beyond specifying and lecturing. Can any of them boast of action in conformity with their words?

Judex of the Nagpoor News seems particularly ill-disposed to the Brahmins. Speaking of the appointment of persons to the posts of Extra Assistant Commissioners in Berar he says 'since that period (i.e. Mr. Cordery's visit in 1883) Tahsildar and clerk of Courts *Brahmins only* and not Mahommedans or other caste, have been elevated.' The italics are ours. Does not this Judex know that Mr. Murray, Mr. Bowen and Mr. Price have been appointed as representatives of that very class whose cause Judex espouses? Is Mr. Manecksha also a Brahmin? Perhaps we are to trace the genealogy of the Parsees and Hindoos to the common Aryan origin or even to Adam himself. Judex must have a very thick blind indeed over his eyes, if he can't see fact. As for the Head Clerks of the English offices, there is nothing to prevent them being made Extra Assistants, only if they have the necessary qualifications. Mr. King of the Akola office we know, is an excellent head Clerk and very much liked by his Subordinates; but why should he not appear and pass the Higher or Lower Standard? If he or anybody of his position does pass the departmental tests in Berar he can lay claim to such posts as a matter of right. The bigger appointments in English offices in Berar are mostly held by Eurasians. Properly speaking, there ought to be some test for appointing a person to posts in the English offices; but at present nothihg of the kind is required. Why does not Judex refer to this if he means to stand on 'just rights?' As matters now stand one can safely say that the Eurasians are enjoying the loaves and fishes of the office service.

In connection with promotions generally we are put in mind of the case of Pandit Suraj Narayen Attache to the Resident. He entered the service in 1881 and has passed his Higher Standard. When the Attaches were appointed, the understanding was that they were to be promoted after three year's probation on their passing the Departmental tests, When the Commission was adjusted in Mr. Jone's time there were six supernumerary Assistant Commissioners; and it was resolved that each time an Assistant Commissionership became vacant a supernumerary was to be put in the permanent list of Assistant Commissioner and in place of the supernumerary Assistant Commissioner an extra-assistant was to be put in. According to this scheme Attaches had a very slender chance indeed of promotion; but notwithstanding this difficulty which could be clearly foreseen and notwithstanding the resolution of not saddling Berar with any more Attaches, new places of Attaches were and are being created. Now if an Attache has to hang on on his probationer's pay of 200 per mensem until all the Supernumeraries are entered in the Permanent List, they will have to wait for a very long time without any promotion. In this respect Berar favors very unfavourably with other provinces. Mr. Mohamad Razakhan and Mr. T. Rangrao who were here are now in the Madras Presidency one on Rs. 700 as Assistant Collector and Magistrate and the other as Deputy Collector on Rs. 300. It may perhaps be argued that there is so very little scope in Berar for promotion; but what are the Attaches to do in that case? If there is no scope let them be made supernumerary Assistant Commissioners so that they may get some promotion. If men like our able Pandit Suraj Narayen who are so well spoken of by their superiors don't get promotion, the service will certainly deteriorate. No wonder if Government get people of the Hug type who have to be eventually got to resign with very bad grace.

## PLEADERS EXAMINATION H. A. D. 1886.
## LAWS OF CONTRACTS AND TORTS.

1 Describe the following terms:—Consideration, free consent, undue ifluence, contract of indemnity, bailment, insolvency and firm.

11 State fully the Law as regards the revocation of proposals and acceptances.

I11 (a) What is the effect of a mistake as to any Law inforce in British India when the contract is made in the H. A. D.

(b) What considerations have been held to be unlawful.

(c) State the principal arguments which are void.

IV Under what circumstances and up to what time can a seller exercise his right of stopping the goods in transit? When does this right cease?

V (a) State fully the circumstances in which a surety is discharged and a continuing guarantee is revoked-

(b) What is the Law as regards the restoration of goods bailed gratuitously.

V1 (a) State fully the rights and liabilities of undisclosed principal. In what cases is an agent personally bound contracts entered into by him on behalf of his principal?

(b) Give some of the important rules determining the relations of partners in a firm to each other when there is no contract to the contrary.

V11 State the circumstances and illustrate the case's in which the torts of the following classes are actionable (a) invasion of a general night (b) breach of public duty (c) breach of private duty.

V111 (a) What are the essential ingredients and the extent of liability for damages on account of malicious conviction, arrest or prosecution.

(b) Distinguish between slander and liable, and explain fully the circumstances in which a communication is held to be privileged and no civil action is maintainable.

1X Explain fully the liability of public carriers. Under what circumstances can a Railway Company be made liable for the loss of goods, consigned to it?

X (a) Under what circumstances is a person liable for the negligent keeping of animals.

(b) Enumerate some of the important cases of torts to persons from deceit.

X1 Explain the circumstances under which an action may be for the breach of duty by a legal practitioner.

X11 (a) Distinguish between penalties and liquidated damages.

(b) In action on tort to real property, how are the damages apportioned between tenant and reversioner?

## वऱ्हाड.

रा. रा. देवराय जयकृष्ण ए. अ. क. अकोट यांस यवतमाळास व रा. रा. गणेश बापुजी तहशिलदार एलिचपूर यांस अकोटास ए. अ. क. नेमिले. रा. रा. नारायण पांडुरंग तहशिलदार जळगाव यांस एलिचपुरास तहशिलदार नेमिले व रा. रा. माधवराव बळवंत नायब तहशिलदार खामगांव यांस जळगावास आ. तहशिलदार नेमून यांचे जागीं रा. रा. अनंत नारायण दांडेकर यांस आ. नेमिले.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर यांस कमिशनरचे क्ला. कोर्ट व मि. एदलजी संजाना यांस ज्यु. कमिशनरचे क्लार्क कोर्ट नेमिले. व मि. महमद इसमायल क्ला. कोर्ट यांस १९० रु. व रा. रा. बळवंत राजाराम कावळे क्ला. कोर्ट वाशीम यांस १२० रु. पगार झाला. रा. रा. कृष्णाजी महादेव यांस १०० रुपयावर क्ला. कोर्ट नेमिले व रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर यांस उमरावतीस सबप्रोटेम डे. क्ला. कोर्ट नेमिले.

मागील आठवड्या पासून हवेंत इतका उष्मा होत आहे कीं हल्लींचे दिवस केवळ उन्हाळ्या सारखे भासत आहेत. लोकांचे डोळे पावसाकडे फार लागले आहेत. आणखी थोडे दिवस असेंच कोरडे गेल्यास पिकास धक्का पोहोंचण्याची भिति आहे. परमेश्वरास लोकांची दया येऊन त्यांची काळजी निवारण्या करितां मेघराजांस इकडे येण्याविषयीं लवकर आज्ञा झाल्यास फार बरें होईल.

रा. रा. भास्कर महेश्वर लेले आफि. ए. अ. क. यवतमाळ यांस गेल्या शनिवारी देवाज्ञा झाली. हें कळविण्यास आह्मांस फार दुःख वाटतें.

## वर्तमानसार.

वायव्यकडील प्रांताकरितां निराळे कायदे कौन्सिल नेमण्याचा सरकारचा ठराव झाला आहे.

आमचे रा० ब० नारायण भाई दांडेकर यांचें कुटुंब सौभाग्यवती लक्ष्मीबाई ह्या गेल्या शनिवारीं आपल्या पतीसह बोलत बसल्या असतां सायंकाळीं ९ वाजतां एकाएकी त्यांचे छातींत कळ निघाली. व दोन मिनिटांत त्यांचें प्राणोत्क्रमण झालें! सौ० लक्ष्मीबाई ह्या पत्नीकनिष्ट आणि सद्धर्मचारी असल्यामुळें त्यांच्या मृत्यूमुळें त्यांचा सर्वांवर्ग दुःखित असेल, ह्यांत आश्चर्य नाहींच. भर्तृदेवांस आपल्या जन्माचे साबताचा वियोग सोसण्यास ईश्वर धैर्य देऊन त्यांच्या शोकविव्हळ आप्तस्वकीयांस समाधान करो.

ठे निष्णात लोक निरनिराळ्या धंद्यात आहेत तरी विलायतेंत सर्वत्र यांत्रिक शक्तीचा उपयोग होऊन जसा कांहीं विलक्षण फायदा होतो तसा येथें बिलकूल नाहीं. हातानें काम करणार कितीही सुरेख रीतीनें करो, यंत्राचे कामाशीं बरोबरी कशी होईल. यामुळें आज हिंदुस्थानांत चांगले धंदे व त्यांतील वाकबगार लोक निराधार होऊन नाहींसे होत चालले आहेत. दुसरी उणीव या ठिकाणी भांडवलाची आहे. पूर्वी कलाकौशल्याचें कामास राजाश्रयामुळें बरेंच उत्तेजन असे ह्मणजे सामुळें कलाकौशल्य हिंदुस्थानांत राहात गेले परंतु त्याचा जेवढां व्हावा तितका विस्तार झाला नाहीं. अशा प्रकारचा ठळक भेद या देशांत व विलायतेंत आहे. अर्थात असा भेद असल्यामुळें या देशांत धंद्याचे संबंधानें वगैरे जी सुधारणा होणार आहे तीही फार सावकाश होईल.

( पुढें चालूं. )

# The Berar Samachar

**MONDAY 27 SEPTEMBER 1886**

It is obviously useless to carry on any further controversy regarding the Police action at Akola. The 'Vaidarbha' had evidently nothing better to answer to our 'Facts' than putting to its readers some further trash. What is the explalnation of those high-flown words used at the beginning of the article headed 'Extraordinary Police action' We leave it to readers to Judge if the truth of the original article is established by the article on 'Common Sense.'

The Madhav Bang Meeting—Enough has already been written about the regularities and irregularities of the Madhav Bang meeting of orthodox Hindoos at Bombay. The meeting as is now well-known was convened to memorialize Government with regard to the dislike of the orthodox community regarding legislative interference in social matters like infant marriage &c. Beyond a handful so called Hindu reformers there is a vast force unseen and unfelt in the shape of the masses of Indian society. The masses in India are yet unconscious of their powers and are very backward in making representations of their opinions. That these men should have assembled in the meeting to express their opinions is one clear sign fo the times that the orthodox party is organizing and will not yield tamely to the pressure of the Reformers.

Everybody knows that Infant marriages have evils attendant upon them but the evils of the system have been so terribly magnified of late that the acceptance of the amendment proposed by Mr. Telang that infant marriage is recognized to be an evil by the Hindu community seemed very dangerous. The admission would perhaps have given to Government a stand point for interference in the matter. The reformers were aggrieved to find their amendment not accepted; but may we not ask with Dr Kirtikar what substantial thing they have done in the matter of Reform beyond specifying and lecturing. Can any of them boast of action in conformity with their words?

Judex of the Nagpoor News seems particularly ill-disposed to the Brahmins. Speaking of the appointment of persons to the posts of Extra Assistant Commissioners in Berar he says 'since that period (i.e. Mr. Cordery's visit in 1883) Tahsildar and clerk of Courts *Brahmins only* and not Mahommedans or other caste, have been elevated.' The italics are ours. Does not this Judex know that Mr. Murray, Mr. Bowen and Mr. Price have been appointed as representatives of that very class whose cause Judex espouses? Is Mr. Maneckshа also a Brahmin? Perhaps we are to trace the genealogy of the Parsees and Hindoos to the common Aryan origin or even to Adam himself. Judex must have a very thick blind indeed over his eyes, if he can't see fact. As for the Head Clerks of the English offices, there is nothing to prevent them being made Extra Assistants, only if they have the necessary qualifications. Mr. King of the Akola office we know, is an excellent head Clerk and very much liked by his Subordinates; but why should he not appear and pass the Higher or Lower Standard? If he or anybody of his position does pass the departmental tests in Berar he can lay claim to such posts as a matter of right. The bigger appointments in English offices in Berar are mostly held by Eurasians. Properly speaking, there ought to be some test for appointing a person to posts in the English offices; but at present nothihg of the kind is required. Why does not Judex refer to this if he means to stand on 'just rights?' As matters now stand one can safely say that the Eurasians are enjoying the loaves and fishes of the office service.

In connection with promotions generally we are put in mind of the case of Pandit Suraj Narayen Attache to the Resident. He entered the service in 1881 and has passed his Higher Standard. When the Attaches were appointed, the understanding was that they were to be promoted after three year's probation on their passing the Departmental tests, When the Commission was adjusted in Mr. Jone's time there were six supernumerary Assistant Commissioners; and it was resolved that each time an Assistant Commissionership became vacant a supernumerary was to be put in the permanent list of Assistant Commissioner and in place of the supernumerary Assistant Commissioner an extra-assistant was to be put in. According to this scheme Attaches had a very slender chance indeed of promotion; but notwithstanding this difficulty which could be clearly foreseen and notwithstanding the resolution of not saddling Berar with any more Attaches, new places of Attaches were and are being created. Now if an Attache has to hang on on his probationer's pay of 200 per mensem until all the Supernumeraries are entered in the Permanent List, they will have to wait for a very long time without any promotion. In this respect Berar favors very unfavourably with other provinces. Mr. Mohamad Razakhan and Mr. T. Rangrao who were here are now in the Madras Presidency one on Rs. 700 as Assistant Collector and Magistrate and the other as Deputy Collector on Rs. 300. It may perhaps be argued that there is so very little scope in Berar for promotion; but what are the Attaches to do in that case? If there is no scope let them be made supernumerary Assistant Commissioners so that they may get some promotion. If men like our able Pandit Suraj Narayen who are so well spoken of by their superiors don't get promotion, the service will certainly deteriorate. No wonder if Government get people of the Hug type who have to be eventually got to resign with very bad grace.

## PLEADERS EXAMINATION
## H. A. D. 1886.
## LAWS OF CONTRACTS AND TORTS.

1 Describe the following terms:—Consideration, free consent, undue ifluence, contract of indemnity, bailment, insolvency and firm.

11 State fully the Law as regards the revocation of proposals and acceptances.

I11(a) What is the effect of a mistake as to any Law inforce in British India when the contract is made in the H. A. D.

(b) What considerations have been held to be unlawful.

(c) State the principal arguments which are void.

1V Under what circumstances and up to what time can a seller exercise his right of stopping the goods in transit? When does this right cease?

V (a) State fully the circumstances in which a surety is discharged and a continuing guarantee is revoked-

(b) What is the Law as regards the restoration of goods bailed gratuitously.

V1 (a) State fully the rights and liabilities of undisclosed principal. In what cases is an agent personally bound contracts entered into by him on behalf of his principal?

(b) Give some of the important rules determining the relations of p[illegible]ners in a firm to each [illegible]r when there is no contr[illegible]to the contrary.

V11 State the circumstances and illustrate the case's in which the torts of the follow ing classes are actionable (a) invasion of a g[illegible]neral nig[illegible]t (b) breach of public duty (c) breach of private duty.

V111(a) What are the essential ingredients and the extent of liability for damages on account of malicious conviction, arrest or prosecution.

(b) Distinguish between slander and liable, and explain fully the circumstances in which a communication is held to be privileged and no civil action is maintainable.

1X Explain fully the liability of public carriers. Under what circumstances can a Railway Company be made liable for the loss of goods, consigned to it?

X (a) Under what circumstances is a person liable for the negligent keeping of animals.

(b) Enumerate some of the important cases of torts to persons from deceit.

X1 Explain the circumstances under which an action may be for the breach of duty by a legal practitioner.

X11 (a) Distinguish between penalties and liquidated damages.

(b) In action on tort to real property, how are the damages apportioned between tenant and reversioner?

## वऱ्हाड.

रा. रा. देवराय जयकृष्ण ए. अ. क. अकोट यांस यवतमाळास व रा. रा. गणेश बापुजी तहशिलदार एलिचपूर यांस अकोटास ए. अ. क. नेमिले. रा. रा. नारायण पांडुरंग तहशिलदार जळगांव यांस एलिचपुरास तहशिलदार नेमिले व रा. रा. माधवराव बळवंत नायब तहशिलदार खामगांव यांस जळगावास आ. तहशिलदार नेमून त्यांचे जागीं रा. रा. अनंत नारायण दांडेकर यांस आ. नेमिले.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर यांस कमिशनरचे क्ला. कोर्ट व मि. एदलजी संजाना यांस ज्यु. कमिशनरचे क्लार्क कोर्ट नेमिले. व मि. महमद इस्मायल क्ला. कोर्ट यांस १५० रु. व रा. रा. बळवंत राजाराम कावळे क्ला. कोर्ट वाशीम यांस १२० रु. पगार झाला. रा. रा. कृष्णाजी महादेव यांस १०० रुपयावर क्ला. कोर्ट नेमिले व रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर यांस उमरावतीस सबप्रोटेम डे. क्ला. कोर्ट नेमिले.

मागील आठवड्या पासून हवेंत इतका उष्मा होत आहे कीं हल्लीचे दिवस केवळ उन्हाळ्या सारखे भासत आहेत. लोकांचे डोळे पावसाकडे फार लागले आहेत. आणखी थोडे दिवस असेंच कोरडे गेल्यास पिकास धक्का पोहोंचण्याची भिति आहे. परमेश्वरास लोकांची दया येऊन त्यांची काळजी निवारण्या करितां मेघराजांस इकडे येण्याविषयीं लवकर आज्ञा झाल्यास फार बरें होईल.

रा. रा. भास्कर महेश्वर लेले आफि. ए. अ. क. यवतमाळ यांस गेल्या शनिवारी देवाज्ञा झाली. हें कळविण्यास आह्मांस फार दुःख वाटतें.

## वर्तमानसार.

वायव्यकडील प्रांताकरितां निराळे कायदे कौन्सिल नेमण्याचा सरकारचा ठराव झाला आहे.

आमचे रा० ब० नारायण भाई दांडेकर यांचें कुटुंब सौभाग्यवती लक्ष्मीबाई ह्या गेल्या शनिवारीं आपल्या पतीसह बोलत बसल्या असतां सायंकाळीं ९ वाजतां एकाएकी त्यांचे छातींत कळ निघाली. व दोन मिनिटांत त्यांचें प्राणोत्क्रमण झालें! सौ० लक्ष्मीबाई ह्या पत्नीकनिष्ट आणि सद्धर्मचारी असल्यामुळें त्यांच्या मृत्यूमुळें त्यांचा सर्वांग दुःखित असेल, ह्यांत आश्चर्य नाहींच. भास्तदेशांत आपल्या जन्माचे साबताचा वियोग सोसण्यास ईश्वर धैर्य देऊन त्यांच्या शोकविव्हळ आप्तस्वकीयांस समाधान करो.

सहामाही " ३ " " ४

Per annum



प्रिन्स आलेक्झांडर बल्गेरियांच्या राज्यास मुकले. पुढें काय व्हावयाचें असेल तें होवो. सर्व धारण रशियाच्या हातांत आहे. यानें बर्लिन येथें झालेल्या तहनाम्याचा बोजवार करून सोडला व त्यास असें कां करतां ह्मणून विचारण्याची छाती युरोपमध्यें कोणासही राहिली नाहीं. जर्मनी व इंग्लंड हीं काय तीं दोन मोठीं राष्ट्रें; परंतु फ्रान्सच्या धाकामुळें जर्मनी व ऐरलंडच्या धाकामुळें इंग्लंड हीं अगदीं गुतून पडल्यामुळें रशियास पाहिजे तें करावयास फावलें आहे जर्मनी कूरकूर करील तर रशिया फ्रान्सास मिळावयास तयार आहे आणि इंग्लंड हुं चूं करील तर हिंदुस्थानाकडे कुलंगडें उत्पन्न करण्यास उभेंच आहे. सारांश या दोनही पराक्रमी राष्ट्रांस शह्यास गुंतवून आपला कार्यभाग उरकून घेण्याचा रशियाचा विचार दिसतो, परंतु रशिया करणार काय यांचें अद्यापि धोरण कोणासच नीट समजत नाहीं. रशिया इतका शिरजोर झाला हें चांगलें नाहीं. युरोपांतील टर्कीस व हिंदुस्थानास हा प्रकार फार अनिष्ट व भयप्रद आहे.

इंग्रज सरकार चीनसरकारास रशियन लोकांशीं शत्रुत्वानें वागण्यास उत्तेजन देते असें रशियांतील वर्तमानपत्रकार ह्मणतात.

एक क्वार्ट वजनाचा व १८ इंच लांबीचा पंखा ९,००० घनफूट जागेंतील हवा स्वच्छ करितो असें म्हणतात.

मि. एडविन नांवाच्या गृहस्थांनीं चालत्या आगगाडीस स्वतंत्र तारा न जोडतां आगगाडीच्या रस्त्याच्या बाजूनीं ज्या तारा असतात त्यांच्याच साह्यानें हवेंतून एका डब्यांतून दुसऱ्या डब्यांत विजेच्या योगानें बातमी पाठविण्याची युक्ति काढली आहे.

मद्रास अग्रिकलचरल कालेजाकरितां एक व्हाइस प्रेन्सिपाल व फर्स्ट आसिस्टंट लेक्चरर अशा दोन जागा नवीन करण्याची स्टेट सेक्रटरींनीं मंजुरी दिली.

धान्यावरील करांचें मान वाढविण्याचा सरकारचा विचार आहे असें पायोनियर वरून समजतें.

मि. पार्नेल साहेबांनीं राणीसाहेबांचें भाषण झाल्यावर प्रतिसूचना करतांनां असें साफ सांगितलें कीं धान्याच्या किंमती कमी झाल्यामुळें यंदाच्या हिंवाळ्यांत कुळांनां सारा देण्याचें अतिशय संकट पडेल व तो सारा सरकार बळजबरीनें घेईल तर आयर्लंडभर स्वस्थता व शांतता राहण्याचें मोठें कठीण आहे. इतकें सांगितलें असून सरकार काय करतें तें पहावें !!!

हंगारी प्रांतांत अलीकडे दिवसेंदिवस रेशमाचें उत्पन्न वाढत चाललें आहे याचें कारण असें सांगतात कीं तेथील सरकारांनें कांहीं एक कर न घेतां तुतीच्या झाडांची लागवड करून दिली.

अफगाण सरहद्दीवर जीं लहान लहान स्वतंत्र संस्थानें आहेत तीं इंग्रज सरकारास आपल्या संरक्षणाखालीं घेण्यास युरोपांतील प्रमुख राष्ट्रें परवानगी देत नाहींत असें समजतें.

रायपुर व बिलासपूर जिल्ह्यांत दुष्काळ पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

ब्रम्हदेशांत मांडले येथें महामारीचा उपद्रव सुरूं झाल्याचें समजतें.

अफगाणिस्थानांत लढाईची तयारी जारीनें सुरूं आहे. बाजार बातमी अशी आहे कीं अमीर रशियन सरकाराशीं लढाईची तयारी करीत आहे व इंग्रज सरकार म्हणतें कीं काफीरस्थानांशीं लढाईची तयारी होत आहे.

जनरल कालबर्स यांस बल्गेरियामध्यें रशियन एजंट नेमिलें.

आयर्लंडांत कहर— वुडफोर्ड डिस्ट्रिक्टमध्यें सातशें पोलिस शिपाई व याही पेक्षां जास्त लष्करी लोक पाठवून मक्तदू न सारा न देणाऱ्या कुळांच्या बायका मुलांस जबरदस्तीनें घराला वेढा घालून बाहेर काढीत आहेत. लोकांमध्यें द्वेषभाव अतिशय वाढत चालला आहे. याचा विचार सरकार करीत नाहीं ही मोठी खेदाची गोष्ट आहे !!!

मुलतान-शहरांत हसन गांवी नांवाच्या प्रसिद्ध ठिकाणीं त्या प्रांतांतील लोकांचीं मनें वळून त्यांनीं रशियन व महाराज धुलिपसिंग यांच्या पक्षास जाऊन मिळावें म्हणून एक जाहिरनामा लाविला आहे.

जलद लेखकाची लेखणी प्रतिवर्षी ३०० मैल प्रवास करते असें अनुमान केलें आहे.

उस्मानडिग्मा कारटूमवर चाल करून येत आहे असें ह्मणतात.

इजिप्त सरकारच्या पक्षाच्या लोकांची व बंडवाल्यांची झटपट झाल्याची स्वाकीम हून बातमी आली आहे.

अतिशय मोठी दुर्बिण — मि. लिक नांवाच्या एका अति श्रीमानें मनुष्यानें कालिफोर्निया येथील साटाक्लारा कौंटींत हामिलटन डोंगरावरील वेधशाळेकरितां एक अतिशय मोठी दुर्बिण घेण्याकरितां ७ लक्ष डालर्स दिले. पुढच्या हिंवाळ्याच्या आत ही दुर्बिण तयार होईल असा अजमास आहे. त्या दुर्बिणींतील भिंगें करण्या करितां पांच वर्षें लागलीं. तीं फ्रान्समध्यें तयार करून बोस्टन येथें घासण्याकरिता आलीं. प्रत्येक भिंगाबद्दल १९,००० डालर्स फ्रेंच कारागिरानें घेतलें. तीं भिंगें घासण्याला व साफसूफ करण्याला दोन वर्षे लागली. ह्या वेधशाळेवर जाण्याला रस्ता केला आहे त्याला ७८,०० डालर्स खर्च झाले. काय विलक्षण उद्योग हा !!

नवीतोफ.— हल्लीं आयर्लंडभर जिकडे तिकडे मारामाऱ्या चालल्या आहेत त्या बंद करण्याकरितां डा. गाटलिंग नांवाच्या मनुष्यानें एक नवीन तोफ तयार केली आहे. त्या तोफेच्या योगानें तीन शिपाई असले म्हणजे प्रत्येक मिनिटांत १००० गोळे सोडता येतात. तेव्हां या तोफेचा उपयोग केला म्हणजे सगळे लोक घाबरून जिकडेतिकडे शांतता होईल असा त्या मनुष्याचा अदमास आहे. सु.प.

लोकांनीं आपल्या शेतांच्या बांधांवर झाडें लावावीं व त्यापासून आपला पुरवठा करून घ्यावा असें सरकारी कामदारांचें ह्मणणें आहे, आणि शेताच्या बांधांवर झाडें लावल्यानें त्यांच्या सावटानें शेतकी होत नाहीं. म्हणून शेतांच्या बांधांवर झाडें लावणें आमच्यानें होत नाहीं असें शेतक-याचें ह्मणणें आहे. खानदेशांत सरकारी शेतकीचें खातें आहे त्यांत झाडांच्या सावटानें शेतकी बिघडते असें अनुभवानें सिद्ध झाल्याचें आतां बाहेर आलें आहे. बसलेल्या फारेष्ट कमिशनानें याबद्दलचा विचार करणें अवश्य आहे.

हंगारी देशांत पटकीचा वाखा सुरू झाला आहे.

ऐर्लंडांतील गालवें येथील लोकांनीं इंग्रजी कामदारांशीं दांडगावा करण्याचें काम सुरू केलें आहे.

पिशीनच्या सरहद्दीवर विशेष प्रकारचा बंदोबस्त करण्याचा विचार पुन्हा सुरू झाला असून तो बंदोबस्त कशातऱ्हेनें करावयाचा त्या विषयीं विचार करण्या करितां कामदार रवाना होत आहेत.

कोरियाच्या हद्दींत रशियाच्या खटपटी चालू असून कोरियाच्या राजाजवळ रशिया कांहीं जमीन मागत आहे असें जपानचा एक पत्रकर्ता सांगतो.

निझामच्या हद्दींत वाटसन नांवाच्या एका गोऱ्या व्यापारी कंपनीस खाणी लावण्याची निझाम सरकारानें परवानगी दिली असून त्या करितां १०० रुपयांचा एक असे १ लाख शेअरांचें १ कोटी रुपये भांडवल जमवून खाणीचा कारखाना सुरू करण्याची एक कंपनी निघाली असून ती विलायतेस रजिष्टरही झाली असें समजतें. यावरून निझामाच्या राज्यांत आतां लौकरच खाणी सुरू होतील असें दिसतें.

थीबाव शरण आला ह्मणून त्यास पाठवून दिलें. पण इंग्रजांनीं ब्रह्मीप्रदेश अजून जिंकिलें नाहीं अशा प्रकारचीं पत्रें ब्रह्मी लोकांनीं चीनच्या बादशहास पाठविलीं आहेत, असें एका कारन ख्रिश्चन मनुष्यास दंगेखोरांचा एक पुढारी मार्टीनसबा याणें सांगितलें. आणखीं असेंही सांगतात कीं, त्यांणीं चिनच्या बादशहास अशीही विनंती केली आहे कीं, ब्रह्मीराजगादी वर दुसऱ्या कोणा राजास बसवा, अगर थीबायाचीच पुन्हां स्थापना करा. इंग्रजी लोक जर आमच्या या दोन्ही सूचना नाकबूल करतील तर हा ब्रम्हीप्रदेश चिनच्या बादशहानें खालसा करावा अशी ब्रह्मी लोक बादशहास विनंती करतील. यावर त्या ख्रिस्ती मनुष्यानें इंग्लंड व चीन यांच्या दरम्यान ब्रह्मी प्रकरणाच्या बाबतींत झालेल्या कराराचा तर्जमा मार्टीनसबास ऐकविला. त्यावर मार्टीनसबा ह्मणाला कीं, तसें असणें साहजीक आहे. पश्चिमचीन प्रदेशांत तो तह प्रसिद्ध करण्याविषयीं चीनच्या बादशहानीं यूननच्या गव्हरनरास हुकूम केला आहे असें इंग्रज अधिकारी सांगतात, पण भामो येथील लोकांचा त्यावर भरंवसा नाहीं, व तो हुकूम अमलांत येईल असें त्यास वाटत नाहीं. चांगली हवा झाल्यावर लढाई सुरू करण्याचा चीनी लोकांचा इरादा आहे असें चिनी लोकांचें अनुमान आहे.

खोटा कागद करणारा गोरा शेतकरी गिबन्स यास सेशनकोर्टांत शिक्षा होऊन हायकोर्टांत त्याचें अपील खोटें ठरल्यावर आतां त्याणें सरकारास माफी करण्याविषयीं अर्ज केला आहे.

चहा, काफी, सिंकोना, वगैरेच्या शेतकीच्या कामावर नोकर म्हणून असणारे इनकमटाक्सापासून सुटणार नाहींत असें हिंदुस्थानसरकारानें ठरविलें आहे.

नॉर्थवेस्ट प्रांतांतील शेतकी यंदा चांगली आहे असें समजतें.

पायोनियर पत्रास विलायतेहून आलेल्या तारेवरून असें समजतें कीं, बल्गेरिआचें रिजन्सी सरकार लोकांचीं मनें खळविणाऱ्या रशियन लोकांस कैद करीत आहे. रशियन लोक क्रिमिया व बेस आरेबिया येथें फौज व सामान सुमान यांची जमवाजमव करीत आहेत आणि फौजेकडून तिकडून इकडे नेण्याकरितां काळ्यासमुद्रांत वहानें जमवीत आहेत. ठा० अ०

वर्तमानपत्र म्हणजे प्रजेचीं तोंडें आहेत असें समजून त्यांस देववेल तितकें साह्य व उत्तेजन देणें हें सरकारचें पहिलें कर्तव्य आहे. सेंट्रल प्रेस स्थापन करून वर्तमान पत्राची मदत सरकारानें जाणूम बुजून बंद केली. वर्तमानपत्रांचें हें उत्तेजन कमी करण्यानें वर्तमानपत्र सरकारास नकोत असा सरकारचा स्पष्ट ग्रह आहे असें कोणासही साफ दिसणार आहे. या साठीं सेंट्रल प्रेस अशा संधीस अजी बंद करून सरकारानें आपला व प्रजेचा फायदा करावा, व्यापार आपल्या हातीं घेण्याचें बंद करावें आणि दोषापासून मुक्त व्हावें हें योग्य आहे. शु० सु०

निझाम हैद्राबाद प्रांतांत एक सेशन जज्ज नेमण्याचा विचार चालल्याचें ऐकतों.

हैद्राबादेस गेल्यावर लार्ड आणि लेडी डफरीन ही वेलोरची प्रसिद्ध कोरीव लेणी पहाण्यास जातील.

गेल्या ता० १९ मिनहूस अफगाण सरहद्द कमिशन परत येण्याकरितां तेथून निघालें.

सर स्टुअर्ट बेली इंग्लंड करितां मुंबईहून निघण्यापूर्वीं कांहीं दिवस हैदराबादेस जाणार आहेत.

आग्र्याचे मुनसफ लाला बाजीचंद बी. ए. यांस ग्वाल्हेर संस्थानच्या रीजन्सीचे १००० रुपये महिना देऊन सेक्रेटरी नेमिलें.

भोपाळच्या बेगम साहेब येत्या आक्टोबर पासून आपल्या प्रांतांतलि जाणाऱ्या येणाऱ्या मालावरील कर बंद करणार आहेत.

गेल्या एका मुसलमानी मोठ्या सणाचे दिवशीं निजाम सरकारानें अनादिसिद्ध चालत आलेल्या रीतिप्रमाणें सार्वजनिक सभा भरवून सरदार वगैर लोकांपासून नजराणे न घेतल्यामुळें ते लोक रागावले होते. या रिवाजाचें पुनरपि उल्लंघन करण्याचा निजाम सरकाचा उद्देश होता. परंतु बडे लोकांनीं त्यांचें मन वळवून गेल्या गुरुवारीं रीतिप्रमाणें दरबार भरविला.

ने० ओ०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.